प्रि. भाटे यांची मार्गदर्शक पुस्तकमा...

प्रवास-पत्रें

(कारवार, धारवाड व नगर)

गो. चि. भाटे

प्रि. भाटे यांची मार्गदर्शक पुस्तकमाला

पुष्प-पहिलें

प्रवास-पत्रें

(कारवार, धारवाड व नगर)

१९४४

किंमत पावणे दोन रुपये

गो. चि. भाटे

मुद्रकः-विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर,
पुणें ४.

प्रकाशकः-माधव गोविंद भाटे,
८३० सदाशिव, पुणें शहर.



सरदार रावबहादूर भाऊसाहेब तेंडुलकर.

अर्पण-पत्रिका

सरदार रावबहादूर

विनायक महादेव तेंडुलकर,

(कोकबन) कुलाबा जिल्ह्यांतील मोठे जमीनदार,

माजी जिल्हा लोकल बोर्ड प्रेसिडेंट व पहिले सरदार

यांस

आपल्या व्यवहारज्ञ चतुरकृतींनीं

' नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता '

या पदवीस चढल्याबद्दल त्यांचें कौतुक करणाऱ्या

या लेखकानें सादर अर्पण केलें आहे.

गोविंद चिमणाजी भाटे.

प्रस्तावना

माझ्या दशपुष्पात्मक प्रवासवृत्त–मालेचें छपाईच्या क्रमानें पहिल्यांदा छापलेलें पुस्तक लंकावर्णन १२ सपटंबर सन १९३४ (गणेश चतुर्थी) या शुभ दिवशीं प्रसिद्ध झालें व त्या मालेचें शेवटचें पुस्तक ता. ९ आगष्ट सन १९३६ (गोकुळअष्टमी) या शुभ दिवशीं प्रसिद्ध झालें. शेवटच्या प्रस्तावनेंत मीं मालेचे दोन उद्देश डोळयांपुढें ठेविले होते असें लिहिलें आहे. पहिला उद्देश प्रौढ विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमबाह्य वाचनीय पुस्तकें उपलब्ध व्हावीं हा होता. दुसरा उद्देश स्त्रीपुरुषांमध्यें प्रवासप्रेम, चौकसपणा व बहुश्रुतपणा निर्माण करणारीं पुस्तकें उपलब्ध व्हावीं हा होता.

या निर्दिष्ट उद्देशांची सिद्धि थोड्याफार प्रमाणांत घडून आली, इतकेंच नव्हे तर, माझ्या प्रवासवृत्तमालेंतील पुस्तकांनीं पुष्कळ अंशा वाटाड्यांचें व प्रवासमार्गदर्शक पुस्तकांचेंहि काम केलें आहे, असें मला पुष्कळ प्रवाशांनीं सांगितलें, हें कळून मला आनंद वाटला व वाचकांची वाङ्मयसेवा करण्यास अधिक उत्तेजन मिळालें. माझ्या पुढील प्रवासवृत्त–मालेच्या लेखनांत हा तिसरा उद्देशही मीं मनांत ठेऊन प्रवासवृत्तें लिहिण्याचा बेत केला.

अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (History of Modern Marathi Literature) या साडेसातशें पानांच्या व इंग्रजींत लिहिलेल्या पुस्तक प्रकाशनांत माझीं दोन अडीच वर्षें गेलीं. पुढें आजारीपणा व त्याच्या प्रतिकारार्थ शस्त्रक्रिया व तदनंतरची विश्रांति यामुळें दोन वर्षें गेलीं. तितक्यांत हल्लींचें दुसरें महायुद्ध सुरू होऊन छपाईच्या सर्व साधनांची विलक्षण महर्गता व दुर्मिळता उद्भवली. त्यामुळें प्रवासवृत्तें लिहून व अर्धवट प्रसिद्ध करून थांबणें भाग पडलें. पण, जानेवारी सन १९४४ मध्यें मला दोन उदारधी वाङ्मयभक्त भेटले. यामुळें सन १९४४ च्या गुढीपाडव्याच्या दिवशीं माझी प्रवासवृत्त–माला २ री

या नव्या मालेचें पहिलें मार्गदर्शक पुस्तक प्रसिद्ध करितां आलें. तेव्हां माझ्यासारख्या वयातीत माणसाला प्रवास करण्याची व नंतर त्यासंबंधीं मार्गदर्शक पुस्तकें लिहिण्याची शारीरिक व मानसिक शक्ति लाभली याबद्दल मी सरस्वतीदेवीचे चरणीं लोटांगण घालतों.

कारवार व नगरनजीकचा गोदा प्रवरा संगम प्रांत यासंबंधीं मीं ८ पत्रें माझ्या आप्तेष्टांस लिहिलीं. ध्रुवाचे संपादकानीं त्यांतलीं चार प्रसिद्ध केलीं. पण पुढें कागदाच्या दुर्मिळतेमुळें पुढचीं चार पत्रें तशींच पडून राहिलीं होतीं.

पण गेल्या दिजंबर (सन १९४३) मध्यें हिंदुस्थान सरकारनें सरदार पदवी दिलेले, कुलाबा जिल्ह्यांतील पहिले सरदार रावबहादुर भाऊसाहेब तेंडुलकर यांना त्यांच्या कोकबन या निसर्गरमणीय गांवीं व त्यांच्या प्रशस्त सुंदर बंगल्यांत माझ्या बंधुसहवर्तमान मी भेटलों व सारस्वत समाजाचें माहेरघर अशा जिल्ह्याच्या मार्गदर्शक पुस्तकाला आर्थिक मदत करण्याची त्यांना विनंति केली. त्यांनीं नुकतीच रेवदंडा (जिल्हा कुलाबा) येथील हायस्कुलास वीस हजार रुपयांची उदार देणगी दिली होती. तसेंच जिल्ह्यांतील इतर लोकोपयोगी कामांनाही ते मदत करतात. असें असूनही माझ्या मार्गदर्शक पुस्तकास त्यांनीं तत्परतेनें व ताबडतोब पैशाची बहुमोल मदत केली. म्हणून मी त्यांचे येथें जाहीर आभार मानीत आहें व माझ्या दुसऱ्या मालेचें पहिलें मार्गदर्शक पुस्तक त्यांच्या परवानगीनें त्यांना अर्पण करीत आहें.


माझ्या मागील प्रवासवृत्त पुस्तकाप्रमाणें हें माझें मार्गदर्शक पुस्तक व या मालेंत होऊं घातलेलीं पुस्तकें माझ्या वाचकांस वर उल्लेख केलेले लाभ देवोत अशी इच्छा प्रदर्शित करून मी लेखणी खालीं ठेवतों.

८३० सदाशिव पेठ,
गोखल्यांचा वाडा, पुणें २.

गोविंद चिमणाजी भाटे

ता. २५ मार्च सन १९४४
चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १८६६.

अनुक्रमणिका


कारवार प्रवास मार्ग दर्शक नकाशा.
पुणें
बारामती
बार्शी
भोर
फलटण
सातारा
सोलापूर
रत्नागिरी
कोल्हापूर
विजापूर
देवगड
गोकाक
वेंगुर्ले
बेळगांव
गोवें
धारवाड
गदग
हुबळी
कुंदगोळ
यल्लापूर
सदाशिवगड
कारवार
अरबैलघाट
करजगी
अंकोला
गोकर्ण
शिरसी
कुमठें
मिर्जान
होनावर
बनावसी
भटकळ

प्रवास--पत्रें

१

हुबळी

ता. १२ नवंबर १९४१

चि. पिलुताईस,

अनेक आशीर्वाद विशेष. माझें **हुबळी** मुक्कामचें पत्र पाहून तुम्हां सर्वांना आश्चर्य वाटेल. पण वर्षभराच्या घरबसव्या आजारांतून बरा होतों न होतों तोंच माझ्या प्रवासव्यसनानें उचल खाल्ली. मग चि. डॉ. वसंताच्या संमतीनें व सल्ल्याप्रमाणें एक महिन्याचा प्रवास सावकाश व मुक्कामुक्कामाला विश्रांति घेत करण्याचा बेत करून मी महाडाहून ता. ६ नवंबर रोजीं दोन प्रहरीं दीड वाजतां निघून **वरंध्या** घाटानें **भोर** नजीकच्या भाटघर धरणावरून पुण्यास साडेसहा वाजतां म्हणजे पांच तासांत सुमारें पाऊणशें मैल मजल गांठली व माझ्या विद्यार्थिदशेंतील तो बैलगाडीचा तब्बल चार दिवसांचा प्रवास आठवून माझें मलाच सानंद आश्चर्य वाटलें.

माझा पहिला मुक्काम **हुबळीस** होणार होता. तेथें आपल्या सर्वांच्या परिचयाच्या इचलकरंजीच्या गोविंदराव हायस्कूलच्या चोळकर हेडमास्तरांचे जावई डॉ. आत्मारामपंत **भागवत** व त्यांची मुलगी डॉ. मनुताई भागवत यांचेकडे मी खरोखर उतरावयास जावयाचा. पण गेल्या एप्रिल–मे या महिन्यांत मी हवापालटीकरितां महाबळेश्वरीं कृष्णाभुवन सरदारगृहांत रहात असतां नवा परिचय झालेल्या सरनोबत नांवाच्या डॉक्टरांकडे उतरण्यास

गेलों. तुम्हांला कळून आनंद वाटेल कीं, भागवत पतिपत्नी यांचा परप्रांतीं सुद्धां धंदा चांगला चालला आहे. डॉ. मनुताईनीं मुलांमातांकरितां खासगी दवाखाना काढला आहे व डॉ. आत्मारामपंत भागवत हे नगरच्या आयुर्वेदिक औषधांच्या हुबळीच्या दुकानाचे मॅनेजर व गिऱ्हाइकांस व आजाऱ्यांस पाहून वैद्यकीचा सल्ला देणारे वैद्य किंवा डॉक्टर आहेत. अर्थात् हुबळीस असतांना मी बहुतेक दररोज त्यांना भेटत असे व त्यांचे-कडे चहाफराळ करीत असे.

मी पुण्याहून ता. ८ रोजीं रात्रींच्या साडेनवाच्या **एम्. एस्. एम्. रेल्वेच्या** मेलगाडीनें निघालों. गाडीच्या डब्यांतील कंपार्टमेंटची कडेची जागा मीं घेतली. पण गाडी चालू होईपर्यंत गाडींत अतिशय गर्दी झाली व सर्व रात्र आलोचन जाग्रण होणार अशी भीति वाटली. पण **कोरेगांव** स्टेशनपर्यंत सारखीं माणसें उतरत असल्यामुळें येथपासून गर्दी थोडी कमी झाली व बसल्या बसल्या कां होईना पण खिडकीस डोकें टेकून झोंपतां आलें. पहाटेस ५॥ वाजतां गाडी पुण्यापासून २१५ मैला-वर असलेल्या **गोकाक** स्टेशनला आली. पुण्याहून येथपर्यंतचा प्रवास काळोखांत झाला. पण एका अर्थी तें बरें झालें. कारण सर्व भूमिभाग माळरानी उंचसखल टेकड्यांचा आहे. मध्यें **चोराच्या आळंदीचा** व वाठारच्या आधीं **सालप्याचा** असे दोन घाट आगगाडीस चढावे लाग-तात. पण, या घाटाचे डोंगर मुरमाचे तांबडसर असून ते उघडे बोडके आहेत. तेव्हां, हा सर्व रुक्ष व कंटाळवाणा प्रवास रात्रीचा झाला ही मला इष्टापत्तीच वाटली. गोकाकपासून हुबळीपर्यंतचा प्रांत नयनमनोहर व सृष्टिसौंदर्ययुक्त आहे. गोकाक स्टेशनच्या आजूबाजूचा भाग तर विशेषच आकर्षक आहे. या स्टेशनच्या उजव्या बाजूस **घटप्रभा** नदीवर २५।३० फूट उंचीचें धरण बांधलेलें आहे व त्यायोगें तेथें मोठा थोरला तलाव बनला आहे. धरणाखालील मोऱ्यांतून धो धो आवाज करीत पाणी घट-प्रभा नदींत पडतें व पुढें तीन मैल वहात जाऊन ती नदी १०० फूट

उंचीच्या खडकावरून एकदम खोल उडी घेते. या गोकाकच्या धबधब्या-पासून वीज उत्पन्न करण्याचा कारखाना केला असून त्या विजेच्या शक्तीवर डोंगराचे पठारावर एक कापसाची गिरणी चाललेली आहे. गिर-णीच्या विस्तीर्ण आवारांत गिरणीचे मजूर, कामगार व वरिष्ठ अधिकारी यांकरितां चाळी, घरें व बंगले आहेत व त्यांना विजेचे दिवे दिलेले असून स्टेशनापासून गिरणीपर्यंतचा चार मैलांचा सर्व रस्ता विजेच्या दिव्यांनीं रात्रभर प्रकाशित असतो. यामुळें, आमची आगगाडी स्टेशनांत आली तोंच दिवाळींत दिवेच दिवे लावलेल्या गांवासारखा तो देखावा दिसत होता. मीं पुष्कळ वेळां या रेल्वेनें प्रवास केलेला असल्यामुळें मला हा देखावा नवा नव्हता. तरी पण पहाटेच्या प्रहरीं तो दिव्यांचा लखलखाट पाहून मलाहि मौज व आश्चर्य वाटलें.

पिलुताई, तूं हा प्रवास केलेला नाहींस म्हणून मी मुद्दाम येथपासूनच्या सुंदर देखाव्याचें सविस्तर वर्णन करीत आहें.

गोकाकपासून हुबळीस पोहोंचण्यास चार तास लागतात, पण आतां पूर्वीचा रुक्ष प्रदेश जाऊन सुपीक तांबडमातीचा व जांभ्या-कुरंदी दग-डाचा मुलूख लागतो. कोंकणच्याप्रमाणें इकडे भाताचीं किंवा कडधान्याचीं फक्त पिकें नसून जोंधळा, बाजरी, गहूं, तूर, मिरची, तंबाखू, ताग, करडई, तीळ अशा नानाविध पिकांचीं हिरवींगार, पिवळींजरद व तांबडीं-लाल शेतें असतात. बेळगांवपर्यंत हा देखावा चित्ताकर्षक आहे. बेळ-गांवच्या आसपास कलमी आंब्यांची खूप लागवड करण्यांत आली आहे. बेळगांवपासून दहा बारा मैलांवर असलेल्या **खानापूर** स्टेशनापासून मात्र डोंगरी व जंगली भाग लागतो. हें जंगल मुख्यतः सागाचें असून तें दाट, जाड व उंच वृक्षांचें आहे. मधून मधून बांबूचीं बेटेंचीं बेटें लागतात. धारवाडपर्यंतच्या प्रत्येक स्टेशनच्या आवारांत लाकडाचे ढीगच्या ढीग पाहून मन आश्चर्यचकित होतें, तोंच महाबळेश्वरसारखें दिसणारें **धारवाड** गांव येतें.

पुण्यापासून हुबळीच्या ३३४ मैलांच्या प्रवासास बरोबर बारा तास लागून मी ता. ९ नवंबर रोजीं साडेनऊ वाजतां हुबळीस पोहोंचलों. डॉ. सरनोबत स्टेशनवर मला नेण्यास आले होते. माझें सामान हमालाच्या स्वाधीन करून ते व मी जवळच्या वाटेनें त्यांचे बंगल्यावर आलों. त्या बंगल्यानजीकच्या हुबळी वीज कंपनीच्या वीज उत्पन्न करण्याच्या कारखान्यांतील यंत्राचा घर घर आवाज ऐकून मला तुमच्या **भिऱ्याच्या** बंगल्यांत असल्याचा भास झाला.

हुबळी मीं चाळीस वर्षांपूर्वी प्रथमतः पाहिली होती. त्या वेळीं तेथें लोकवस्ती सुमारें ४० हजार होती व हल्लींच्या नव्या वसाहतीस सुरवातहि झाली नव्हती. पण, गेल्या चाळीस वर्षांत हुबळीचा सर्व बाजूंनीं विस्तार वाढून तें आतां एक लाख लोकवस्तीचें मोठें शहर बनलें आहे. ही वस्ती वाढण्याचें मुख्य कारण कर्नाटकांतील कापसाची विलक्षण वाढ होय. या कापसाला मुंबई बाजारांत '**धारवाड**' हें नांव आहे. हा लांब धाग्याचा कापूस असून कापूस वेचण्याचा, पिंजण्याचा व गठ्ठे बांधण्याचा हंगाम खानदेशच्या व वऱ्हाडच्यानंतर म्हणजे एप्रिल, मे, जून या तिमाहीचा असतो. येथें दहा बारा गिरण्या (Ginning Factories and Presses) असून '**भारत मिल**' नांवाची सुताची व कापड विणण्याची गिरणी आहे. शिवाय खण–लुगडीं व इतर कापड विणण्याचे हातमागहि सात आठ हजार आहेत. यामुळें येथें **इचलकरंजीच्या**प्रमाणें गल्लोगल्लीं मागाचे ठक ठक आवाज ऐकूं येतात. मात्र हे बहुतेक पायानें चालविण्याचे माग आहेत. एंजिनशक्तीवर चालणारे क्वचित् आहेत.

सुधारलेल्या शहरास साजेसे हुबळीचे मुख्य मुख्य रस्ते प्रशस्त, दोन्ही बाजूंस पाऊल–वाट असलेले, डांबरी किंवा कॉंक्रीटचे किंवा मिश्र स्वरूपाचे आहेत व ते विजेच्या दिव्यानें प्रकाशित केलेले आहेत. रात्रीं बाजारपेठेंतून हिंडतांना दिवाळीच्या सणाची आठवण होते.

या शहरांत जुनीं प्रेक्षणिय स्थळें नाहींतच म्हणाना. हुबळीचा जुना किल्ला पार पाडण्यांत आला आहे; खंदक बुजविण्यांत आला आहे.

एकीकडचा तट व दोन बुरूज मात्र अजून दृग्गोचर होतात. हा तालुका पूर्वी सांगलीकर संस्थानिकांचा होता व किल्ल्यांत त्यांचा कुलदेव गणपती याचें एक छोटेसें देऊळ आहे. तें देऊळ व त्याचें आवार अजून सांगलीकरांकडे असून तेथें त्यांचा एक पुजारी–कारकून राहतो. हें देऊळ मीं डॉ. सरनोबतांबरोबर त्यांच्या दवाखान्यांत जातांना पाहिलें. तें पाहून मला वाटलें कीं, हल्लींच्या राजेसाहेबांनीं आपल्या पूर्व स्वामित्वाचें स्मारक म्हणून येथें प्रेक्षणीय देवालय किंवा सार्वजनिक इमारत बांधावी, निदान येथल्या महाराष्ट्र–मंडळीस अशी इमारत बांधण्यास सढळ हातानें मदत करावी.

डॉ. भागवत किल्ल्याच्या तटाला लागून असणाऱ्या एका चाळींत रहात असल्यामुळें, किल्ल्याचा तट व बुरूज, त्यांच्याकडे भोजनास गेलों असतां, सहज दृष्टीस पडले. हा जुन्या किल्ल्याचा भाग गांवांतील टेकडी-वजा उंचवट्यावर असल्यामुळें भागवतांच्या सज्जावरून जुन्यानव्या हुबळी शहराचा विलक्षण विस्तार आपोआप दृष्टीस पडला. नव्या हुबळींत मात्र पुष्कळ इमारती प्रेक्षणीय आहेत. हुबळी नगरपालिकेच्या कचेरीची दुमजली चौकोनी व चारी बाजूंस सज्जे असलेली हिरवट निळसर रंगाची सीमेंटची इमारत सुंदर आहे. तिचें सौंदर्य सभोंवारच्या फुलझाडांच्या व फळझाडांच्या बागेनें, त्यांतील पुष्करणीनें, व चन्द्रप्रकाशी शीतल विजेच्या दिव्यांनीं वृद्धिंगत केलें आहे. तेथें ध्वनिक्षेपकांसकट उत्तम प्रतीचा रेडिओ सेटहि घेतला असल्यामुळें ही बाग लोकांचें आवडतें विश्रांतिस्थान झालें आहे. त्यांचे समोर सरकारी सूतिका-गृहासकट दवाखाना आहे. एका बाजूस दिवाणी कोर्ट व त्यांना लागूनच वकिलांचें व सेवानिवृत्तांचें कीडाभुवन आहे. दुसरे बाजूस विद्यार्थीवसतिगृहासकट नगरपालिकेचें लॅमिंग्टन हायस्कूल आहे. या-प्रमाणें येथें सार्वजनिक इमारतींचा चौकच बनला आहे. हा भागहि उंचवट्याचा असून तेथून **पुणें–बंगळूर** हा बादशाही रस्ता गेला आहे. दुसरा मोठा रस्ता **गदगकडे** गेला आहे. तिसरा रस्ता **ब्याडगी–नवल-**

गुंदाकडे गेला आहे व चवथा रस्ता खुद्द हुबळी बाजाराकडे गेला आहे. यामुळें या रस्त्यांनीं जातां येतां या सर्व इमारती श्रमाविणें पहातां येतात व तशा त्या मीं दोनतीन दिवसांत सकाळसंध्याकाळच्या सहलीच्या प्रसंगानें पाहिल्या. हुबळींतलें सर्वांत दूरचें दृश्य म्हणजे '**सिद्धारूढस्वामींचा मठ**' हें होय. हें गांवापासून दोन अडीच मैलां-वर लोकलफंडी रस्त्याच्या बाजूला आहे. नुकतीच सुरू झालेली एकच बस बाजारांतून त्या रस्त्यानें मठाच्या नजीक जाते. पण तिनें फार वेळ मोडतो म्हणून डॉ. भागवत व मी टांगा करून एका दोन प्रहरीं मठ पाहण्यास गेलों. गांव टाकल्याबरोबर उजवीकडे पेरूच्या बागा व डावीकडे जोंधळ्याचीं व कापसाचीं शेतेंच शेतें लागलीं व थोड्या वेळांत उजवीकडे पेरू-नारळांच्या वृक्षांनीं व समोरच्या तलावानें शोभायमान झालेलें विस्तीर्ण पटांगण व पलीकडे इमारतीच इमारती दिसूं लागल्या. आम्ही टांग्यांतून उतरून पटांगणांतील पाऊलवाटेनें मुख्य इमारतीकडे गेलों. तें तांबूस-पांढऱ्या दगडाचें शिवालय होतें. देवळाचे दगडी एकसंधी नक्षीचे खांब, खालींवर मोठमोठ्या दगडांची फरशी, व गाभाऱ्यांत शंकराची पिंडी हीं सर्व वाखणण्यासारखीं आहेत. त्याला लागून पहिल्या मठस्थापक स्वामींच्या समाधीची छोटी दगडी इमारत आहे. त्यांत त्या स्वामींची संगमरवरी मूर्ति आहे. पुढें एक अगदींच लहान लाकडी इमारत आहे व त्यांत स्वामींची लाकडी उत्सवमूर्ति व पालखी आहे. त्या मूर्तीला पालखींत घालून तिची स्वामींच्या पुण्यतिथीच्या व महाशिवरात्रीच्या उत्सवप्रसंगीं मोठी मिरवणूक काढतात. या दोन्ही उत्सवांस स्वामींचे हजारों शिष्य व लिंगायत लोक जमतात. त्यांना राहण्याकरितां व त्यांच्या भोजनाकरितां दोन मोठमोठ्या चौसोपी धर्मशाळा बांधलेल्या आहेत. या जमणाऱ्या मंडळीच्या स्वयंपाकाकरितां लांबचलांब स्टेशन प्लॅटफॉर्मसारखा सोपा बांध-लेला आहे व उंच ओट्यावर दहाबारा चुलाणीं असून त्यांवर प्रचंड भाजी-आमटीचीं पातेलीं व भाताचीं तितकींच प्रचंड तपेलीं कायमचींच ठेवलेलीं आहेत. कारण तीं दोन-चार गड्यांनाहि उचलतां येण्यासारखीं नाहींत.



श्रीसिद्धारूढ स्वामींचा मठ, हुबळी.



म्युनिसिपालिटीची मुख्य इमारत, हुबळी.



श्रीशान्तिका परमेश्वरी मंदीर, कुमठा.

या इमारतीच्या समोर दोन तलाव आहेत; एक पाणी पिण्याचा तर दुसरा अंग व कपडे धुण्याचा. येथली व्यवस्था स्वच्छतेची व टापटिपीची दिसली. एकंदरींत हा मठ एकदां पहाण्यासारखा आहे खरा.

हुबळीहून नऊ मैलांवर असलेलें **कुंदगोळ** गांव मी डॉ. भागवतांबरोबर सकाळच्या सुमारें दहा वाजतांच्या लोकल गाडीनें पाहण्यास गेलों. हा तालुका व त्याचें मुख्य गांव हीं श्रीमंत **अप्पासाहेब जमखंडीकर** यांच्या अमलाखालीं आहेत. कर्नाटक हा सर्व प्रांत पूर्वकाळीं **पटवर्धन** सरदारांच्या ताब्यांत होता. अजूनहि **कुंदगोळ** जमखिंडीकरांचें, त्यांच्या-पुढचें **गुडगेरी** हें श्रीमंत **मळेकरांचें**, तेथून पूर्वेस दहा मैलांवर असलेलें **लक्ष्मेश्वर** श्रीमंत **मिरजकरांचें** व त्याच्याहि दक्षिण-पूर्वेस असलेलें **शिरहट्टी** हें श्रीमंत **सांगलीकरांचें** आहे. विलिंग्डन कॉलेजचें भिक्षापात्र माझे हातीं असतांना मीं कुंदगोळाखेरीज बाकीचीं तिन्हींहि संपन्न व सुपीक गांवें पाहिलीं होतीं. आतां कुंदगोळ पहाण्याचा योग आला म्हणून मला आनंद झाला. या पूर्वस्मृति मनापुढें वावरत असतांच कुंदगोळ स्टेशन आलें व आम्ही स्टेशनांतून बाहेर पडून चालूं लागलों. स्टेशनपासूनच गांवाची वस्ती सुरू होते. पण गांव **साताऱ्या**प्रमाणें किंवा तुझ्या **तळे-गांवा**प्रमाणें चढत्या रस्त्याच्या दुतर्फा आहे. टेकडीचे माथ्यापर्यंत वस्ती असून माथ्याचे पठारावर महादेवाचें पुरातन देवालय आहे. आम्ही टेकडी पायऱ्यानें चढूं लागलों तोंच उजव्या अंगास तांबड्या दगडांनीं बांधलेला तलाव लागला. तो कोरडाच होता; पण त्यांतच एक विहीर व विहिरींत बोअर करून इतक्या खोलांतून गांवाला पंपानें पाणी देण्याची नवीन व्यवस्था करण्यांत आली आहे. आम्ही बऱ्याच पायऱ्या चढल्यावर आपटे वकिलांच्या घरीं गेलों. ते घरींच होते. त्यांनीं माझें स्वागत केलें व म्हटलें, 'जरी मी कर्नाटक कॉलेजचा विद्यार्थी होतों, तरी येथल्या वकिलांत व शिक्षकांत फर्ग्युसन व विलिंग्डन या दोन्ही कॉलेजांचे जुने विद्यार्थी व तुमचे शिष्य आहेत; तसेंच येथें हायस्कूलहि आहे. तरी आपण आज

संध्याकाळीं ‘अर्वाचीन शिक्षणाचें ध्येय’ या विषयावर व्याख्यान द्यावें. व्याख्यान सायंकाळीं महादेवाच्या देवालयांत करूं म्हणजे अनायासें पुरातन देवालय पाहून होईल. रात्रीं आमच्याकडे जेवण करून ९॥ च्या गाडीनें तुम्हांस हुबळीस जातां येईल.’ लागलीच त्यांनीं आपल्या माणसाकडून शाळेंत मास्तरांना, मुलांना व इतर मंडळींना मी आल्याबद्दलची व व्याख्यान ठरल्याची चिठ्ठीसुद्धां पाठविली व आपल्या मुलांकरवीं शेजारच्या वकिलांना बोलावणें पाठविलें व लगेच तीनचार मंडळी आली देखील. मग मी या मंडळीजवळ बोलत बसलों. आपटे घरांत गेले व ‘कोर्टांतून नुसते कागद दाखल करण्याचें काम करून मी पंधरा–वीस मिनिटांत परत येतों’ असें म्हणून बाहेर गेले. सुमारें अर्ध्या तासानें ते परत आले व मग आमचा सावकाश अल्पोपाहार झाला. नंतर आम्ही गांव पहाण्यास–ऊन होतें तरी–निघालों. मराठी मुलामुलींची शाळा, हायस्कूल वगैरे सार्वजनिक इमारती पाहिल्या. गांवाच्या मानानें खासगी घरें आणि सरकारी इमारती नीटनेटक्या व सुबक दिसल्या. नंतर आम्ही त्या गांवच्या **तिरुमलराव देसाई** नांवाच्या वृद्ध इनामदाराकडे गेलों. त्यांचा वाडा फारच प्रशस्त व विस्तीर्ण होता. दिवाणखाना प्रमाणशीर असून त्याचें लाकडी नक्षीकाम फार सुंदर होतें. तिरुमलरावांनीं आपण व आपला वकील झालेला मुलगा खंडेराव यांची महाबळेश्वरीं गांठ पडल्याची आठवण दिली, पण मुलगा मुंबईस गेला असल्याचें सांगितलें. येथें अर्थात् चहापाणी झालेंच. तों पांच वाजले म्हणून आम्ही सर्वजण माथ्यावरील महादेवाच्या देवालयास गेलों. कोल्हापूरच्या अंबाबाईच्या देवळासारखी या शिवालयाची बांधणी आहे. मला तर तें अंबाबाईच्या देवळाची छोटेखानी प्रतिकृति आहे असें वाटलें. देवाळासभोंवारची नक्षी, तसेंच आंतल्या खांबावरील खोदीव मूर्ती प्रेक्षणीय आहेत यांत शंका नाहीं. या देवळाचे सभोंवार पुष्कळ खुली जागा असल्यामुळें हें देऊळ जास्त उठावांत दिसतें. या देवळाची पुढची देवडी व त्यावरील छोटी खोली ही त्या टेकडीच्या सर्वांत उंच ठिकाणीं असल्यामुळें येथून सभोंवार मोठा मनोहर देखावा

दिसतो व येथें सारखा वारा वाहत असल्यामुळें ऊष्मा होत नाहीं. श्रीमंत **भाऊसाहेब जमखंडीकर** यांची ही आवडती बसण्याची जागा होती असें मला सांगण्यांत आलें. सध्यां येथें छोटेसें मराठी पुस्तकांचें संग्रहालय आहे व कानडी, मराठी व एक दोन इंग्रजी अशीं वर्तमानपत्रें येत असून सायंकाळीं मंडळी येथें वाचावयास येतात असें कळलें.

मंडळी व मुलें जमल्यावर माझें व्याख्यान झालें. तें व्याख्यान सर्वांना आवडलेंसें दिसलें. मीं अनाहूत येऊन तेथल्या मंडळीस भेटीचा व व्याख्यानाचा लाभ दिला याबद्दल माझे मनःपूर्वक आभार मानण्यांत आले. आम्ही आपटे यांचे घरीं येऊन जेवून लगेच स्टेशनवर आलों व हुबळीस ११ च्या सुमारास पोहोंचलों.

कुंदगोळास मला आकस्मिकपणें व तत्काळ सुचविलेल्या विषयावर व्याख्यान द्यावें लागलें, तर दुसरे दिवशीं हुबळीस पूर्वीं ठरल्याप्रमाणें व चिटणीस–अध्यक्षांच्या सल्ल्यानुरूप 'अर्वाचीन प्रवास' या विषयावर महाराष्ट्रीय मित्रमंडळीपुढें व्याख्यान द्यावें लागलें. तिसरे दिवशीं म्हणजे ता. १३ नवंबर १९४१ रोजीं सकाळच्या नवाच्या मोटारबसनें मी **कारवारास** जाण्यास निघालों.

पिलुताई, माझें हें पत्र थोडें लांबलें खरें, पण माझा प्रवासामध्यें पहाण्यांत, संभाषणांत व व्याख्यानांत वेळ कसा जातो व जुन्या–नव्या मित्रांच्या सहवासानें माझा प्रवास मला किती समाधानाचा व सुखाचा होतो याची तुला यथार्थ कल्पना देण्याकरितां हें सविस्तर पत्र लिहिलें आहे. कळावें सर्वांस आशीर्वाद.

आपला भाऊ,

दादा

२

कारवार, (उत्तर कानडा)
ता. १९ नवंबर १९४१

चि. गोविंदराव यांस,

अनेक आशीर्वाद विशेष. चि. **पिलुताईस** पाठविलेल्या पत्रावरून माझ्या या प्रवासाच्या पहिल्या मुक्कामाची हकीकत तुला कळलीच असेल. त्यांत लिहिल्याप्रमाणें मी **हुबळीहून** ता. १३ नवंबर १९४१ रोजीं सकाळीं नऊ वाजतां मोटारबसनें येथें येण्यास निघालों. हुबळीहून **कारवार** १०४ मैल आहे. मोटारभाडें दोन रुपये पडलें. हुबळी समुद्र-सपाटीपासून सुमारें २००० फूट उंच आहे व कारवार समुद्रसपाटीवर आहे. हुबळीपासून सह्याद्रिपर्वताची रांग पश्चिमेस पंचवीस तीस मैलांवर आहे. तेथून **आरवेल** घाटास सुरवात होते. इकडे सह्याद्रि, आपल्या तिक-डील वरंध्या किंवा महाबळेश्वर येथील डोंगराइतका उंच नाहीं. लोणावळ्या-खंडाळयाच्याप्रमाणें सपाटीवरून उतारास सुरवात होते. हुबळीपासून हळू हळू उतरणारा हा रस्ता आहे. यामुळें प्रवाशांची फसगत होते. हुबळीपासून **कलघट्टी** १७ मैल आहे; पण उतार अवघा ५० फुटांचा आहे. येथपर्यंत भुरटें रान लागतें व तुरळक तुरळक सागासारखे मोठे वृक्ष दृष्टीस पडतात. कलघट्टीपासून **येल्लापूर** १० मैल आहे. या १० मैलांत रान बरेंच दाट व उंच आहे व त्यांत बांबूचीं बेटें बरींच दृष्टीस पडतात. खोलगट भागांत भाताचीं व बाजरी–ज्वारीचीं शेतें दिसतात. येल्लापुर-पासून '**कारवार सागाचें**' किर्र रान सुरू होतें. केवढाले प्रचंड सागाचे वृक्ष या रानांत आहेत! इकडच्या मानानें **लोंढ्याचीं** सागाचीं लांकडें कमी उंच व कमी जाड असतात. या प्रचंड रानापुढें आपल्या कुलाबा कोंकणांतील रान कःपदार्थ वाटतें. येल्लापुरापासून **इडगुंजी** ६ मैल असून उतार अवघा ३०० फुटांचा आहे. पण येथपासून दक्षिण कोंकणासारखी वनश्री सुरू होते. केळीं, नारळी, पोफळी, काजु, आंबे, फणस वगैरे फळ-

झाडें व भात, नागली, वरी वगैरे धान्यपिकें जिकडे तिकडे दिसूं लागतात. इडगुंजीपासून बारा तेरा मैलांवर **आरबाल** गांव आहे व तें १००० फूट खालीं आहे. या दहा बारा मैल वाकणावाकणाचा व जास्त उताराचा रस्ता लागतो. येथें मात्र घाटाचा भास होतो. येथून **संसाल** गांव सात आठ मैल आहे; पण उतार फक्त १०० फुटांचा आहे. येथून **अंकोला** २१ मैल आहे व तें ५० फूट खालीं आहे. येथपर्यंत रस्ता नैर्ऋत्य दिशेनें जातो. अंकोला हें गांव समुद्रानजीक आहे. येथून कारवार जिल्ह्याचा दाक्षिणोत्तर रस्ता लागतो. दक्षिणेकडे **गोकर्ण–महाबळेश्वर** आहे, तर **कारवार** उत्तरेकडे आहे. अंकोल्याच्या आसपास बरेंच खुलें माळरान आहे. पण, सुमारें दहा बारा मैल गेल्यावर गर्दछाय–रानानें सुशोभित डोंगरांची ओळ आपल्या उजव्या हातास, तर नीळसर, हिरवट पाण्याची खाडी व तिला लागून गर्दछाय–डोंगर डाव्या हातास असा मोठा मनोहर देखावा दिसतो. हा भूमिभाग **परशुराम–चिपळूणची** आठवण करून देतो. मात्र परशुरामचा डोंगर डाव्या हातास आहे व चिपळूणची खाडी उजव्या हातास आहे. पण येथपासून डामरी घाटासारखा उंचसखल रस्ता लागतो व कारवार नजीक आलें असें सूचित करतो. कारवार एक मैल दूर आहे तोंच अरबी समुद्र, त्या समुद्राच्या तोंडाशीं असलेलीं तीन हिरवींगार बेटें व अंतर्गोल किनारा दृष्टीस पडून मनाला फार आनंद होतो.

मी हुबळीहून ८॥ वाजतां निघालों तों कारवारास तिसऱ्या प्रहरीं तीन वाजतां पोहोंचलों. तेथले एंजिनिअर रावसाहेब **काळे** यांचा बंगला रस्त्याला लागून व गांवाच्या प्रारंभींच आहे. त्यांना आधीं तार केली असल्यामुळें ते बंगल्याच्या दारांत माझी वाट पहात होते. त्यांच्या शिपायानें झटकन् मोटारपाशीं येऊन माझें सामान घेतलें. काळ्यांनीं पुढें येऊन माझें स्वागत केलें व आम्ही दोघेहि जिन्यावरून दुसऱ्या मजल्याच्या प्रशस्त खोलीमध्यें गेलों. **काळे** म्हणाले, ‘ही माझी कामाची खोली आहे. हा बंगला थोडा लहान आहे. वरच्या मजल्यावर तीनच खोल्या

आहेत. म्हणून तुमची सोय माझ्या खोलींत केली आहे.' मीं म्हटलें, "ठीक आहे. युरोपियन लोकांप्रमाणें आपल्याला प्रत्येकाला स्वतंत्र खोली लागत नाहीं." नंतर माझें स्नान-भोजन झालें. तोंच पांच वाजले. **काळे** म्हणाले, 'मी खालीं कचेरींत जाऊन अर्ध्या तासांत येतों. तोंपर्यंत तुम्ही आमच्या पश्चिमेकडील सज्जामध्यें उभे राहा म्हणजे तुम्हांला **कारवारचें** बंदर व त्याचें सृष्टिसौंदर्य आपोआप दृष्टीस पडेल.' त्याप्रमाणें मी सज्जांत जाऊन उभा राहिलों तों मी आश्चर्यचकित झालों. बंगल्यासमोरून गेलेला तो काळसर डामरी रस्ता, पलीकडे ती तांबडसर हिरवळीची सहलवाट, तिच्याखालीं मऊ मऊ वाळूनें भरलेलें तें पांढरें वाळवंट, नंतर सफेत फेनयुक्त लाटांनीं वाळवंटावर धों धों आवाज करीत आपटणारें तें समुद्राचें हिरवट पाणी, पलीकडे अफाट समुद्र व शेवटीं बऱ्याच अंतरावर दूर दिसणारा हिरवट बेटावरील तो दीपस्तंभ व तें पांढरें निशाण; हा सर्व देखावा पाहून मुंबईच्या चौपाटीवरील बंगल्याच्या सज्जावर उभा असल्याचा मला भास झाला व कारवार बंदर मुंबईच्या चौपाटीची छोटी प्रतिमा आहे असें वाटलें. इतकें या दोन देखाव्यांत साम्य आहे. हा नयनमनोहर देखावा पहाण्यांत मी गुंग झालों असतां काळे सज्जांत आले. नंतर आम्ही खालीं येऊन फिरावयास बाहेर पडलों व डामरी रस्ता ओलांडून सहल-वाटेनें सहल करण्यास निघालों, तोंच माझे एक जुने विद्यार्थी रा. शानभाग भेटले. या आकस्मिक भेटीनें आम्हां दोघांनाहि अत्यंत आनंद झाला. **शानभाग**हि फिरावयास निघाले होते. अर्थात् आम्ही बोलत बोलत व सभोंवारचा देखावा पहात पहात चाललों. ते बरोबर फिरण्यास आल्यामुळें मला कारवारबद्दल किती तरी माहिती चालतां चालतां मिळाली. शानभाग म्हणाले, 'हल्लींचें कारवार हें शहर अर्वाचीन असून समुद्र व डोंगरांची ओळ यांमधील चिंचोळ्या लांबट सपाट पट्टींत वसलें आहे. यामुळें या शहराचा विस्तार फार नाहीं; दोन-तीन तासांच्या सहलींत सर्व शहर पाहून होईल. तदनुरूप ह्या तास दीड तासाच्या सहलींत मला अर्धेअधिक शहर शानभागच्या बरोबरच पाहतां आलें.

सहल–वाटेच्या प्रारंभींच 'मित्रसमाज' नांवाच्या संस्थेची एक-मजली चौकोनी, खुल्या पडवीनें युक्त व सभोंवारच्या क्रीडांगणानें अलंकृत अशी सुंदर इमारत लागली. नंतर एकामागून एक वाचनालय, जिल्हा व तालुका–कोर्टें व जंगलखात्याची कचेरी, अशा सुबक बागांनीं अलंकृत इमारती लागल्या. मग मात्र जंगलखात्यानें लागवड केलेल्या सुरूच्या व सागाच्या झाडांच्या राई सारख्या लागूं लागल्या. म्हणून आम्हीं सहल-वाटेच्या पूर्वेकडच्या पहिल्या डामरी गर्दछाय रस्त्याला वळलों. या रस्त्याला दुतर्फा केळीं, नारळी, इत्यादि फळझाडें व चाफा, गुलाब, सोनटक्का इत्यादि फुलझाडें यांनीं अलंकृत असे खासगी बंगले लागले. या रस्त्यानें थोडेंसें चालल्यावर आम्ही कारवारच्या बाजारपेठेच्या रस्त्यावर आलों. आतां अंधार झाल्यामुळें बाजारपेठेंतील दुतर्फा दुकानांत पेट्रोमॅक्सचे दिवे लावल्यानें रस्त्यावर चकचकीत प्रकाश पडला होता. बाजारपेठ टाकल्यावर डाव्या हातास पुन्हां सरकारी व खासगी इमारतींची रांग लागली. नंतर मोटारबस कचेऱ्या व शेवटीं आणखी कांहीं सरकारी कचेऱ्या लागल्या. शेवटीं टपालघर व तारघर व त्यांना लागून असलेल्या काळयांच्या बंगल्याशीं आम्ही येऊन पोहोंचलों. दुसरे दिवशीं आपल्याकडे भोजनाचें निमंत्रण देऊन व आम्हांला 'शिवरात्र' करून शानभाग आपल्या बंगल्याकडे गेले व मी मोठ्या प्रमुदित मनानें बंगल्यांत शिरलों. याप्रमाणें कारवारास आल्यापासून माझ्या तेथल्या दृश्यदर्शनास सुरवात झाली.

दुसरे दिवशीं सकाळीं चहा–फराळ करून आम्ही काळयांच्या कारकुनाला बरोबर घेऊन कारवारच्या पूर्वेकडील डोंगरी व उंचावरच्या सहल-वाटेनें मोठमोठ्या सरकारी अंमलदारांच्या राहत्या बंगल्यावर नजर टाकीत व कारवार बंदराचा उंचावरून दिसणारा देखावा पहात चाललों असतांना महाबळेश्वरच्या वेण्या तलावाच्या उंचावरच्या सहलवाटेची मला आठवण झाली. त्या वृक्षांच्या कमानींनीं युक्त, वाकड्या वाकड्या व सावलीच्या सहल-वाटेनें चालतांना श्रम वाटले नाहींत. शेवटीं दोन अडीच तासांच्या सहली-

नंतर आम्ही दुहेरी पडवींच्या व वटवृक्षांनीं शोभायमान झालेल्या प्रशस्त डाकबंगल्याशीं येतों, तों पायांनीं थकवा आल्याची व पुष्कळ चालल्याची जाणीव करून दिली. म्हणून आम्हीं गर्दछाय अंगणांत वीसपंचवीस मिनिटें विश्रांति घेतली व साडेअकराचे सुमारास बंगल्यावर आलों. मग मी स्नान करून शानभागकडे भोजनास गेलों. त्यांच्या गृहिणीनें अस्सल सारस्वती अन्न तयार केलें होतें. जेवण आटोपल्यावर आम्हीं दोन तास विश्रांति घेतली. नंतर मोटारकारमधून आम्ही दोन-तीन मैलांवरच्या **कोडीबाग** नांवाच्या खेड्यास गेलों. येथें पूर्वीं ईस्ट इंडिया कंपनीची वखार होती; पण आतां तेथें तिचा मागमूसहि राहिलेला नाहीं. त्या **कोडीबाग** नांवाचें इंग्रजी रूपांतर **कारवार** झालें. हें खेडें हजार दोन हजार वस्तीचें गांव असून मलबारांतील गांवाप्रमाणें नीटनेटकें व नारळी-पोफळीसारख्या वृक्षांनीं मंडित दिसलें. गांवाच्या शेवटीं एक नवी इमारत होती. तेथें आम्ही गेलों. ती नुकतीच हायस्कूलच्या वर्गाची परवानगी मिळालेल्या इंग्रजी शाळेची इमारत होती. शानभागनीं त्या शाळेच्या रा. नाईक नांवाच्या संस्थापक हेडमास्तराचा परिचय करून दिला. ते सानंदाश्चर्यानें म्हणाले, “ माझ्या पूज्य गुरुजींना माझ्या या छोट्या शाळेला अचानक भेटीला आणल्या-बद्दल मी शानभागसाहेबांचे प्रथम आभार मानतों व अर्थात् गुरुजींचें स्वागत करतों. ” ते पुढें म्हणाले, “ मी तत्त्वज्ञान विषय घेतलेला तुमचा शिष्य होतों. तुमच्या उदाहरणावरून मला आपल्या गांवांत इंग्रजी शाळा काढण्याची स्फूर्ति झाली. तदनुरूप मी सन १९२५ मध्यें तीन इयत्तांची इंग्रजी शाळा काढली. उपयुक्त काम पाहून कारवारच्या संपन्न लोकांनीं पैशाची उदारहस्तानें मदत केली. म्हणून शाळेला कायमचें गृह उपलब्ध झालें व तीन इयत्ता शाळेचें आतां हायस्कूल बनलें आहे ! ” माझ्या एका विद्यार्थ्याची ही कर्तबगारी पाहून मला फार आनंद झाला. प्रमुदित मनानें मी शाळेच्या वर्गांतून हिंडलों व नाईकांचे आभार मानून इमारतीबाहेर पडलों. नंतर आम्ही कोडीबागेपासून एका मैलावरील असलेल्या **शेजबाड** गांवच्या डोंगराच्या पायथ्यास राहणारे सरकारी हायस्कूलचे सेवानिवृत्त

हेडमास्तर रा. हेर्लेकर यांच्या शेतवाडीशीं आलों. नाईकाप्रमाणें त्यांनींहि माझें स्वागत केलें व ते म्हणाले, " नाईकाप्रमाणें जरी मी आपला तत्त्वज्ञान विषयाचा शिष्य नसलों तरी आपण मला तर्कशास्त्र व बेकनचें ' विद्याभिवृद्धि ' नांवाचें इंग्रजी पुस्तक शिकविलेलें आहे. बी. ए. झाल्यावर मी सरकारी शाळाखात्यांत शिरलों व कारवार हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं काम करून सेवानिवृत्त झालों आहे. आतां आपलें उरलेलें आयुष्य शहरांत न घालवितां खेड्यांत राहून शेती—बागायती करण्याच्या बुद्धीनें ही वीस एकरांची शेतवाडी विकत घेऊन स्वतःकरितां घर, गुरांकरितां गोठा, व गडीमाणसांकरितां झोपड्या बांधून तीन—चार वर्षांखालीं मी या गांवीं रहाण्यास आलों. येथें पूर्वीं कांहींएक उत्पन्न होत नव्हतं. पण मी येथें आल्यावर भाताचीं खाचरें तयार केलीं व आतां मी गडीमाणसांसकट स्वताच्या कुटुंबापुरतें भात व गुरांढोरांपुरती दाणावैरण पिकवूं लागलों आहें. शिवाय, बरेच कलमी आंबे, थोड्या केळीं, कांहीं चिकू व थोडे पेरू यांची लागवड केली आहे. या बागाइतीपासून मला थोडेंफार उत्पन्न येऊं लागलें आहे. थोडीशी लागवडींत सुधारणा केल्यास कसा फायदा होतो, हें मीं लागवड केलेल्या जाईच्या फुलझाडांवरून कळून येईल. जाईच्या वेलाचे मंडप न करतां मीं जाईचीं १००० रोपें वेगवेगळीं लावलीं व आतां त्या झाडांना दररोजचीं हजारों फुलें येतात व वर्षाचे या फुलांपासून पाऊणशें रुपयांचें उत्पन्न येतें ! माझें असें मत आहे कीं, थोडीशी शेतकीची व बागाइतीची शास्त्रीय माहिती मिळवून सुशिक्षित लोक जर शेती—बागाइतीच्या जागीं राहून स्वतः शेती—बागाइती करतील तर ते आपल्या कुटुंबाचें व मुलाबाळांचें पोट सुखानें भरतील; इतकेंच नव्हे तर त्या गांवांतील गरीब लोकांची बेकारी अंशतः कमी करूं शकतील. या माझ्या शेतावर या खेड्यांतील पुष्कळ माणसें आनंदानें काम करण्यास येतात व घरच्या घरीं मजुरी मिळवूं शकतात. माझें उदाहरण पाहून दुसऱ्या एक दोन गृहस्थांनीं या गांवीं जमीन विकत घेतली आहे

व ते स्वतः शेती–बागाइती करूं लागले आहेत. ” हेर्लेकरांची ही निराळ्या प्रकारची कर्तबगारी पाहून मला कौतुक वाटलें. उशीर झाला म्हणून आम्ही हेर्लेकरांचे आभार मानून परत निघालों. परत येतांना फार पुरातन काळापासून स्वयंभूस्थान म्हणून गणलेलें ‘ **शेजवाडेश्वर** ’ नांवाचें शिवालय पाहून आम्ही कारवारास परत आलों.

पुढील दोन दिवसांत मी शिक्षणसंस्थांचें दृश्य दर्शन संपविलें. पहिले दिवशीं मीं हिंदु हायस्कूल पाहिलें. तें हायस्कूल कारवार शिक्षक संस्थेनें चालविलें होतें. त्या हायस्कुलांत मराठी भाषा जाणणाऱ्या मुलें–मुली पुष्कळ असल्यामुळें मीं ‘ अर्वाचीन प्रवासांतले अनुभव ’ या विषयावर मराठींत भाषण केलें. दुसरे दिवशीं सरकारी हायस्कूल पाहिलें. त्या सरकारी हायस्कुलांत मराठी न जाणणाऱ्या मुले–मुली पुष्कळ असल्यामुळें अर्वाचीन प्रवासाच्या विषयावर पण इंग्रजींत भाषण केलें.

पुढच्या दिवशीं सकाळीं शानभागसमवेत आम्ही काळ्यांच्या मोटारकारमधून कारवारच्या उत्तर दिशेस असलेलीं प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास गेलों. दोन दिवसांपूर्वीं आम्ही कोडीबाग गांवीं आलों होतों, पण त्या गांवच्या बंदरापर्यंत गेलों नव्हतों. आज कोडीबागच्या बाजारपेठेंतून थेट बंदराच्या धक्क्यापर्यंत आलों. तेथें फॉरेस्टखात्याचा लांकडांचा मोठा सांठा असल्यामुळें जिकडे तिकडे मोठमोठ्या ओंड्यांचे, वाशांचे, कापलेल्या इमारती लाकडांचे व जळाऊ फाट्यांचे ढीगच्या ढीग पडले होते. कारवारच्या प्रख्यात जंगलांत तोडलेलीं छोटीं लांकडें होडींतून व मोठीं लांकडें नदीच्या प्रवाहांत टाकून या बंदरीं आणतात व मग तीं जलमार्गानें किंवा खुष्कीच्या मार्गानें बाहेर ठिकाणीं पाठविलीं जातात. हा प्रचंड लांकडांचा सांठा सोडल्यास येथल्या खाडीचा देखावा अलीबागच्या रेवस बंदरासारखा आहे. या बंदराच्या या नदीचें नांव **काली** नदी असें आहे. खाडी वीसपंचवीस फूट खोल व सुमारें एक मैल रुंदीची आहे. तरानें पलीकडे जावें लागतें. बंदरांतील धक्क्यानजीकच्या मंडपांत मोटार

ठेवून आम्ही त्रिवर्ग तराफ्यांत बसलों. खाडीच्या मध्यावर आल्यावर नदीच्या मुखाशीं सुरूच्या वृक्षांमुळें हिरवेंगार दिसणारें बेट लागलें. तेथून खाडीचें मुख दृष्टीस पडून आरबी समुद्राच्या प्रचंड लाटांचा कल्लोळही पहातां आला. खाडीपार झाल्यावर समोर तांबडा लाल रस्ता लागला. त्याच्या डाव्या हातास **सदाशिवगड** नांवाचा टेकडीवरील किल्ला व त्याची पायवाट दिसली. वाट जरी अवघड होती तरी टेकडी फार उंच नसल्यामुळें आम्ही सहज चढून गेलों. किल्ला तर अगदींच पडका दिसला. एका बाजूचा तट व एक दोन टेहेळणीबुरूज व रखवालदारांच्या देवड्या काय त्या शाबूद होत्या. येथून समुद्र मात्र दूरवरपर्यंत दिसत होता. हा छोटा किल्ला पूर्वींच्या काळीं टेहेळणी किल्ला म्हणून बांधलेला असावा असें वाटलें. पण दुसरें तेथें पाहण्यासारखें कांहीं एक नव्हतें; म्हणून आम्ही गडाखालीं गांवाच्या बाजूच्या वाटेनें उतरलों. वाटेंत दुर्गादेवीच्या देवळावर नजर टाकून गांवांत शिरलों. सदाशिवगड हा सहा हजार वस्तीचा मोठा गांव आहे. घरें चांगलीं मजबूत व सुबक दिसलीं. बाजारपेठ टाकल्यावर राहत्या घरांची वस्ती लागली. आम्हांला तेथल्या वाघ नांवाच्या गृहस्थाचें खाजगी पदार्थसंग्रहालय पहावयास जावयाचें होतें. त्यांच्या प्रशस्त वाड्यांत आम्ही पोहोंचलों व मालकांनीं आमचें स्वागत केलें. त्यांचें पदार्थसंग्रहालय वरच्या मजल्याच्या तीन दालनांत ठेविलें होतें. हस्तीदंती, चंदनी, शिसवी, करटीच्या, शिंप्याच्या वगैरे कच्च्या मालापासून तयार केलेल्या नाना आकारांच्या, विविध रंगांच्या वस्तू काचेच्या कपाटांत व्यवस्थेनें मांडून ठेवल्या होत्या; तसेंच खुंटीवर तेलरंगांतील व पाणरंगांतील चित्रें टांगून ठेविलीं होतीं. मेजावर मगर–माशाचे सांगाडे, सांबरांचीं शिंगें, वगैरे मोठमोठ्या जिनसा ठेविल्या होत्या. या सर्व दाखवून मालक म्हणाले "एकदां एक कलेक्टर आमचें संग्रहालय पहाण्यास आले, व ते उद्गारले कीं, हें संग्रहालय लंडनच्या पदार्थसंग्रहालयाची छोटी आवृत्तीच आहे. बाकी या सर्वांचें श्रेय आमच्या मुंबई हायकोर्टांत शिरस्तेदार असलेल्या वडिलांच्या 'दुर्लभ वस्तुलोभा'ला व त्यांच्या खर्चिक

स्वभावाला आहे." वाघांचे आभार मानून आम्ही परतलों व तर उतरून मोटारकार गांठली व कारवारास येण्यास निघालों. उशीर झाला होता तरी शानभाग यांनीं आमच्या वाटेवर असलेल्या मंगेश जिवाजी तेलंग नांवाच्या ८० वर्षांच्या कलावंत संस्कृत पंडिताची भेट करविली. त्या गृहस्थाची रुबाबदार व भव्य मूर्ति पाहून आम्हांला त्याचेबद्दल आदर वाटला. त्यांनीं आम्हांला आपला संस्कृत ग्रंथांचा व पोथ्यांचा संग्रह दाखविला; स्वतः रंगविलेलीं काचेवरील चित्रें दाखविलीं; आपल्या गीता-साराचें एक छोटें पुस्तक नजर केलें; व आम्ही जाण्याची घाई करीत असतां स्वकृत संस्कृत व प्राकृत कविता म्हणून दाखविल्या. फारच उशीर झाला म्हणून आम्ही तडक बंगल्यावर आलों.

पुन्हां तिसऱ्या प्रहरीं मोटारनें दक्षिण दिशेकडे चार पांच मैलांवर असलेल्या बिगें या गांवीं गेलों. चार मैल कारवारास येतांना पाहिलेल्या सुंदर रस्त्यानें जलद आलों. नंतर उजव्या बाजूच्या लोकलफंडी रस्त्याला वळलों. तोंच माणसांची गर्दीच गर्दी वाटेनें जातांना दिसली. फुलांच्या माळांच्या कमानीवरून व आंब्याच्या टहाळयांच्या कमानी-वरून न सांगतां तेथें गांवची जत्रा आहे असें कळलें. मग आम्ही गर्दींतून कशीबशी वाट काढून एकदांचा देवळांत प्रवेश करून महा-देवाचें दर्शन घेतलें व मग समुद्रकिनारीं आलों. तेथें सरकारनें सुरू केलेल्या मासे खारविण्याच्या कारखान्याच्या (Fish curing yard) तीस चाळीस झोपड्या होत्या. मासे धरण्याचा व खारवून वाळविण्याचा हंगाम नुकताच संपला होता म्हणून बरें. यामुळें माशांची फारशी दुर्गंधी आली नाहीं. पण इतक्यांत नाईक नांवाचा माझा एक जुना विद्यार्थी भेटला. त्यानें आम्ही नको नको म्हणत असतां पांच सहा कोवळीं शहाळीं झाडावरून पाडवून आमच्या मोटारींत टाकलीं. काळोख होईल म्हणून आम्ही तडक परत आलों.

१६ नवंबर आदितवार हा माझ्या कारवार निवासाचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशीं संध्याकाळीं साडेपांच वाजतां मित्रसमाजापुढें माझें

'अर्वाचीन शिक्षणाचें ध्येय' या विषयावर व्याख्यान होतें. म्हणून सकाळीं व दुपारीं मी बाहेर गेलों नाहीं. पांच वाजतां सभास्थानीं गेलों तों मित्रसमाजाचे सभासद, हायस्कुलांतील शिक्षक, गांवांतील वकील व इतर सभ्य स्त्रीपुरुष यांनीं समाजाचा दिवाणखाना फुलून गेला होता. उत्सुक विद्यार्थी-वर्ग खुल्या पडवींत उभा होता. अध्यक्ष सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज रा. ब. येनमडी हे होते. त्यांनीं मोठ्या मजेदार तऱ्हेनें माझी श्रोत्यांस ओळख करून दिली. ते म्हणाले, " प्रि. भाटे यांचा मी कधींही विद्यार्थी नव्हतों, तरी मी त्यांना फारा दिवसांपासून ओळखतों. मी इंटर आर्टच्या परीक्षेस बसलों असतांना ते माझे तर्कशास्त्र-विषयाचे परीक्षक होते. पुढें मी जुन्नरास सबजज्ज असतांना डॉ. गुणे व प्रि. भाटे हे जुन्नरचीं लेणीं व शिवनेरी किल्ला पहाण्यास आले होते. आम्ही त्यावेळीं प्लेगमुळें झोपड्यांत रहात होतों व हे आमच्या शेजारच्या मामलेदाराकडे उतरले होते. तेव्हां त्यांची तेथें गांठ पडून ओळख होऊन त्यांच्या पायी प्रवास-प्रियतेबद्दल व पुराण-वस्तु-दर्शननादाबद्दल आदर वाटला. पण त्यांच्या ७२व्या वर्षींसुद्धां त्यांचा तो नाद व ती हौस कायम आहे, हें पाहून माझा त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित झाला आहे. " नंतर मीं १। तास भाषण केलें. श्रोतृ-वृंदाच्या आनंदित चेहेऱ्यावरून त्यांना व्याख्यान आवडलें असें दिसलें. आभारप्रदर्शनानंतर सभा विसर्जन झाली व सर्व मंडळींचा निरोप घेऊन मी बंगल्यावर आलों. ता. १८ रोजीं जेवून सुमारें बारा वाजतां थेट **गोकर्णास** जाणाऱ्या मोटार बसनें मी निघालों.

हें माझें पत्र बरेंच लांबलें खरें. पण तुला त्यानें कारवारची चांगली कल्पना येईल असें वाटतें. कळावें, सर्वांस आशीर्वाद.

तुझा मामा,

दादा.

३

गोकर्ण महाबळेश्वर,
ता. १७ नवंबर १९४१

चि. सौ. **साळुताईस** अनेक आशीर्वाद विशेष. तुम्हीं थोड्याफार यात्रा केल्या आहेत, म्हणून हें **गोकर्ण–यात्रा** वर्णनाचें पत्र तुला लिहीत आहें. मी ता. १७ नवंबर १९४१ रोजीं बारा वाजतां कारवारहून मोटार-बसनें निघालों. कारवारपासून गोकर्ण २२ मैल आहे. हा सर्व रस्ता डाव्या बाजूला हिरवीगार डोंगरांची रांग व उजव्या बाजूला आरबी समुद्र किंवा खाऱ्या पाण्याचें खारटण किंवा समुद्रांत घुसलेलें जमिनीचें भुशीर असा आहे. सखल भागांत भातशेती व उंचवट्याच्या भागांत नारळी, केळी, पोफळी यांचीं झाडें अशी पिकांची तऱ्हा आहे. नारळी–पोफळीच्या झाडांवर दुरून अगदीं एकसारख्या दिसणाऱ्या पानवेली व मिरवेली चढविलेल्या असतात. हा भूमिभाग बाणकोट, वेळास, केळशी, अंजनवेल या तुला ठाऊक असलेल्या रत्नागिरी कोकणासारखा आहे. दहा अकरा मैलांवर **अंकोला** गांव आहे. पण समुद्राकडे चढती जमीन असल्यामुळें गांवानजीक असून तेथून समुद्र दिसत नाहीं. या गांवीं रत्नागिरी कोकणांतल्याप्रमाणें घरासमोर जाड झांपांचा मंडप घालून त्यावर ओल्या सुपाऱ्या सुकण्याकरितां वाळत घालावयाची पद्धत आढळून आली. कारण, सुपारी सोलण्याचा व वाळविण्याचा तो हंगाम होता.

अंकोल्यापासून गोकर्ण नऊ दहा मैल आहे. येथून डोंगरांची रांग बरीच दुरावलेली दिसली. हा भाग जरा कमी पिकाचा, कमी झाडीचा व म्हणून खुला व मोकळा असा वाटला. लवकरच **गोकर्ण गांव** लागलें. तें समुद्राला समांतर असें लांबच लांब वसलेलें आहे. मोटारबसचा अड्डा गांवाचे साधारण मध्यावर आहे. वे. बाळकृष्ण वासुदेव जोगळेकर (माझे बंधु गोकर्णास गेल्या वेळेपासून ते आमच्या घराण्याचे तीर्थोपाध्याय झाले

आहेत) अग्निहोत्री यांना आगाऊ पत्र लिहिलें असल्यामुळें त्यांचा भाऊ मोटारअड्ड्यावर माझी वाट पहात होता. तेव्हां साडेतीन वाजले होते. सामान हमालाचे डोक्यावर देऊन आम्ही बराच वेळ चाललों; तेव्हां जोगळेकरांचा वाडा आला. तो समुद्राच्या वाळवंटानजीक असून महाबळेश्वराच्या देवळासमोर आहे. चहापाणी होतें तों चार साडेचार झाले. मग वासुदेवभटजी म्हणाले, " आतां तीन नारळ व तीन पैसे घेऊन येथल्या तीन मुख्य देवतांचें दरवाज्याबाहेरून दर्शन घ्या. आज सोमप्रदोष व उद्यां अमावास्या असल्यामुळें येथें दोन्ही दिवस दिव्यांची पाहण्यासारखी रोषणाई होते. सर्व देवळांच्या आवारांत व गाभाऱ्यांत तेलाचे पितळी दिवेच दिवे लावतात. तेव्हां, तुम्हांला दोन दिवस येथें दिवाळी असल्यासारखें वाटेल. आज रात्रीं देवाची धूपार्ती पाहण्यास सांपडेल. उद्यां सकाळीं स्नान करून देवांचे गाभाऱ्यांत जाऊन देवमूर्तींना हात लावून देवदर्शन घेतां येईल. देवळाची व्यवस्था हल्लीं सरकारी पंचामार्फत चालत असून यात्रा–कर दर माणशीं दोन आणे आहे. देवांच्या वतनदार पुजाऱ्यांस तुम्हीं जी कांहीं त्याच्या हातावर दक्षिणा ठेवाल किंवा देवापुढें पै–पैसा ठेवाल ती काय ती पुजाऱ्याची मिळकत. आज बाहेरून देवदर्शन घेतल्यावर डोंगराच्या समुद्रांत घुसलेल्या टोंकाशीं असलेलें **रामनाथचें देवालय** व **रामकुंड** यांचा व तेथून सायंकाळच्या सूर्याच्या अस्ताचा प्रेक्षणीय देखावा पाहतां येईल. वाटेनें आमच्या गांवची चौपाटी व तेथली पांढरट बदामी रंगाची बारीक व मऊ मऊ वाळू यांचा मजेदार अनुभव घेतां येईल व आपणाला ७॥ वाजतां वाड्यांत परत येतां येईल. आठ साडेआठच्या सुमारास धूपार्ती होईल. देवाची धूपार्ती झाल्यावरच या गांवीं जेवणाची रीत आहे. तेव्हां तुम्हींही आमच्या बरोबर धूपार्ती पाहून आल्यावर जेवावें. मग समुद्रकांठीं आमच्या सेवानिवृत्त मामलेदारबंधूंच्या खुल्या बैठ्या बंगल्यांत खाटेवर निजा म्हणजे तुम्हांला येथल्या सध्यांच्या उन्हाळ्यासारख्या दिवशीं सुद्धां स्वस्थ झोप येईल. येथें देव, शिवलिंगें व तीर्थें इतकीं आहेत कीं तीं सर्व पहावयाचीं म्हटल्यास एक आठवडाही


पुरणार नाहीं. पण सामान्यतः यात्रेकरू दोनतीन दिवस येथें राहून मुख्य देवांचें दर्शन घेतात व मग परत जातात. तुम्हांला इतकी सवड नसल्यास तुम्हीं निदान उद्यांचा सबंध दिवस रहा म्हणजे आज व उद्यां मिळून तुम्हांला मुख्य यात्रास्थानें पहातां येतील. मग परवां सकाळीं **कुमठ्यास** जाण्यास तुम्हांस मोटारबस मिळेल." भटजींना मी हंसत म्हणालों "युरोपांतील वाटाडे किंवा मार्गदर्शक पुस्तकें, आठवड्याचे, अर्ध्या आठवड्याचे दृश्य–दर्शनक्रम दाखवून देतात, त्याप्रमाणें आपण मला तीन क्रम सांगितले. मला शेवटचा क्रम सोयीचा आहे." मग लगेच मी कुमठ्यास गावसकर (त्या गांवच्या **गिब** हायस्कूलच्या वसतीगृहाचे सुपरिंटेंडेंट) यांस कार्ड लिहिलें व टपालच्या पेटींत तावडतोब टाकविण्यास भटजींजवळ दिलें.

भटजींनीं घरांतून तीन नारळ घेऊन माझ्याबरोबर देवळास व रामतीर्थास जाऊन येण्यास आपल्या भावास फर्माविलें. त्याप्रमाणें तो आला. प्रथमतः आम्ही घरानजीक असलेल्या गणपतीच्या देवळांत गेलों. या देवळासभोंवार तांबड्या जांभ्या दगडाचा प्राकार आहे; प्रदक्षिणा–मार्ग फरसबंदी आहे. देवळाच्या प्रवेशद्वाराच्या पुढच्या दगडी सहा खांबांच्या कमानींना लागून लोखंडी कुलुप ठोकलेला खुजा कठडा आहे. गांवचीं पोळ सोडलेलीं गुरें देवळांत शिरूं नयेत म्हणून देवळांना व सर्व घरांना अशाच प्रकारचे कठडे करतात असें भटजींचे भाऊ म्हणाले. कठडा ओलांडून आंत गेल्यावर छोटासा सभामंडप लागला. गाभाऱ्याचें दार बंदच होतें. पण लाकडी फळयांना मोठालीं भोकें असल्यामुळें गणपतीच्या मूर्तीचें मीं दर्शन घेतलें. नंतर आम्हीं महाबळेश्वराच्या देवळांत गेलों. या देवळाचें आवार खूप मोठें आहे व त्या आवारासभोंवार ओवऱ्या बांधण्याचें काम चालू आहे असें दिसलें. येथेंही गाभाऱ्यांतील शिवाची उंच पिंडी आम्हांला दुरूनच पहावी लागली. नंतर आम्ही ताम्रपर्णी देवीच्या देवळांत जाऊन पूर्वीप्रमाणेंच दुरून दर्शन घेऊन परत भटजींच्या

वाड्यांत आलों. मग थोडेसें गांवांत भटकून साडेपांच वाजतां समुद्र-किनारीं आलों. तोंच एक हिरवट घाणेऱ्या खाऱ्या पाण्याचा ओढा दिसला. आपल्या सर्व तीर्थस्थानीं असे घाणेरडे नाले किंवा ओढे अगर पाण्याचे पाट असतात. असे ओढे बुजविले जावे असें माझ्या मनांत आलें. पण या खाऱ्या खाडीवजा ओढ्यावरील छोटा सुबक पूल व दोन्ही बाजूचे सुंदर कठडे पाहून मनाला आनंद वाटला. लगेच सुंदर वालुकामय वाळवंट लागलें. पिवळसर, बदामीरंगी, बिन खड्याची, बिन मातीची, गुळगुळीत व पायाला गादीसारखी मऊमऊ लागणारी वाळू तुडवीत जातांना मौज वाटली. हें वाळवंट बरेंच लांबरुंद आहे. समोर तो फेसाळणाऱ्या शुभ्र लाटांनीं भूमिमातेस व महाबळेश्वर देवाला लोटांगणें घालणारा समुद्र, दक्षिणेस समुद्रांत घुसलेली तांबडी मुरमाची रामतीर्थाची टेकडी, उत्तरेस हिरव्यागार रानानें अलंकृत केलेला भूमिभाग व पलीकडे गंगावली नदीची खाडी, पूर्वेस नारळांच्या वृक्षांची रांग व गोकर्ण गांवचीं मधून मधून डोकावणारीं घरांचीं कौलारू छपरें; हा देखावा फार प्रेक्षणीय वाटला व मला दोन वर्षांपूर्वी पाहिलेल्या पुळयाच्या गणपती देवळाच्या वाळवंटाची व पुळें गांवची आठवण झाली. इतकें या दोन देखाव्यांत साम्य आहे. मात्र पुळयाच्या गणपतीच्या देवळाला लागून सभोंवार प्रदक्षिणामार्गाच्या पायऱ्या असलेली व स्वयंभू गणपतीचा भाग गणलेली गर्दछाय टेकडी आहे, तर उजव्या बाजूस तशीच पण नवा मोटार रस्ता केलेली सांगली-च्या राजेसाहेबांच्या मालकीची सुंदर गर्दछाय टेकडी आहे. पण गोकर्णास डाव्या बाजूची रामतीर्थ टेकडी देवळापासून बरीच दूर आहे, तर उजव्या हातास टेकडी मुळींच नसून समुद्रसपाट भूमिभाग आहे. बाकी दोन्ही ठिकाणचा समुद्र व वाळवंट सारखेंच सुंदर आहे असें मला वाटलें.

टेकडीच्या कांठचें देऊळ व तीर्थ आाणि विशेषतः सूर्यास्त अंधार पडण्यापूर्वी पाहण्यास सांपडावा म्हणून आम्ही भराभर वाळू तुडवीत चालूं लागलों. पण पाय सुळसुळीत वाळूंत पाऊल पाऊल खोल रुतत. यामुळें

साध्या पाऊलवाटेप्रमाणें आम्हांस जलद चालतां येईना. म्हणून आम्ही समुद्रपाण्याच्या अगदीं कडेवरून जाऊं लागलों. ही वाळू लाटांनीं भिजलेली असल्यामुळें बरीच राठ झाली होती. येथून जरा जलद चालून आम्ही खडकाळ टेकडीशीं आलों. येथले खडक मांडीभर उंच असल्यामुळें भटजींच्या हाताची मदत घेऊन मला चढावें लागलें. नंतर तांबडी राठ पायवाट लागली. पुढें रामनाथाच्या कुंडाच्या काँक्रीटच्या पायऱ्या लागल्या. दहा वीस पायऱ्या चढल्यावर आम्ही जिवंत झऱ्याचे तीर्थकुंडाशीं आलों; तोंच आणखी आठ दहा पायऱ्यांचे उंचीवर काँक्रीट सभामंडपाचें रामतीर्थाचें देवालय दृष्टीस पडलें. त्या आठ दहा पायऱ्या चढल्यावर पांढऱ्या शुभ्र काँक्रीट खांबालगींचा व सपाट काँक्रीट पटईचा प्रशस्त मंडप पाहून मला फार आनंद वाटला. समोर लहानशी काँकीटची छोटी देवळी होती व त्यांत काळया कुळकुळीत दगडाच्या राम, लक्ष्मण व सीता यांच्या सुबक मूर्ति होत्या. डाव्या हातास एका कमानीखालीं त्या देवळाच्या प्रस्थापक गोसाव्याची समाधि दिसली. टेकडीच्या माथ्यावर घुमटाकार शिखराची काळवंडलेली दुरून मशिदीसारखी दिसणारी इमारत दिसली. पण ती इमारत म्हणजे त्या गोसाव्यानें तेथें प्रथम बांधलेलें रामाचा भाऊ भरत याचें देवालय होय असें भटजींनें सांगितलें. पण तेथें जाण्यास शंभर दीडशें पायऱ्या चढाव्या लागणार असें कळतांच तें अनाकर्षक देऊळ पाहण्याचें मीं टाळलें. त्या देवळापेक्षां सूर्यास्ताचा निसर्गरमणीय देखावा पहाणेंच मला जास्त प्रिय असल्यामुळें आम्ही रामनाथाचे देवळामागील दगडी चौथऱ्यावर जाऊन बसलों, तोंच सूर्यबिंब समुद्रसीमेवर आलेलें दिसलें. आतां त्याचा प्रखरपणा व डोळे दिपविणारा प्रकाश पुष्कळ कमी झाला होता. इतक्यांत पिवळसर होत जाणाऱ्या त्या बिंबाची खालची कोर पाण्याला टेकलेली दिसली; व दर क्षणाला ती पाण्यांत अधिक अधिक बुडत आहे असें भासलें. तीन चार मिनिटांत सर्व बिंब ‘ समुद्रास्तृप्यंतु ’ झालेसें वाटलें. आज आकाशाचा रंग लाल झाला नाहीं. मात्र लगेच अंधार पडूं लागला. म्हणून आम्ही झपाझप पायऱ्या, पाऊलवाट व खोल



कोटी तीर्थ, गोकर्ण.




महाबळेश्वर, गोकर्ण.



गणपति, गोकर्ण.



त्रिकुटेश्वराचें देऊळ, गदग.



वीरनारायणाचें देऊळ, गदग.

खडक उतरून सुखस्पर्श वाळवंटावर आलों; तोंच सर्व आकाश तांबडें-लाल दिसूं लागलें. समुद्रकांठचा सायंकाळचा सूर्यास्ताचा देखावा कोठेंही पहा, तो सदा आनंददायी असतो खरा.

परत आल्याबरोबर देवळांत दिव्यांची रोषणाई झाली आहे व धूपार्तीस सुरवात झाली आहे, असा बाळंभटांकडून निरोप आल्यामुळें आम्ही आरती पहावयास गेलों. आरतीची गंमत वाटली, पण हवा येण्यास मार्ग नसल्यामुळें मला देवळांत गुदमरल्यासारखें झालें. दुसऱ्या दिवशींहि मी आरतीला गेलों होतों. त्या दिवशीं सुद्धां आरती व दिव्यांची रोषणाई पेहाण्यालायक होती.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे माझ्या गोकर्णनिवासाच्या शेवटच्या दिवशीं आम्ही "ब्रह्मचर्याश्रम" पहावयास गेलों. आश्रम म्हणजे उंचवठ्यावर दहाबारा झोपड्या होत्या. त्यांत दहाबारा विद्यार्थी व आश्रमाचे गोसावीबुवा रहात होते. ते म्हणाले, "मी पहिल्यापासून ब्रह्मचारी नाहीं. वैतागानें एका गोसाव्याच्या तांड्यांत शिरलों. तांड्यासमवेत सगळ्या तीर्थयात्रा केल्या; काशीस संस्कृतहि शिकलों; व आतां येथें वस्ती केली आहे व माझ्या विद्यार्थ्यांना मी संस्कृत शिकवितों." नंतर आम्ही बोवांचा निरोप घेऊन बाहेर वाळवंटावर गेलों.

आतां गोकर्णाची दंतकथात्मक व ऐतिहासिक माहिती द्यावयाची राहिली. तुला पुराणें वाचण्याचा नाद आहे; तेव्हां तूं या दंतकथा ऐकल्याही असशील. हें क्षेत्र फार जुन्या काळापासून प्रख्यात आहे. रामायण व महाभारत यांत त्याचा उल्लेख आहे. भगीरथानें या ठिकाणीं हिमालया-वरून गंगा आणली व येथून ती पाताळांत नेऊन आपल्या पितरांना मोक्ष दिला. परशुरामानेंही याच ठिकाणीं तप केलें. 'गोकर्ण' हें नांव कसें पडलें याची विलक्षण हकीकत सांगण्यांत येते. ब्रह्मदेवानें रुद्राला सृष्टि निर्माण करण्यास सांगितलें. पण रुद्र समुद्राखालीं जो दडून बसला तो वरच येईना. कंटाळून ब्रह्मदेवानें स्वतःच सृष्टि निर्माण करण्यास

प्रारंभ केला व प्रथमतः पृथ्वी व प्राणी निर्माण केले. पण यामुळें रुद्र रागावला व त्यानें स्वयंभू महादेवाच्या मोठ्या पिंडीवर प्रहार केला. यायोगें त्या पिंडीमध्यें खळगी झाली. गणपतीच्या डोक्यावरची खळगी व पिंडी-वरील खळगी या दंतकथेचें प्रत्यंतर आहेत असें भाविक लोक समजतात.

या तीर्थाचा पहिला ऐतिहासिक उल्लेख आठव्या शतकांतला आहे. दुसऱ्या कादंब राजघराण्याचा प्रस्थापक मयूरवर्मा यानें आपली बहीण गोकर्णाच्या ललितादित्य राजाला दिली, असा तो उल्लेख आहे. विजयानगर-चें साम्राज्य स्थापन झाल्यावर तेथल्या सम्राटांनीं गोकर्ण क्षेत्राला देणग्या दिल्याचे उल्लेख इ. स. १४५० ते १५५० पर्यंत आढळले आहेत. १५०८ मध्यें तर विजयानगरचा कृष्णराय हा जातीनें गोकर्णास आला होता व त्यानें तेथें आपली सुवर्णतुला करविली असें मॅक नांवाच्या प्रवाशानें लिहिलें आहे. इ. स. १६७६ मध्यें इंग्रज प्रवासी फ्रायर हा गोकर्णास महाशिवरात्रीच्या जत्रेच्या दिवसांत आला होता. त्याला मिळालेल्या सल्ल्याप्रमाणें त्यानें व त्याच्या सोबत्यानें मोंगल लोकांसारखा पेहेराव केला. तेव्हां त्याला महाबळेश्वराच्या देवळापर्यंतचा सर्व बाजार व जत्रा पाहतां आली. ही जत्रा फार मोठी होती. सर्व हिंदुस्थानांतून यात्रेकरू जमले होते. मोठ्या प्रचंड रथावर बसविलेली शिवाची मूर्ति व तिची शेंकडों दिव्यांच्या उजेडांतील हजारों यात्रेकरूंनीं गजबजलेली मिरवणूक फ्रायरला पहाण्यास मिळाली. त्यानें केलेलें सविस्तर विलक्षण वर्णन वाचण्यासारखें आहे. ह्या दंतकथा व ही ऐतिहासिक माहिती तुला मनोरंजक वाटेल म्हणून थोडक्यांत देऊन हें पत्र पुरें करतों. कळावें, हे आशीर्वाद.

तुझा **दादा**

ता. क. लिहिण्याच्या घाईत **गोकर्ण** नांव या तीर्थाला कसें पडलें या-बद्दलची पौराणिक दंतकथा सांगण्याचें राहून गेलें. ती कथा अशी:—

ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण करण्याचें काम त्यांच्याकडे सोंपविण्याकरितां चार ऋषी उत्पन्न केले. त्यांनीं तें काम करण्याचें नाकारलें; व म्हणून

ब्रह्मदेवानें शिव किंवा रुद्र या देवाला आपल्या कपाळांतून उत्पन्न केलें. रुद्र ब्रह्मदेवास म्हणाला "मीं निर्माण केलेल्या सृष्टींत नाशवंत वस्तू असतां कामा नये पण अशी अविनाशी सृष्टि निर्माण करण्याची योजना करण्याकरितां मला चिरकाल व एकांतांत विचार करीत बसलें पाहिजे." ब्रह्मदेव म्हणाला, "कांहीं हरकत नाहीं. पण, तूं लगेच कामाला लाग." त्याप्रमाणें रुद्र समुद्रांत बुडी मारून बसला तो युगानुयुगें सरलीं तरी बाहेर येईना. ब्रह्मदेवानें कंटाळून स्वतः पृथ्वी निर्माण करून ती जीवजंतूंनीं भरून टाकली. ही बातमी रुद्राला कळली. तेव्हां आपल्या त्रिशूळाच्या साहाय्यानें तो पृथ्वीचे पोटांतून बाहेर येऊं लागला; तोंच पृथ्वीनें गाईचें रूप घेतलें व तिनें **शिवदेवाला** आपल्या कानांतून बाहेर येण्यास विनंति केली. तदनुरूप शिव गाईच्या कानांतून बाहेर आला तें ठिकाण गोकर्ण नांवानें प्रख्यातीस आलें. गोकर्ण गांवांतील ताम्रपर्णी देवीच्या बागेंत रुद्रयोनी किंवा रुद्रमार्ग नांवाचें भोक अजून दाखवितात. शिवाचा राग शमविण्यास्तव ब्रह्मा व विष्णू यानीं संहाराचें सर्व काम सर्वदा त्याच्याकडे सोंपविलें व मग त्रिवर्ग **पुष्कर**-तीर्थाच्या तीन कुंडांत जाऊन बसले.

४

कुमठा
१९ नोव्हेंबर १९४१

चि. नाना, वकील, रोहें, यास.

अनेक आशीर्वाद विशेष. ता. १९ नोव्हेंबर रोजीं सकाळीं साडेसात वाजतां आपले गोकर्णतीर्थाचे उपाध्याय यांचा निरोप व आशीर्वाद घेऊन मी **कुमठ्याला** जाणाऱ्या मोटारबसच्या तबेल्याशीं आलों. बस रस्त्यावरच उभी होती. तास दीड तास थांबल्यावर शेवटीं एकदांची मोटार चालू झाली. मोटार चिक्कार भरली होती. दहापंधरा मिनिटांतच आम्ही **अघनाशिनी** (लौकिक किंवा गॅझेटीयरमधील नांव ताद्री) नदीनजीक आलों. येथेंच असलेल्या **सानिकट्टा** या गांवीं येथील प्रसिद्ध मिठागर आहे. जरी मोटारगाडीच्या रस्त्यानें ही नदी गोकर्णापासून तीन मैलांवर आहे तरी तिचें मुख गोकर्णक्षेत्रानजीक आहे. पूर्वकाळीं जलमार्गानें यात्रेस येणारे यात्रेकरू या नदीच्या मुखाजवळील ताद्री नांवाच्या बंदरीं उतरून गोकर्णीस येत असत. अघनाशिनी नदीवर सानिकट्टयास सखल फरशीवजा पूल आहे. तो टाकल्यावर **मादनगिरी** गांव लागलें. हें गांव टाकल्यावर पुन्हां मोटार झपाट्यानें चालू झाली.

गोकर्णापासून कुमठ्यापर्यंतचा दहा मैलांचा भूमिभाग साधारणतः सपाट आहे. या ठिकाणीं डाव्या बाजूचे डोंगर बरेच दुरावलेले दिसले. मात्र ते किर्र रानानें व्याप्त असल्यामुळें हिरवेगार दिसत होते. बाकी, भातशेतीची जमीन पिकें कापून घेतल्यामुळें खुली व खुरट्या तांबूस गवतानें आच्छादलेली होती. यामुळें देखावा रुक्ष व किंचित् उजाड वाटला. नाहीं म्हणायला मधून मधून उसाचे हिरवेगार मळे लागत होते; तेवढाच डोळ्यांला मनोहर वाटणारा देखावा. तास दीड तास प्रवास केल्यावर **मिर्जान** हें गांव लागलें. येथेंच मिर्जानचा प्रसिद्ध

भुईकोट किल्ला आहे; लौकरच पुन्हा अघनाशिनी नदीचें पात्र लागून आमची मोटारबस उतारूंसह दोन होड्यांवर कठडा असलेल्या तराफ्यावर चढविण्यांत येऊन आम्हीं नदी ओलांडली; अशा तऱ्हेच्या मोटारी, बैलगाड्या वगैरे वाहनें नदीवरून नेण्याची व्यवस्था कारवार जिल्ह्याव्यतिरिक्त दुसऱ्या जिल्ह्यांत क्वचितच दृष्टीस पडते. निघाल्यापासून दोन एक तास झाले तरी **कुमठा** येण्याचें चिन्ह दिसेना. पण पूर्वेकडच्या आमच्या डाव्या बाजूस 'शिरशीकडे' अशा अक्षरांची रस्त्याच्या तिठ्यावरची पाटी दृष्टीस पडली व त्यावर 'कुमठा १ मैल' असा मैलाचा आंकडा पाहून एकदांचा, गर्दीचा व त्रासाचा प्रवास संपला म्हणून मला वरें वाटलें. येथें बरेच उतारू उतरून शिरशीस जाणाऱ्या बसमध्यें बसले व मग आमच्या मोटारींतील गर्दी पुष्कळ कमी झाली. लवकरच **कुमठ्याच्या** जकातनाक्याजवळ मोटार थांबली, तोंच माझे माजी विद्यार्थी व सध्यां गिबहायस्कूलच्या विद्यार्थीवसतिगृहाचे देखरेख करणारे शिक्षक रा. गावसकर टांगा घेऊन शाळाशिपायांसह नाक्याशीं उभे! आधीं पत्रानें कळविलें असल्यानें त्यांनीं मला ताबडतोब ओळखलें व मीही त्यांना सहज ओळखूं शकलों. ते म्हणाले, "गांव येथून बरेंच दूर आहे. शिवाय वसतिगृहाच्या प्रवेशदरवाजाशीं रस्तादुरुस्तीचें काम चालूं आहे; यामुळें मोटारबस आवारांत येऊं शकत नाहीं. तेव्हां आपण टांग्यानें वसतिगृहाच्या मागील बाजूला जाऊन भिंतीमधील दगडाच्या चिळणींमधून आवारांतील पाऊल वाटेनें माझ्या खोलीशीं जाऊं. येथून वसतिगृह अगदीं नजीक आहे." असें म्हणून गावसकरांनीं माझें सामान शिपायाकडून टांग्यांत ठेविलें व आम्ही निघालों.

थोड्याच वेळांत डावीकडे जांभ्या दगडाची सुबक भिंत लागली व अत्यंत अरुंद फटींतून आम्ही आंत शिरलों. छोटीशी बाग मागें टाकून आम्ही वसतिगृहाच्या एका खोलीशीं आलों. गावसकर म्हणाले, "वसतिगृहाची ही मागली बाजू आहे. पण येथूनच्याच खोल्या माझ्याकडे

आहेत." खोलीच्या दारांतून आम्ही वसतिगृहांत शिरलों. पण तेथें शुकशुकाट पाहून मीं आश्चर्यानें मास्तरांस विचारलें, ‘ येथें मुलें किती रहातात? ’ ते उत्तरले ‘हें तीन सोप्यांचें मोठें वसतिगृह विद्यार्थ्यांनीं गजबजलेलें होतें. पण, अलीकडे गांवोगांव इंग्रजी शिक्षणाची सोय झाल्यामुळें वसतिगृहांतील पूर्वीची गर्दी व गडबड पार नाहींशी झाली व सध्यां येथें पंधरावीसच विद्यार्थी रहातात व रिकाम्या खोल्या माझ्यासकट चार शिक्षकांस रहावयास दिल्या आहेत. माझ्या खोल्यांतही तुम्हांला आमच्या मंडळींची गडबड दिसत नाहीं. कारण, मुलांना घेऊन माझी पत्नी कारवारास गेली आहे. सध्यां माझी आजारांमुळें पायानें पंगू झालेली मुलगी व मी असे येथें राहतों व म्हणून आम्ही वसतिगृहाच्या क्लबामधून ताटें आणवितों. तुम्ही आलां म्हणून मुलांची पंगत उठल्यावर आचारी अन्न आमच्या खोलींत आणून आपल्यास वाढील." या हकीकतीनें माझें आश्चर्य दूर केलें.

आमचीं स्नानें होत आहेत तों आचारी भाजी, भात व पोळी यांचीं भांडीं घेऊन आला. कॉलेजच्या जुन्या आठवणी काढीत आमचें जेवण झालें. मग गावसकर मास्तर शाळेला गेले व मी कारवार गॅझेटीअर चाळीत बसलों. चार वाजतांना गावसकर शाळेंतून आले. मग चहा-फराळ करून आम्ही कुमठा गांव पहाण्यास निघालों.

जकातनाक्यापासून एक मैलावर डाव्या बाजूस वसतिगृह व उजव्या बाजूस हायस्कूलच्या इमारती बांधलेल्या दिसल्या. नाकें व जुनें गांव यांचेमध्यें तांबडीलाल टेकड्यांची ओळ आहे. या टेकड्यांच्या तीन्ही बाजूस नवे बंगले व इमारती गेल्या वीस वर्षांत बांधण्यांत आल्या आहेत व मधून मोठा प्रशस्त नवा रस्ता करण्यांत आला आहे. हा रस्ता टेकडीच्या माथ्यानजीक दहा दहा फूट खोलीची खोदाई करून केलेला आहे. कुमठ्याच्या नव्या वस्तीचा हा सुंदर रस्ता पाहून मला महाबळेश्वरच्या नवी मालकम पेठ व सातारा रस्ता यांना जोडणाऱ्या खिंड रस्त्याची

आठवण झाली. कुमठ्याच्या खिंड रस्त्यांतून दोन्ही बाजूंचा नयनमनोहर देखावा पहात आम्ही टेकडीच्या तळाशीं आलों, तोंच टेकडीला वळसा घालून आलेला रस्ता उजवीकडे दिसला. तो सपाट व बिनखोदलेला आहे. येथून जुनें गांव लागलें.

प्रथमतः आम्ही अण्णासाहेब पै यांच्या प्रशस्त व भव्य वाड्यांत गेलों. माझी मालकाशीं ओळख करून दिल्यावर गावसकर म्हणाले, " रावसाहेब पै हे या जिल्ह्यांतील मोठे जमीनदार आहेत. ते गिब हायस्कूलच्या गव्हर्निंग बॉडीचे अध्यक्ष, नगरपालिकेचे प्रेसिडेंट व येथल्या गौडसारस्वत मठाचे सरपंच आहेत." इतकें गावसकर सांगत आहेत तोंच कॉफी व शहाळ्याचें खोबरें मेजावर तयार. त्याचा स्वीकार व स्वाहाकार करून आम्ही अण्णासाहेबांच्या वाड्याच्या बागेंतून मागील दारानें बाहेर पडलों व एक बोळ ओलांडून मुख्य मोठ्या रस्त्यावर आलों व संध्याकाळ होत चालली म्हणून आल्या वाटेनें टेकडीचे माथ्याच्या रस्त्याशीं आलों. टेकडीवरील हवाशीर व खुल्या अंगणाच्या बंगल्यांत रावसाहेब शिखरे सबजज्ज राहतात त्यांचेकडे गेलों. ते पुण्याच्या प्रख्यात डॉक्टर शिखऱ्यांचे थोरले चिरंजीव असल्यामुळें त्यांचा माझा श्रुतिपरिचय होता. त्यांनीं आमचें स्वागत केलें व मग ते आपल्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या विलायतेंतील विद्याभ्यासासंबंधीं व त्यांच्या परीक्षांतील यशाबद्दल बोलले. याप्रमाणें तास दीड तास गप्पा गोष्टी झाल्यावर व दुसऱ्या दिवशीं रात्रीं त्यांचेकडचें जेवणाचें निमंत्रण आनंदानें स्वीकारून मास्तर व मी साडेआठाचे सुमारास बिऱ्हाडीं आलों. भोजन झाल्यावर दुसऱ्या दिवशींच्या दृश्यदर्शनाचा बेत ठरविला व साडेनऊ दहाचे सुमारास आम्ही झोपी गेलों.

ता. २० नोव्हेंबर सन १९४१ रोजीं चहा व केळ्याचा मुरंबा घेऊन आम्ही सकाळीं साडेसात वाजतां बाहेर पडलों. आज सभोंवारचा नव्या वस्तीचा देखावा आदल्या संध्याकाळच्यापेक्षां जास्त सुंदर व आकर्षक दिसत होता. जेथें टेकडीची दहा फूट खोल खोदाई

केली होती व जेथून दोन तीन रस्ते दूर गांवांना गेले होते, त्या रस्त्यांच्या तिठ्यावर कॉंक्रीट चौथऱ्यावर गॅसबत्तीकरितां पांढरा शुभ्र खांब पाहून मला नगरपालिकेच्या सुव्यवस्थेबद्दल नवल वाटलें; पुढें प्रत्येक तिठ्यावर असे खांब व दिवे केलेले आहेत असें मला दिसून आलें. आदल्या सायंकाळीं आम्हीं रा. सा. पै यांच्या वाड्यापर्यंतचा भाग पाहिला होता; पण तो अंधुक प्रकाशांत पाहिल्यानें स्पष्टपणें दिसला नव्हता. पण आतां सकाळच्या चकचकीत प्रकाशांत शहराचा देखावा आकर्षक वाटला. डाव्या उजव्या बाजूस न्यायाधीश, मामलेदार, वगैरे अंमलदारांच्या कोर्टकचेऱ्यांच्या इमारती व नीटनेटके बंगले व बंगलेवजा वाडे लागले. येथल्या इमारतींच्या आवारांना जांभ्या दगडांच्या तांबड्या-लाल खुजा भिंती असून दारासमोर लोखंडी खुजा कठडा किंवा दोन दगडी खांबांमध्यें अरुंद फट असते. मौजेनें गांवाची शोभा पहात आम्ही रावसाहेब पैंच्या वाड्यांत शिरलों. ते आमची वाट पहात होते. त्यांच्या समवेत प्रथम आम्हीं नगरपालिकेच्या कचेरीची दुमजली इमारत पाहिली. दुसऱ्या मजल्यावरील सभेचा दिवाणखाना प्रेक्षणीय वाटला. " रा. सा. रामचंद्र आण्णा पै माजी म्युनिसिपल प्रेसिडेंट हॉल, १९२९ " या नांवाची पाटी व कै. रामचंद्र पै यांची तसबीर यांनीं नकळत पै घराण्याची समाजसेवावृत्ति समजून आली. नंतर आम्हीं नजीकच्या गौड-सारस्वत मठाची मोठी इमारत पाहिली. या इमारतींतला दुसऱ्या मजल्या-वरील लांबचलांब व उंच बांधणीचा दिवाणखाना प्रेक्षणीय वाटला. मठाचें जमीनजुमल्याचें उत्पन्न ४००० रु. पर्यंत येतें. यात्रेकरूंकडून दाक्षिणेच्या व देणगीच्या रूपानें उत्पन्न येतें तें निराळेंच. नंतर डाव्या हाताच्या बोळानें नारळी बागांच्या सावलींतून जाऊन आम्ही एका देवळाच्या देवडीच्या दरवाजाशीं आलों. त्यावर " **शांतिका देवी परमेश्वरीचें देवालय** " असें काळ्या कुळकुळीत तैलरंगांतील नांव वाचलें. पण या देवीचा लौकिक व पूर्वीपासूनचें नांव " **शांताम्मा** " आहे असें पै यांनीं सांगितलें. पूर्वाभिमुखी हें देवालय फार सुरेख वाटलें. कॉंक्रीटच्या बिनखांबी

लांबचलांब बहालांनीं व वरच्या पिवळ्या रंगाच्या पटईनें व तळाच्या संगमरवरी गुळगुळीत विटांच्या फरसबंदीनें शोभायमान झालेला तो सभामंडप फारच भव्य व आकर्षक दिसला. देवीची नवी काळीकुळकुळीत मूर्ति डाव्या बाजूच्या मखरांत ठेवलेली दिसली. मुख्य गाभाऱ्याचें व मखराचें काम पुरें करीत आणलेलें दिसलें. विधिपूर्वक देवीची प्रतिष्ठा देवळाचें सर्व काम आटोपल्यावर सुमुहूर्तावर करण्याचा विचार आहे असें पै म्हणाले. उजवीकडच्या बाजूला देवीचे दागदागिने, मठाची रोख शिल्लक व हिशेबाचे कागदपत्र वगैरे ठेवण्याकरितां अग्निप्रतिबंधक खोली बांधण्यांत आली आहे.

गाभाऱ्यावर सोनेरी रंगाचा घुमट बांधला आहे. या देवीच्या मखराला लागून जुनें मोठें वारूळ होतें तें तसेंच ठेवलें आहे. मात्र इमारतीच्या एकंदर रंगाशीं वारुळाचा योग्य मिलाफ व्हावा म्हणून वारुळाला पिवळसर रंग दिला आहे. सभामंडपाच्यावर भली मोठी तांबड्या कॉंक्रीटची सुंदर गच्ची केली आहे. गाभाऱ्यावर व समोरच्या देवडीवर एकंदर चार खोल्या काढल्या आहेत. त्या मठाच्या कारकुनांकरितां, पंचांकरितां व सरपंचांकरितां उपयोगांत यावयाच्या आहेत. देवडीच्या एका बाजूला एक लाकडी नक्षीचा प्रशस्त जिना काढला आहे. देवळाच्या उजव्या बाजूस पांढऱ्या शिंपांची पाऊलवाट असलेलीं व फुलझाडें, पानझाडें व लहान नारळीचीं रोपें यांनीं अलंकृत बाग आहे. आवाराला तांबडीलाल भिंत घातली आहे. देवळाला सुमारें तीस हजार रुपये लागले आहेत असें कळलें. अर्वाचीन बांधकलेचें हें देवालय कुमठा गांवांतील दृश्यांचा मुकुटमणि होणार असें मला वाटलें. हें देवालय रा. सा. अणासाहेब यांचे बंधु रा. म्हाळप्पा पै यांनीं विशेष मेहनत घेऊन तयार करविलें आहे.

बरेंच ऊन झालें म्हणून आम्ही पैंचे आभार मानून परत वसतिगृहाकडे चाललों. टेकडीच्या माथ्याजवळच्या तिठ्याशीं येतों तों पब्लिक वर्क्स खात्याचे त्या तालुक्याचे अधिकारी रावसाहेब खेडकर सायकलीवरून

येतांना भेटले. आम्हांला पहातांच ते पायगाडीवरून उतरले व आग्रह करून आम्हांला त्यांनीं आपल्या बंगल्यावर नेलें. आमचें हार्दिक स्वागत करीत ते मला म्हणाले, " प्रिन्सिपॉलसाहेब, तुम्हीं मला ओळखणें शक्य नाहीं. पण मी आपला विद्यार्थी व आपल्या थोरल्या मुलाचा वर्गबंधु होतों. एंजिनियरिंग कॉलेजच्या वर्कशॉपमध्यें शिकून परीक्षा पास होऊन मी पब्लिक वर्क्स खात्यांत नोकरी धरली. त्या पेशानें मी सन १९३७-३८ सालीं कांहीं महिने महाडास असल्यामुळें आपल्या डॉक्टर वसंतरावांची व माझी चांगली ओळख झाली. तुमच्या वकीलबंधूंची ओळख तर आश्चर्यकारक रीतीनें झाली. एकदां मी खोपोली मार्गानें पुण्याहून चिपळूणकडे जात होतों. मोटारींत तुमच्या बंधूंची व माझी गांठ पडली. बोलणें-चालणें होऊन ओळख झाली. माझा व त्यांचा बिछाना रंगानें व आकारानें सारखा असल्यामुळें हमालानें घाईंत आमच्या बिछान्यांची अदलाबदल केली. घरीं पोहोंचल्यावर बिछाना उघडतों तों त्यांत भाटे वकिलांचीं कायद्याचीं लठ्ठ लठ्ठ पुस्तकें व कागदपत्रें ! बिछान्याच्या अदलाबदलीबद्दल दिलगिरीचीं पत्रें आम्हीं एकदमच एकमेकांस लिहिलीं. महिनापंधरा दिवसानंतर आम्हीं आपापले बिछाने आणविले. माझी महाडास बदली झाली असतांना तुमचे बंधु एकदोन वेळ भेटले व आमचा परिचय दृढ झाला."
अशी लघुकथावजा कहाणी संपते न संपते तोंच त्यांच्या ब्राह्मणानें उपीटांच्या बशा व कॉफीकप मेजावर आणून ठेविले. त्यांचा स्वाहा करीत मीं खेडकरांना विचारलें, " होनावर, चित्रापुर व भटकळ हीं तीन स्थळें शनिवार आदितवार या दोन दिवसांत पाहून आदितवारीं सायंकाळीं आम्हांला येथें परत येतां येईल काय ? असें साधन असल्यास गावसकरांना एकाच दिवसाच्या किरकोळ रजेनें माझ्याबरोबर दोन दिवस सहप्रवास करावयास सांपडेल." खेडकर उत्तरले, " हें तुम्हांस सहज साधेल. तुम्ही येथून शनिवारच्या सकाळच्या साडेसहाच्या मोटारबसनें दहा मैलांवर असलेल्या होनावर बंदरास जा. तेथें साडेबारापर्यंत दृश्यदर्शन आटोपून चित्रापुरास जा; मग तेथला मठ व छोटेगांव पाहून सायंकाळीं साडे-

सहाला तेथून निघून चारच मैलांवर असलेल्या भटकळ बंदरास जा. मात्र भटकळ पाहण्यास फारसा वेळ मिळणार नाहीं. पण आदितवारच्या सकाळच्या मोटारबसनें निघून तडक होनावरास येऊन तेथें जेवणखाण आटोपून तुम्हांला आदितवारीं सायंकाळीं कुमठ्यास सहज परत येतां येईल." अर्थात् हा बेत आम्हां दोघांना पसंत झाला. रा. खेडकरांचा निरोप घेऊन आम्हीं बाराच्या सुमारास बिऱ्हाडीं आलों. जेवण आटोपून शाळेंत जातांना गावसकर म्हणाले, "वरच्या वर्गांतील विद्यार्थी, शिक्षकमंडळी, कोर्टांतील वकील लोक व गांवांतील आपले माजी विद्यार्थी यांचेपुढें आमच्या स्कूलच्या दिवाणखान्यांत 'अर्वाचीन शिक्षणाचे उद्देश' या विषयावर आपलें इंग्रजींत व्याख्यान ठरविलें आहे व रावसाहेब शिखरे यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे. तरी मी आज शाळेंतून लवकर येईन व आपल्यास शाळा दाखवीन. साडेचार वाजतां शिखरे कोर्टांतून आल्याबरोबर व्याख्यान सुरू करतां येईल." गावसकर शाळेंत गेल्यावर मी व्याख्यानासंबंधीं विचारांची जुळवाजुळव करीत आरामखुर्चीवर पडलों.

साडेतीन वाजतां गावसकर बिऱ्हाडीं आले. चहाबिस्किटें खाऊन आम्ही शाळेकडे निघालों. मुख्य रस्त्यावर येतों तोंच शाळेच्या सुबक इमारती टेकडीच्या माथ्यावर दिसल्या. लगेंच टेकडी चढण्यास जांभ्या दगडाच्या जिन्यासारख्या सुंदर पायऱ्या लागल्या. पुण्याच्या पर्वतीच्या-सारख्या पन्नासपाऊणशें पायऱ्या चढल्यावर शाळेचें प्रयोगालय, वाचना-लय व क्रीडांगण लागलें. त्यावर नजर टाकून आम्हीं आणखी दहाबारा पायऱ्या चढलों. तेव्हां टेकडीचा माथा आला. हें टेकडीचें पश्चिम टोंक आहे. तेथून गर्द झाडींत गडप झालेला गांव व पलीकडचा नीळसर रंगाचा आरबी समुद्र हा देखावा चित्ताकर्षक वाटला. नंतर आम्ही शाळेच्या इमारतीकडे वळलों. पश्चिमाभिमुख जी एकमजली लांबच लांब इमारत आहे, तिचे मधोमध शाळेच्या ग्रंथसंग्रहाचा दिवाणखाना आहे. येथें

शिक्षकांची विश्रांतीच्या वेळीं वाचण्याची व बसण्याची सोय केली आहे. शेजारच्या खोलींत हेडमास्तराची व कारकुनाची कचेरी आहे. बाजूच्या एका खोलींत एक वर्ग बसतो व दुसरी खोली विद्यार्थिनी विश्रांतीसाठीं वापरतात. या इमारतीच्या डाव्या व उजव्या हातांस तीन तीन वर्ग बसतील असे दोन सोपे मुख्य इमारतीपासून अलग असे आहेत. या वर्गांतून आम्ही हिंडलों. शाळेच्या खुल्या पठारावरील प्रकाशमय व हवाशीर इमारती पाहून मीं शाळास्थापकाचें अभिनंदन केलें. नंतर आम्ही लायब्ररी हॉलमध्यें परत आलों. तोंच खालच्या वर्गांच्या मुलांना सुटी मिळाल्यानें तीं आनंदानें दोन दोन पायऱ्यांवरून उड्या मारीत घरीं किंवा क्रीडांगणावर गेलीं व वरच्या वर्गांचे विद्यार्थी शाळेच्या सभागृहाकडे आले. हें सभागृह लायब्ररीच्या समोरच आहे. चोहों बाजूंच्या चारी इमारतींत ही इमारत खूप उंच बांधणीची आहे. ती दुरून पहात व वाखाणीत असतां बरोबर साडेचार वाजतां शिखरे तेथें आले. मग आम्ही सर्व टाळ्यांच्या कडकडाटांत सभागृहांत शिरलों. ग्यालरींत व मागच्या बाकांवर मुलें व पुढच्या खुर्च्यांवर सर्व मंडळी बसल्यावर रा. गावसकरांनीं विद्यार्थ्यांस व जमलेल्या सद्गृहस्थांस माझा परिचय करून दिला. मी ठरलेल्या विषयावर सुमारें तास सवातास भाषण केलें व शेवटीं विद्यार्थ्यांना उपदेशपर चार शब्द सांगितले. रावसाहेब शिखऱ्यांनीं थोडक्यांत समारोप केला. आभारप्रदर्शनानंतर सभा संपली. मग मी गावसकर मास्तरांबरोबर कारवार व शिरशी रस्त्याच्या तिठ्यापर्यंत फिरावयास गेलों. जातां येतां मिळून अडीच मैल मजल झाली. परत येतांना चढावाच्या रस्त्यामुळें शिखऱ्यांच्या बंगल्याशीं येतों तों मला दरदरून घाम आला. मग व्याख्यानासंबंधीं व महायुद्धाबद्दल गप्पागोष्टी झाल्यावर आम्ही जेवणास बसलों. शिखऱ्यांच्या पत्नीनें स्वतः केलेल्या पुणेरी जेवणाचा आम्हीं चांगला समाचार घेतला हें सांगावयास नकोच.

रात्रीं दहा वाजतां आम्ही बिऱ्हाडीं आलों. सबंध दिवसाच्या शारीरिक

व मानसिक श्रमामुळें मला विश्रांतीची जरूरी होती. म्हणून शतपावली झाल्याबरोबर मी झोपीं गेलों व मला लागलीच गाढ निद्रा आली.

ता. २१ नोव्हेंबर १९४१ रोजीं सकाळीं साडेसात वाजतां कुमठ्याचें सर्वांत दूरचें व निसर्गरमणीय दृश्य 'दीपगृह' पहाण्यास गेलों. दीडदोन मैल पसरलेली गांवची वस्ती संपली तोंच एक नवें बोलपटगृह दिसलें. तें ओझरतें पाहून आम्ही पुढें चाललों. आतां भातशेती व नारळीपोफळींच्या बागा यांमधून रस्ता जात होता. पुढें कुंभा नदीची छोटी खाडी व तीवरील लाकडी छोटासा पूल वलांडून पुढें गेलों. तेव्हां समोर शंकूच्या आकाराची तांबडसर टेकडी उघडीबोडकी दिसली. उजव्या हातास दोन नव्याच बनविलेल्या नारळीच्या बागा लागल्या. या बागा टाकल्याबरोबर डाव्या बाजूला खुला समुद्र दिसला. रस्ता संपतो तेथें दोन सीमेंटकट्टे केलेले होते. तब्बल तास सव्वातास चालल्यामुळें आम्हांला विश्रांति घ्यावीशी वाटली, म्हणून आम्ही सावली असलेल्या कट्ट्यावर टेकलों. येथेंच कुमठा नगरपालिकेची हद्द संपते. दहापंधरा मिनिटांचा विसांवा घेतल्यावर आम्हांस समुद्राचें पांढरें वाळवंट तुडवीत जावें लागलें. तोंच दीपगृहाच्या टेकडीची तांबडसर वाट आली. दीपगृहाची टेकडी सुमारें शंभर सव्वाशें फूट उंच असल्यामुळें इतर ठिकाणांप्रमाणें येथें स्वतंत्र दीपगृहमनोरा नाहीं. तर टेकडीच्या माथ्याच्या टोकाशीं वीसपंचवीस फूट उंचीचें बांधकाम करून त्यांत फिरतां दिवा बसविला आहे, पण हवाई हल्ल्याच्या धास्तीस्तव तो तूर्त बंद ठेवण्यांत आला आहे. टेकडीवर जकातखात्याच्या प्रशस्त बंगल्याच्या पायऱ्यावर बसून समुद्रावरून येणारा गार सुखस्पर्श वारा घेत व सभोंवरची सृष्टि व समुद्र यांची बहारीची शोभा पहात आम्हीं दहाबारा मिनिटें विसांवा घेतला. नंतर बिऱ्हाडीं जाईपर्यंत खूप उशीर होईल या भीतीनें आम्हीं नाखुषीनें पाय काढला. मग झपाझप टेकडीची पाऊलवाट उतरून व तापलेली वाळू तुडवीत आम्हीं रस्ता गांठला. येथपासून नारळाच्या झाडांची व पुढें गांवांतील घरांची सावली मिळाली म्हणून म्हणण्यासारखा उन्हाचा त्रास न वाटतां आम्ही साडेचार तासांची

सहल करून बिऱ्हाडीं बाराच्या सुमारास पोहोंचलों. मग सावकाश भोजन उरकलें. मास्तर शाळेंत गेले व मी थोडी वामकुक्षी केली. त्या संध्याकाळीं आम्हीं फिरावयास गेलों नाहीं.

माझा कुमठ्याचा निवास संपलाच म्हणावयाचा. कारण ता. २२ व २३ नोव्हेंबर सन १९४१ शनिवार व रविवार हे दोन दिवस आम्हीं पूर्वीं सांगितलेलीं स्थळें पहाण्यांत घालविले व आदितवारीं सायंकाळीं सात वाजतां कुमठ्याच्या बाजारपेठेंत आलों तोंच शाळेचा शिपाई भेटला. तो म्हणाला, " बाई (गांवसकरांची बायको) व बाळ साडेचार वाजतांच बिऱ्हाडीं आलीं. " यामुळें गावसकर मास्तरांस आनंद झाला. ज्यांच्या येथें तीन दिवस आनंदानें व घरच्यासारखे घालविले त्यांची गृहिणी घरीं आली हें कळल्यानें मलाही आनंद वाटला. मग आम्हीं तडक बोर्डिंगांत गेलों.

गावसकरांच्या पत्नीनें मेजवानीसारखें सुग्रास अन्न घरींच केलें. तें यथेष्ट खाल्ल्यावर मी आपल्या सामानाची बांधाबांध करीत असतां मास्तरांनीं हातसुताची, हातविणीची सुंदर केशरी शाल–गुरुदक्षिणा म्हणून कीं काय–माझ्या बिछान्यांत घातली. मी तिचा साभार स्वीकार केला. मग मी झोंपीं गेलों. ता. २४ नोव्हेंबर सन १९४१ सोमवार रोजीं सकाळीं साडेसात वाजतां मोटारबस अगदीं बिऱ्हाडासमोर आली. मी सर्वांना नमस्ते करून बसमध्यें बसलों व मार्गस्थ झालों.

नाना, माझें कुमठ्याच्या सद्यःस्थितीचें व तेथील प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन संपलें. पण तुम्ही कज्ज्याच्या किंवा कायद्याच्या वादग्रस्त कराराचा किंवा कलमाचा बरोबर अर्थ लावण्याकरितां त्यांचा पूर्वेतिहास पहातां त्याप्रमाणें मलाही माझें प्रवासपत्र पुरें करण्यापूर्वीं कुमठा बंदराचा पूर्वेतिहास निवेदन केला पाहिजे. तसें निवेदन करून वर्णन संपवितों. बाकी गोकर्ण, होनावर व भटकळ या बंदरांची पूर्वपीठिका जशी पुरातन-

काळापर्यंत पोहोंचते तशी कुमठ्याची पोंचत नाहीं, उलट कारवारप्रमाणें कुमठा हें बंदर अर्वाचीन काळचें आहे असें म्हटलें तरी चालेल.

दंतकथेप्रमाणें कुमठ्यापासून होनावरपर्यंतच्या प्रांतांवर जैनधर्मी राजघराण्याचा अंमल होता. परंतु कुमठ्याचा लेखी उल्लेख सन १५३० मधला आहे. तेव्हां पोर्तुगीज सरकारला या बंदरांतून दोनशें गोण तांदूळ खंडणी म्हणून मिळत असत. नंतरचा उल्लेख सन १७१३ मधला आहे. तेव्हां पोर्तुगीज राजप्रतिनिधीनें (व्हाइसरॉय) बेडनूरच्या राजाच्या मुलखावर चाल करून जाण्याकरितां आपलें लष्करी आरमार कुमठा बंदरास पाठविलें होतें. त्यानें बेडनूर राजाचीं अकरा गलबतें जिंकलीं व जाळलीं. सन १७५८ मध्यें **कुमठा** गांवीं ख्रिश्चन प्रार्थनामंदिर, खाडी व समुद्रासमीपच्या टेकडीवरील किल्ला असल्याचें फ्रेंच पंडित अँखेटील ड्यू पेरीम यानें लिहिलें आहे. सन १८०१ मध्यें प्रख्यात प्रवासी बुकानन यानें " कांहीं काळापूर्वीं प्रसिद्ध असलेला गांव " असा उल्लेख केला आहे. कारण, टिपूच्या सैन्याचा तळ दोनदां कुमठ्याच्या आसपास असतांना तें शहर जाळून टाकण्यांत आलें होतें. पण टिपूच्या पश्चात् सर्व कोकण-कर्नाटक इंग्रजांच्या ताब्यांत आलें. व त्याचा मद्रास इलाख्यांत अंतर्भाव करण्यांत आला. पण, सन १८६२ मध्यें उत्तर कर्नाटक अथवा **कारवार** जिल्हा व दक्षिण **कर्नाटक** किंवा मंगळूर प्रांत हे निरनिराळे जिल्हे करण्यांत आले. सारखी भाषा बोलणारे, सारखी संस्कृति असलेले व सारखी रहाणी व सारख्या चालीरीती असलेल्या भौगोलिक दृष्ट्या समान हवापाणी असलेल्या प्रांताचे दोन जिल्हे केले गेले हें विलक्षण नव्हे काय, व त्यांतला दुसरा जिल्हा मद्रास इलाख्यांत ठेवण्यांत आला व पहिला मुंबई इलाख्यास जोडण्यांत आला ! सर्व जिल्ह्याचा इतिहास सोडून कुमठ्याकडे वळतां असें दिसतें कीं होनावर या जुन्या बंदराचें महत्त्व कमी होऊन कुमठा बंदरास महत्त्व आलें. कारण, कुमठा घाटावरील बेळगांव, धारवाड, हुबळी, या मोठ्या व व्यापारी शहरांशीं उत्तम

गाडीरस्त्यानें जोडण्यांत आला. कर्नाटकांत व बेलारी प्रांतांत पिकणारा कापूस गाडीमार्गें कुमठा बंदरास येऊं लागला व तेथून गलबतांतून मुंबई बंदरास जाऊं लागला. म्हणून मुंबईस या कापसास '**कुमठा कापूस**' असें नवें नांव मिळालें. खरोखरीं कुमठ्याच्या आसपास कापसाचें एक बोंडही पिकत नाहीं. हा नवा व्यापार व कुमठा यांचीं पंचवीस तीस वर्षें भरभराट झाली. पण सदर्न मराठा रेल्वेमार्ग पुण्यापर्यंत पोहोंचून घाट, कर्नाटक व मुंबई यांच्यामध्यें जलदीचें दळणवळण सुरू झाल्यापासून कुमठ्याची पुन्हां पिछेहाट झाली. पण गेल्या वीस वर्षांत झालेल्या मोटार ट्रक्सच्या रहदारीनें कुमठ्याच्या व्यापाराची पुन्हां चढती कमान झाली आहे. असा कुमठ्याच्या अपकर्षोत्कर्षाचा इतिहास आहे.

आतां हें लांबलेलें पत्र पुरें करतों. कळावें, हे आशीर्वाद.

तुमचा भाऊ,
दादा

५

गिरसाप्पा सिद्धापूर
ता. २३ नवंबर सन १९४१

डॉ. कॅपटन एस्. जे. साने आय. एम्. एस्,
१९ इंडियन टप्पा विभाग, मिडल ईस्ट फोर्स,—

कृ. सा. न. वि. वि. आपलें ४ आक्टोबर सन १९४१ चें पत्र आपल्या अदमासाप्रमाणें आम्हांला दिवाळीसणाचे सुमारास (२० आक्टोबर सन १९४१) पोहोंचलें. वाचून आम्हां सगळयांना फार आनंद झाला. मी या पत्रांत इकडील सविस्तर हकीकत कळवीत आहें.

आपण आपल्या पत्रांत माझ्या प्रकृतिसुधारणेची वार्ता वाचून आनंद झाल्याचें लिहून पुढें म्हणतां ' दादांना या देशाच्या या भागांतील दऱ्याखोऱ्याची चढउतारीसहल आनंददायक वाटली असती अशी माझी खातरी आहे."

आपल्या इच्छेप्रमाणें ज्या प्रदेशदर्शनानें मला आनंद झाला असता असें आपण लिहितां त्याचें दर्शन शक्य नसलें तरी मलबार किनाऱ्याच्या लगतच्या **कारवार** जिल्ह्यांतील कांहीं तसल्या प्रेक्षणीय स्थळाचें मी सविस्तर वर्णन देत आहे. मात्र हीं ठिकाणें माझी घाईघाईनें पाहून झालीं. म्हणून ती पुन्हः पाहण्याची इच्छा राहिली आहे. पण, लढाई संपून तुम्ही सुरक्षितपणें स्वदेशाला परत आल्यावर व हक्काची रजा भोगीत असतांना, ती दृश्यदर्शनाची इच्छा तुमच्या समवेत पुरी करतां येईल असें मी समाधान मानीत आहे.

मी कारवार जिल्ह्याचा प्रवास एक महिनाभर केला व तो माझ्या प्रकृतीला मानवला. महिन्यामधल्या शेवटल्या आठवडयाची हकीकत मी आपल्यास या पत्रानें कळवीत आहे.

मी ता. २२ नवंबर सन १९४१ रोजीं सकाळीं साडेसात वाजतां कारवारच्या दक्षिणेकडील कुमठा या तालुक्याच्या गांवाहून मोटारबसनें निघालों. कुमठ्यापासून होनावर केवळ दहा मैल आहे. हा दहा मैली भूमिभाग तांबड्या मातीचा असून सपाट आहे. येथून उजवीकडे अफाट आरबी समुद्र तर डावीकडे सह्याद्री पर्वताची रांग लागते. मात्र या भागांत पर्वत समुद्रापासून पुष्कळ दुरावले आहेत. पण ते कारवारी सागवानाच्या निबिड हिरव्यागार जंगलानें शोभायमान झालेले आहेत. हा भाग रत्नागिरी जिल्ह्यांतील जंगली भागासारखा किंवा कुलाबा जिल्ह्यांतील धरमतर-रेवस भागासारखा दिसतो खरा. पण हा जास्त सुपीक आहे. येथें आंबे, काजू, फणस यांचीं झाडें, व केळीं, नारळी, पोफळी यांचे मळे आहेत. शिवाय, इकडे भात पुष्कळ पिकतें. मधून मधून उसाचें पीक दृष्टीस पडतें. इकडला विशेष म्हणजे ताडमाडाच्या वृक्षावर पानविड्याच्या वेली व काळ्या मिऱ्याच्या वेली चढविलेल्या असतातः दक्षिणोत्तर दूरवर पसरलेली पर्वतराजी व त्यावरील हिरवीगार झाडी, तांबडा लाल रस्ता, सभोंवार वेलींनीं अलंकृत केलेल्या वृक्षराया व पश्चिमेकडे मधून मधून दृष्टीस पडणारा समुद्र, हा देखावा खरोखरीं नयनमनोहर आहे. सारांश, येथल्या वनश्रीची शोभा अवर्णनीय आहे.

कुमठ्यापासून होनावरपर्यंतच्या अवघ्या दहा मैलाच्या भागांत दोन खाड्या लागतात. दोन्हीवर पूल आहेत. दुसरा पूल वलांडून थोडा वेळ होतो तोंच आम्हीं होनावरच्या मोटार अड्याशीं आलों. पेट्रोल नियंत्रणामुळें मोटारबस घरोघरीं प्रवाशांस पोहोंचवीत नाहीं असें कळलें. तेव्हां आम्हीं आमचा छोटा बॅगबिछाना हमालाजवळ दिला व गावाचे पलीकडे टेकडीवजा उंचवट्यावरील प्रभु वकीलांच्या नव्या बंगल्यावर त्यास जाण्यास सांगून आम्हीं गांव पहात पहात पायीं चाललों. प्रथमतः आम्हांला सीरियन कॅथॉलिक मिशननें चालविलेलें सेंट थॉमस हायस्कूल लागलें. स्कूलची इमारत एकमजली, एकेरी खोल्यांच्या दोन्ही बाजूस

कमानदार व्हरांडे यांनीं अलंकृत केलेली, तांबडी व विस्तीर्ण अशी पाहून आम्हांला आनंद झाला. शाळेचे वर्ग प्रशस्त, हवाशीर पण किंचित् काळोखाचे वाटले. शाळेच्या पुढें खुली जागा होती; त्यांत मुलें खेळत होतीं. इतक्यांत चंदावरकर नांवाचे फर्ग्युसन कॉलेजचे माजी विद्यार्थी भेटले. ते म्हणाले " शाळा नऊ वाजतां भरते. तरी तोंवर थांबा म्हणजे वर्ग पाहण्यास सांपडतील." पण, वेळेच्या अभावीं पाहिलें तेवढ्यांत समाधान मानून आम्हीं बाजार पेठेंत शिरलों. बाजार पेठ बरीच मोठी व लांबच लांब वाटली. पुढें दुमजली राहतीं घरें लागलीं. तीं नीटनेटकी व तांबूस-बदामी-पांढऱ्या रंगाची सुरेख दिसली. एकंदरींत होनावर गांव स्वच्छ व संपन्न आहे असें वाटलें. वाटेंत गौड सारस्वतांच्या मठाचें देवालय लागलें. त्यावर ओझरती नजर टाकून आम्हीं पुढें गेलों तोंच समोर पुण्याच्या पर्वती टेकडीसारखी टेकडी दिसूं लागली. टेकडीचा उंच-वड्याचा भाग चढून गेल्यावर थोडीशी सपाटीची जागा लागली. तिचे उजवे बाजूस व डाव्या बाजूस दाट व गर्द पोफळीची मोठी बाग होती. टेकडीच्या माथ्यावर सुमारें साठसत्तर फुट उंचीचा पांढरा शुभ्र मनोरा पाहून आम्हीं आश्चर्यचकित झालों. तो ब्रिटिश पलटणीच्या कॅप्टन हिल नांवाच्या इंग्रज सेनापतीचें स्मारक होय असें कळलें. इतक्यांत **प्रभु** वकिलांचा नवा कॉंक्रीटचा बंगला आला व वकीलसाहेब स्वतः आमचें स्वागत करण्यास फाटकाशीं आले.

मग आम्ही सर्व बसण्याच्या दिवाणखान्यांत गेलों. मोठमोठ्या ताव-दानी खिडक्यांचा, गुळगुळीत व तजेलदार तांबड्या फरशीचा, बिन-खांबाचा, सपाट पटईचा प्रशस्त दिवाणखाना मालकाची सदभिरुची व कलाप्रेम व्यक्त करणारा होता. आराम खुर्च्यांवर आम्हांला बसण्यास सांगून व आमच्याकरितां सज्ज केलेल्या खोलींत कपडे काढून ठेवण्यास सांगून वकील स्वयंपाक घरांत जाऊन लगेच दिवाणखान्यांत आले व मला म्हणाले, " गावसकर मास्तरांच्या व शानभाग वकिलांच्या पत्रांवरून

हा प्रांत पाहण्याच्या आपल्या उद्देशाची मला माहिती मिळाली आहे. तुमचा विद्यार्थी असण्याचा मान मला नाहीं. तरीपण आपणाला मी पुष्कळ दिवसांपासून नामांकित अध्यापक, प्रसिद्ध प्रवासी व प्रतिभावान् प्रवास–वर्णनकार म्हणून ओळखतों. आपलीं विलायतेचीं व युरोपचीं प्रवास–वर्णनें मी वाचलीं आहेत. आपल्या दृश्य–दर्शनप्रिय मनाला साश्चर्यानंद देईल असें रामतीर्थ नांवाचें निसर्गरमणीय स्थान आपल्यास दाखविण्याचा मी बेत केला आहे. चहा फराळ करून लगेच आपण मोटारकार मधून तेथें जाऊं व जेवणास परत येऊं." इतकें बोलणें होत आहे तोंच चहा फराळाचें ताट मेजावर आलें. अर्थात् त्याचा आम्ही आनंदानें समाचार घेतला. इतक्यांत वकीलसाहेबांच्या अशीलाची आमच्याकरितां मागविलेली मोटारकार फों फों करीत अंगणांत आली. वकिलांनीं आम्हां त्रिवर्गाच्या पंचेधोतरांची पिशवी गड्याजवळ दिली. मग आम्हीं चौघेजण कारमध्यें बसलों व लगेच रामतीर्थाकडे चालू झालों.

डाव्या हाताला खोलांत असलेली हिरवीगार केळीं नारळीची बाग व मागें उल्लेख केलेला पांढराशुभ्र मनोरा टाकून आम्ही पुढें चाललों तों गवताळ व तुरळक झाडीचा पठारच पठार लागला. उजव्या बाजूची टेकडीही उतरती होत पठारास मिळाल्यासारखी झाली. यामुळें चारी बाजूचा हिरवागार देखावा दूरपर्यंत दिसूं लागला होता. तो भूमिभाग पाहून मला रत्नागिरी शहराच्या सड्याची (गांवाच्या पूर्वेचा पठार) आठवण झाली व चिरपरिचित भेटीचा आनंद झाला. हा नयनमनोहर देखावा पहाण्यांत माझें मन गर्क झालें असतांना रामतीर्थाच्या पायऱ्याशीं येऊन कार थांबलीसुद्धां. वकील म्हणाले " आधीं स्नान करूं व मगच महादेवाचें दर्शन घेऊं." लगेच आम्ही जांभ्या दगडाच्या चाळीस पन्नास पायऱ्या उतरलों तोंच कुंडाच्या सभोंवारच्या फरशीची वाट लागली. कुंड चांगलें पुरुषभर खोल असावें. पण त्याच्या दोन बाजू कोसळल्यासारख्या दिसल्या. प्रभु वकील म्हणाले " गेल्या पावसाळयाच्या

पहिल्याच मुसळधार पावसानें येथल्या ठिसूळ टेकडीची कडाकोसळ (land slip) झाली. रामतीर्थ कमिटी दुरुस्तीचें काम लवकरच सुरू करणार आहे" तीर्थाचे एका बाजूस नवाच कांक्रिटचा वाटपाही मंडप व स्त्रियांकरितां आडोशाची खोली होती. आम्ही वाटपाही मंडपांत कपडे काढून व आंग पुसावयाचा पंचा फरसबंदी पाऊल वाटेवर ठेवून पायऱ्यांनीं पाऊलभर पाणी असलेल्या कुंडांत उतरलों. रामतीर्थाचा ऊष्ण झरा नेहेमीच्याप्रमाणें भूगर्भातून न निघतां दीड पुरुष उंची वरून कुंडांत पडत होता. (भूगर्भातून निघत नसतांना या झऱ्याचें पाणी कढत कसें होतें व सतत कढत कसें राहतें हा एक विलक्षण सृष्टिचमत्कार आहे.) पाण्याचा झोत मांडी येवढा असून पाणी स्नानाच्या बेताचें कढत होतें. यामुळें झोतांत उभे राहिल्यानें वारिधारा स्नानाचा (Showerbath) अपूर्व आनंद अनुभवतां आला. या झोतांखालीं किती वेळ तरी उभें राहावेंसें वाटलें. पण आमच्या बरोबरच्या मित्रांना स्नान करावयाचें होतें. शिवाय, आम्हां पाहुण्यांकरितां झोत मोकळा करून दिलेली मंडळी तिष्ठत उभी होती. म्हणून, मोह आवरून आम्हीं भराभर स्नानें आटोपलीं. मग आम्हीं देवळांत गेलों. तेथें पुजारी पिंडीची पुजा करीत होता. आम्हीं तिघांनीं किंचित् व्यावहारिक द्रव्य देवापुढें ठेविलें. पुजाऱ्यानें नारळ, केळी व भस्म यांचा प्रसाद आम्हांला दिला. लगेंच आम्हीं मोटारींत बसून बंगल्यावर आलों. वाटेनें मला या उन्हाळ्याचें सानंद आश्चर्य वाटत होतें. उन्हाळ्याचा नव्हे पण गार पाण्याचा असा उंचावरून पडणारा झरा आम्हीं मागें मंगळूरास पाहिला होता. त्या व या झऱ्याचें साम्य–वैधर्म्य माझ्या मनापुढें उभें राहिलें व निसर्गदेवीनें अशा प्रकारचे विलक्षण झरे निर्माण करून ठेवल्याबद्दल मी मनांतल्या मनांत देवीची स्तुति केली.

डाकतरसाहेब, आपणांस अशा शीतोष्ण पाण्याच्या झोतांखालीं स्नान करण्यास सांपडेल तर फार आनंद वाटेल नाहीं का ?

बंगल्यावर परत आल्यावर आम्हीं स्वस्थपणें व बोलत बोलत सुग्रण-गृहिणीनें केलेल्या सुग्रास सारस्वती भात भाजीचा व आंबट-गोड पक्वा-नांचा समाचार घेतला हें सांगावयास नको.

थोड्या तासाच्या अनुभवावरून आम्हांला प्रभु वकिलांचा चित्तवेधक बोलघेवडेपणा व पूर्वेतिहासज्ञान दिसून आलें. ते म्हणाले " आमचें होनावर गांव व बंदर फार प्राचीन काळापासून प्रख्यात आहे. यांचा उल्लेख इसवी सन २५० च्या सुमारास ग्रीक लेखकांनीं केला आहे. पुढें सन ९०० च्या सुमारास लिहिलेल्या जैन रामायणांत यांचें वर्णन आलें आहे. आरबी व आफ्रीकन प्रवाशांनीं मोठें सुरक्षित बंदर म्हणून होना-वरचा निर्देश १२,१३ व १४ या शतकांत अनेकदां केला आहे. त्या काळांत विजयानगरच्या हिंदू साम्राज्याचा अंमल या मुलखावर होता व त्यांचे मांडलिक म्हणून मुसलमान सरदार या प्रांताचा कारभार पहात. सन १४४४ च्या सुमारास परशीयाच्या राजाचा वकील विजयानगरास आला होता. परत जातांना तो होनावरास आला व येथून व्यापारी गलबतांतून परशीयास गेला. येथले धाडसी खलाशी दूर दूरचे जलप्रवास करण्यांत तरबेज होते.

हिंदुस्थानच्या अर्वाचीन जलमार्गाचा शोध लावणारा पोर्तुगीझ कपतान वास्को-दी गामा या बंदरीं येथल्या मसाल्याच्या मालाकरितां आला होता. तेव्हां त्याची येथें डाळ शिजली नाहीं. पण सोळाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास पोर्तुगीझ व्यापारी आपली वखार होनावर येथें काढूं शकले. व पोर्तुगीझ कंपनीनें होनावरच्या खाडीच्या मुखांतील बेटावर 'बसवदुर्ग' नांवाच्या किल्ला बांधला. त्याचे अवशेष अजून त्या बेटावर असून तें बेट व तो भग्न किल्ला हीं होनावरचीं स्थळें प्रेक्षणीय आहेत.

होनावरच्या सुपीक प्रांतांतील नानाविध मसाल्याच्या बहुमोल मालाचा किफायतशीर व्यापार आपल्या हातीं आणण्याकरितां व आधींच हातीं आलेला व्यापार राखण्याकरितां होनावरचा हिंदु राजा, पोर्तुगीझ कंपनी,

व इंग्रज कंपनी यांचें मध्यें लहान मोठे तंटे बखेडे होत असत. पण १७७५ पासून होनावर व मलबार हे प्रांत प्रथमतः हैदर व त्याचे पश्चात् टिपु यांचे अंमलाखालीं आले. याच काळांत या प्रांतांची जाळ-पोळीनें व लुटालुटीनें फार नासाडी झाली. तरी पण शेवटपर्यंत हे प्रांत टिपूच्या ताब्यांत होते. टिपूच्या मृत्यूनंतर हे दोन्ही प्रांत लढाई न करतां इंग्रजाच्या कायमचे ताब्यांत आले." अशी जुनी मनोरंजक माहिती सांगून प्रभु वकील पुढें म्हणाले "अजूनही हा प्रांत शिशू-साग-चंदन या उंची इमारती लांकडाकरितां व काजू-मिरीं-सुपारी या मसाल्याच्या मालाकरितां प्रसिद्ध आहे. येथें शिशवी व चंदनी लाकडाच्या सुबक मूर्ती व सुंदर खेळणीं तयार होतात. पण जपानी स्वस्त मालानें येथली कारागिरी संपुष्टांत आणिली आहे."

कॅप्टन सानेसाहेब, येथील सुबक वस्तूंचे चारदोन नमुने मी मुली-करितां आणिले आहेत व डाक्तरकाकांना दाखविण्याकरितां त्यांनीं ते करंड्यांत ठेविले आहेत. ते पाहून तुम्हांला आनंद वाटेल.

दोन प्रहरीं आम्हीं प्रभु वकिलांच्या प्रोत्साहनानें व गांवकऱ्यांच्या आर्थिक मदतीनें नवीन निघालेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल' नांवाचें हायस्कूल-कडे आलों. शाळेचे वर्ग पाहून झाल्यावर वरच्या वर्गांतील मुलें, शिक्षक व चालक अशा मंडळीपुढें मी 'शिक्षणाचें खरें ध्येय' व 'अर्वाचीन प्रवास' या शिष्यशिक्षकोपयोगी जोड विषयावर व्याख्यान दिलें.

झालें, येथला माझा सहासात तासाचा निवास संपवून आम्हीं सार-स्वतांच्या चित्रापूर मठाच्या स्वामीच्या चित्रापूर गांवांस जाण्यास निघालों. होनावरचे दक्षिणेस दीडदोन मैलांवर शरावतीची खाडी तरीनें ओलांडून आम्हीं पलीकडच्या तीरावर पोहोंचलों. शरावती नदीचें पात्र तब्बल एक मैल रुंद आहे. प्रवाहाचें पाणी खोल असल्यानें प्रवाह संथपणें वहातांना दिसला; ही नदी वीस बावीस मैलपर्यंत नौकानयनक्षम आहे. नदीतीराच्या दोन्ही बाजूंस दाट हिरवेंगार जंगल आहे. या नयनमनोहर

देखाव्याचें आकंठपान केल्याखेरीज प्रवाशाचें पाऊल पुढें पडूं शकत नाहीं. आमची तीच स्थिति झाली.

चित्रापूर हें गांव मठामुळें झालेलें आहे. तें समुद्रकांठीं असल्यामुळें थंड, निरोगी व हवाशीर आहे. मठाची दुमजली लाकडी जांब्या दगडाची इमारत प्रेक्षणीय आहे. मठाच्या व्यवस्थापकानें आमचें स्वागत केलें. इमारत व स्वामींची समाधि पाहिल्यावर कचेरीच्या दालनांत आम्ही येऊन थांबलों. तेथें कॉफीपान करतां करतां व्यवस्थापकानें मठाच्या उत्पत्तीचा मजेदार इतिहास सांगितला व सारस्वत जमातीच्या माहितीचें पुस्तक मला नजर केलें. सन १७०८ च्या सुमारास गोव्यांत राहणारें सारस्वत मठाचे स्वामी गोवें सरकारच्या छळाला त्रासून त्रागयानें काशीस निघून गेले. यामुळें सर्व समाज गुरुविहीन झाला. गोकर्णमहाबळेश्वरीं समाजाचा मुख्य व मोठा जमाव असल्यामुळें लोकांनीं महाबळेश्वर देवास साकडें घातलें. देवानें दृष्टांत दिला कीं, दुसऱ्या दिवशीं काश्मीरचा सारस्वत संन्यासी गोकर्ण येथील कोटीतीर्थाला येईल व तो तुमचा गुरु व स्वामी होईल. त्याप्रमाणें खरोखरींच घडून आलें. ते संन्यासी ‘श्रीमत् परिज्ञानाश्रम’ नांवानें नवे गुरु झाले व गोकर्ण मठांतच राहूं लागले. त्यांच्या पश्चात् दुसरे गुरु मठाधिपति झाले. हे आपल्या वृद्धावस्थेंत चित्रापूर या शिराळी गांवच्या वाडीवजा खेड्यांत तेथल्या जमीनदाराच्या विनंतीवरून राहण्यास आले नाहींत तोंच त्यांचा तेथें अंत झाला. मालकानें आपलें सर्व आवार त्यांच्या समाधीकरितां अर्पण केलें. यामुळें पुढचे सर्व स्वामी येथेंच मठ बांधून राहूं लागले. सध्यांचे स्वामी हे या नव्या मठाचे नववे गुरु होत. पण ते संचारार्थ बाहेर देशीं गेले आहेत.”

उशीर झाला म्हणून आम्ही व्यवस्थापकाचे आभार मानून मठापासून दोन फर्लांगावर असलेल्या मोटार अड्ड्याशीं आलों तोंच मोटार बस तेथें आली. घड्याळांत पहातां पावणेसहा वाजले होते. आतां आम्हांस चारच मैल जावयाचें होतें. पण तितक्यांत भटकळ खाडी लागून ती तरीनें

उतरावी लागली; व त्यांत अर्धातास मोडला. म्हणून आम्हां भटकळास पोहोंचतों तों साडेसात वाजले. भटकळ गांव फार खोलांत व डोंगराच्या चिळणींत असल्यामुळें रात्रीं फार ऊष्मा होतो म्हणून गांवाबाहेर पाऊण मैलावर खुल्या व उंचवट्याच्या जागेंतील तांदुळाच्या गिरणीच्या आवारांत आमची जेवणाची व झोपण्याची सोय केली होती. जेवणास तासभर अवकाश होता म्हणून व सकाळीं आठ वाजतां मोटार निघावयाची होती म्हणून आम्हीं विजेच्या मशालीच्या (Electric torch) साहाय्यानें भटकळ गांवांतलीं प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं.

या गांवची बाजारपेठ बरीच मोठी, सलग व लांबलचक वाटली. येथें मुसलमान वस्ती पुष्कळ दिसली. शेंकडा ६० लोक त्या धर्माचे असून त्यांमध्यें सधन व्यापारी व जमीनदार लोक पुष्कळ असून म्युनिसिपालिटी व इतर सार्वजनिक संस्था यांमध्यें त्यांचेंच प्राबल्य आहे; पण या गांवीं हिंदुमुसलमानांमध्यें तेढ किंवा द्वेष नाहीं असें कळलें. दुसरें असें सांगण्यांत आलें कीं येथले मुसलमान व्यापारी मलाया, सीलोन वगैरे दूरदेशीं जाऊन सधन होऊन आपल्या गांवीं आलेले आहेत.

बाजारपेठ टाकून आम्ही मुसलमान मोहल्यांतून हिंडून आलों. तेथले सरदारी थाटाचे भव्य व सुंदर वाडे पाहून मालकांची संपन्न स्थिति न सांगतांच कळून आली. गांवची जुम्मामशीद प्रेक्षणीय वाटली. मुसलमान मोहल्यांतून आम्ही दुसऱ्या वाटेनें हिंदुवस्तींत आलों. तेथें असलेल्या दोन जैन बस्त्या पाहिल्या. पहिली पाहिलेली बस्ती लहान होती. दुसरी मात्र खूब मोठी तीन सोप्यांची बस्ती होती. त्यांत तीन तीर्थंकराच्या अर्धभग्न नग्न मूर्ति होत्या. दोन्ही बस्तींचे दीपस्तंभ मात्र कलाकुसरांच्या कामानें शोभायमान दिसत होते.

याप्रमाणें आम्हीं रात्रींच्या काळोखांत भटकळ पाहिलें. पण, खरें सांगावयाचें तर भटकळ गांवची व तेथल्या प्रेक्षणीय स्थळांची फार पुसट व अंधुक कल्पना माझ्या मनःफलकावर उमटली. अर्धवट झोपेंत मनुष्यानें

कांहीं तरी व कसें तरीं पहावें तशीच माझी येथल्या दृश्य दर्शनाच्या बाबतींत अवस्था झाली. म्हणून हीं तिन्ही स्थळें पुन्हां पहाण्याची इच्छा शिल्लक राहिली आहे.

शेवटीं एका जगविख्यात आश्चर्याबद्दल (World-famous wonder) लिहून मी माझें हें पत्र पुरें करणार आहे.

तें आश्चर्य म्हणजे म्हैसूर संस्थानांतील प्रख्यात गिरसाप्पा किंवा जोग धबधबा होय. हा कारवार जिल्ह्यांत मोडत नाहीं. पण माझ्या परत जाण्याच्या मार्गापासून फारसा दूर नसल्यानें व 'रमणीय दृश्यदर्शन' लोभ अनिवार्य असल्यानें मी तें एकदां पाहिलेलें दृश्य पुन्हा पाहिलें.

मी ता. २५ नवंबर सन १९४१ रोजीं सायंकाळीं साडेचार वाजतां कारवार जिल्ह्यांतील शिरशी गांवाहून मोटार बसनें निघालों. अडतीस मैलांचा रस्ता चांगला आहे; तेव्हां काळोख पडण्यापूर्वीं मुक्कामास पोहचतां येईल असें मला सांगण्यांत आलें होतें. पण, मला अनुभव भलताच आला. मोटार बस पांचसहा मैल गेली नाहीं तोंच ज्याकरितां कारवार जिल्हा प्रसिद्ध आहे तें इमारती लांकडाचें राखीव सागाचें जंगल लागलें व तें सारखें तीस पसतीस मैल पसरलेलें सरकारी जंगल होतें. सागाचे वृक्ष पन्नास साठ फूट उंचीचे व त्यांचे बुंधे हत्तीच्या पायासारखे जाडजूड ! आम्हांला वाटोवाट लांकडांनीं भरलेल्या बैलांच्या गाड्या व क्वचित् रेड्यांच्या गाड्या लागत होत्या. एकएका गाडींत लांकडाची एकच नाट (beam) राही. कांहीं नाटी तर इतक्या लांब व जाड होत्या कीं त्या दोन गाड्यांवर घालाव्या लागत व मग तो प्रचंड जोड-गाडा चार चार बैल अगर रेडे जोडून त्याकडून ओढला जात होता. या बैलगाड्या आगगाडीच्या माल डब्याप्रमाणें जणूं कांहीं एकमेकांना जखडलेल्या आहेत असें भासे. रस्त्यांतील या अडथळ्यांमुळें आमचा बसचा प्रवास सावकाश व थांबत थांबत झाला यांत काय नवल ? रात्रीच्या आठ वाजण्याच्या सुमारास आम्हांला धोधो असा दरींत घुमणारा आवाज

ऐकूं आला व लगेच मोटारबस थांबली. तेव्हां आमचें उतरण्याचें ठिकाण आलें असें वाटून मला आनंद झाला नाहीं तोंच कळलें कीं मोटारबस पुढें न जातां येथेंच थांबणार. आम्ही थांबलों तेथें एक लहानसें चहापानगृह होतें. येथून म्हैसूर डाकबंगल्यास जाण्याकरितां होडीनें नदी पार जावें लागतें व होडी सकाळीं सहा खेरीज सुरू व्हावयाची नव्हती. उपाहारघराशेजारीं एक संस्थानची सोप्यावजा इमारत होती. तेथें रात्रीची रहाण्याची सोय होणार नाहीं असें तेथल्या माणसानें सांगितलें. तेथून ब्रिटिश डाक बंगला तब्बल दीड मैल लांबीवर होता. त्या दिवशीं थोडा चन्द्रप्रकाश होता खरा. पण, दाट व गर्दछाय उंच उंच वृक्षांची अंधारी सावली रस्त्यावर पडलेली असल्यामुळें समोर कांहींएक दिसत नव्हतें. तरी पण, ब्रिटिश बंगल्याला चालत जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. एकदोन हमाल तेथें उभे होते. ते एकटे जाण्यास तयार होईनात; म्हणून आठ आठ आणे कबूल करून दोन हमाल बरोबर घ्यावे लागले. ते आपल्या घोंगड्या-विड्या-काठ्या–कंदील वगैरे सरंजाम घेऊन निघण्यास तयार होईपर्यंत मी घाईघाईनें कडवट चहा पिऊन व चामट बिस्किटें खाऊन हमालाच्या डोक्यावर ट्रंक–बिछाना देऊन बंगल्यास जाण्यास निघालों. जंगलाच्या सावलीमुळें व रस्ता फार खराब झालेला असल्यामुळें मी अडखळत व धडपडत चालून एकदांचा साडेनऊ वाजतां बंगल्यावर आलों. हमालांनीं रखवालदारास उठविलें. त्यानें गादी–गिरदी व फाणस देण्याचें कबूल केलें. पण, रॉकेलकरितां ८२ आणे निराळे पडतील असें सांगितलें. तें कबूल करून मी आपला प्रवासी पोशाख अंगावरून उतरला व आरामखुर्चीवर पडलों. त्यावेळीं पोटांत कावळे उठले, पण, अपरात्रीं व निर्जन रानांत खायलाप्यायला काय मिळणार ? थंडा फराळ करून वर गारगार व सुखस्पर्श पाणी पिऊन भूकतहान भागवावी लागली. माझ्यासारख्या प्रवासप्रिय व प्रवाससहिष्णु माणसाची त्या दिवशीं त्रेधा व तारांबळ उडाली व कशाला हा पुनर्दृश्यदर्शनाचा 'खटाटोपो भयंकरः' केला असें मला वाटलें. विलायतेंत व युरोपांत व हिंदुस्थानाच्या दक्षिणेस व वायव्येस असलेल्या

लंका व काश्मीर या ठिकाणीं प्रवासाच्या राहण्या-जेवणाच्या सुखसोयी कोनाकोपऱ्यांच्या स्थळीं सुद्धां असतात. पण, आमच्या हिंदुस्थानांत जगविख्यात प्रेक्षणीय स्थळीं सुखसोयींचा अभाव हा विरोध मनांत आला. मीं मनांत म्हटलें रात्र तर घालविली पाहिजे. हुडहुडी भरणारी थंडी वाजूं लागली; म्हणून लोकरीचा पोशाख पुन्हा अंगावर चढविला; तरी निद्रा अनुग्रह करीना. तेव्हां मी माझ्या भाचाला लिहावयाचें कारवारवर्णनाचें पत्र त्या रात्रीं लिहिलें. बारा वाजतां पत्र पुरें करून मी पोशाखासकटच पलंगावर झोपीं गेलों. शारीरिक व मानसिक त्रासानें शेवटीं मला गाढ झोप लागली.

रखवालदारानें प्रातःकाळीं हातपाय, व तोंड धुण्यास ऊन पाणी व पिण्यास गरम चहा व बिस्किटें आणून दिलीं. समोरच म्हैसूर बंगला दिसत होता व त्याचे पुढेंच गिरसाप्पाच्या चतुःप्रवाही धबधब्यांपैकीं सर्वांत मोठा 'राजा' नांवाचा प्रवाह सुमारें नऊशें फूट उंचीच्या खडकाच्या भिंतीवरून धो धो आवाज करीत, पाणी फेसाळीत व सभोंवार लांबपर्यंत पांढऱ्या धुरासारखे तुषार फेकीत खालीं खोल दरींत उडी घेत होता. किती आश्चर्यकारक हा देखावा! 'रोअरर' नांवाचा दुसरा प्रवाह खडकामधील खालच्या भयंकर भोंकांतून एकदम बाहेर पडत होता. तेंही दृश्य तितकेंच आश्चर्यकारक! राहिलेले दोन प्रवाह 'रॉकेट' व 'डेमब्लांच' पाहण्याकरितां मला बंगल्याच्या बाजूकडील पाऊल वाटांनीं व पायऱ्यांनीं शंभरदीडशें फूट खालीं जावें लागलें. तेथून ते दोन्ही प्रवाह पाहतां आले. रॉकेट हा प्रवाह पहिल्या दोन प्रवाहांपेक्षां लहान आहे. तो खडकाच्या मजगी भजगींवरून हळूहळू व मंद आवाज करीत दरींत जाऊन पडतो. चवथा 'डेमब्लांच' प्रवाह तर फारच छोटा आहे. त्याला नाजुक स्त्रीचें नांव यथार्थपणें शोभतें. तो प्रवाह कसचा! ती प्रवाहाची धार गौरवर्ण स्त्रीप्रमाणें गजगतीनें जणूं कांहीं मंदस्मित करीत व गुणगुणत दरींत जाऊन अदृश्य होत होती.

झालें, माझें गिरसाप्पा धबधब्याचें पुनर्दर्शन संपलें. प्रमुदित मनानें—रात्रींचा त्रास मी पार विसरलों होतों—मी ब्रिटिश बंगल्यावर परत आलों. रखवालदाराचें भाडें चुकतें करून व त्याच्या प्रवासी पुस्तकांत स्वाक्षरीसह शेरा लिहून व २८२ आणे रात्रीचें भाडें दिल्याचें नमूद करून त्याचे डोक्यावर सामान देऊन मी दीडदोन फर्लांग उतरत्या रस्त्यानें चालत आलों. शिरशीच्या रस्त्याला मिळाल्यावर मी रखवालदारास व त्याच्याबरोबर आलेल्या त्याच्या मुलास चिरीमिरीदाखल चार आणे दिले. ते दोघे परत गेले. रात्रींच्यापेक्षां आतांचा या रस्त्याचा देखावा स्पष्ट व नयनमनोहर दिसत होता. धबधब्याचा दुरून कर्णमनोहर आवाज सारखा ऐकूं येत होता. हा सुंदर देखावा पहात मी अर्धा पाऊण तास त्या रस्त्यावरून जा–ये करीत होतों. यावेळीं मला लंकेंतील 'हगाला' बागेचे दृश्यदर्शनाची आठवण झाली. पण, इतक्यांत मोटारबसचें शिंग ऐकूं आलें व माझा आडवा हात पहातांच बस थांबली. मी लगेच मोटारींत बसलों व ती फों फों करीत निघाली. आतां दिवसाचा प्रकाश असल्यानें व रस्ता उताराचा असल्यानें मी दोन तासांत शिरशीस आलों.

या पत्रांतील धबधब्याचें वर्णन मीं संक्षेपानें केलें आहे. कारण 'माझा म्हैसूरचा प्रवास' या माझ्या प्रवासपुस्तकांत मीं तें सविस्तर व सचित्र केलें आहे. तें तुम्हीं पूर्वी वाचलें असावें असें मला वाटतें.

हें मानवसंहारी, सैतानी व जगडव्याळ महायुद्ध लवकर संपो व आपणांस त्याचेहि आधीं रजा मिळून तुमचें सुखरूप स्वदेशागमन होवो अशी आशा करून हें लांबलचक पत्र पुरें करतों. कळावें, हे विनंति.

आपला,

गो. चि. भाटे.

६

शिरशी, जिल्हा कारवार
ता. २८ नवंबर सन १९४१

चि. रा. माधव, बी. ए. एल्‌एल्‌. बी.

शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें. सदाशिव पेठ, बदामी हौदा-नजीक गोखल्यांचा वाडा, पुणें २

अनेक आशीर्वाद विशेष. कारवार व कुमठा येथें अर्धा अर्धा आठवडा राहिलों. तेथें फर्ग्युसन कॉलेजचे अनेक विद्यार्थी भेटले. ते तुझी आठवण काढून चवकशी करीत. कुमठ्यास तर खेडकर व गांवसकर यांनीं वर्गबंधु व क्रिकेटपटु म्हणून तुझ्याबद्दल आस्थेनें विचार-पूस केली.

शिरशीहून निघतांना हें प्रवासपत्र तुला लिहीत आहे.

मी कुमठ्याहून ता. २४ नवंबर रोजीं सकाळच्या साडेसातच्या मोटारबसनें निघालों. कुमठ्यापासून शिरशी ३८ मैल आहे. गोकर्णा-नजीकची अघनाशिनी खाडी तराफ्यानें वलांडावी लागते. हा भूमि-भाग समुद्रसपाट असून धान्यपिकी आहे. झाडझाडोरा विरळ विरळ आहे. पण, खाडीकिनारा टाकून चार एक मैल गेलों नाहीं तोंच सागाचें जंगल सुरू झालें. जसजसे आम्ही सह्याद्रीच्या पायथ्याशीं पोहोंचलों, तसतसें जंगल निबिड होत चाललें आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें. कुमठ्यापासून सतरा मैलांवर देविमनी घाट सुरू झाला. हा घाट हुबळी—कारवार रस्त्यावरील आरबेल घाटापेक्षां कमी कठीण व कमी चढणीचा आहे. कारण, तो पर्वताच्या पायऱ्यांसारख्या मजगीवरून नेण्यांत आला आहे. यामुळें कोकणचा चढणीचा घाट चढण्याची संवय असणाऱ्यांना तो कःपदार्थ वाटेल. मात्र या घाटाखालचें व वरचें रान कोकणच्या रानासारखें खुजें व खुरटें

नाहीं. येथल्या सागाचे सोट सरळ उंच व जाडे होतात. म्हणूनच कारवारच्या सागाच्या नाटांची (beams) उत्तम इमारती लाकूड म्हणन सर्वत्र प्रसिद्धी आहे. म्हैसूर व त्रावणकोर या संस्थानांतील इमारती-लाकडांसारखी येथली लाकडें आहेत असें मला वाटलें.

शिरशी गांव समुद्रसपाटीच्या वर बावीसशें तेवीसशें फूट उंच आहे. तें पुणें–महाड रस्त्यावरील वाई व वाडें या गांवांइतकेंच उंच आहे. शिरशी गांव नजीक आल्याची खूण म्हणजे मिरीं, सुपाऱ्या, वेलदोडे व विड्याचीं पानें यांच्या बागाच बागा लागूं लागल्या ही होय.

सुमारें दहा साडेदहा वाजतां मी गांवच्या मोटारअड्ड्यावर येऊन पोहोंचलों. फरग्युसन कॉलेजचे जुने विद्यार्थी सुंदरराव पंडित वकील व मुंबई कायदेमंडळाचे विद्यमान सभासद केशवन जमीनदार या दोघांना आगाऊ पत्रें लिहिलीं होतीं. मोटारअड्ड्याच्या नजीक वकिलांचा वाडा आहे असें हमालानें सांगितल्यावरून त्याचेबरोबर मी तेथें गेलों. उघड्या दिवाणखान्याच्या दारावर टिचकी मारली. तेथें उभा असलेल्या चपळ व चलाख मुलानें धांवत आंतल्या खोलींत जाऊन आपल्या आईस ओच्यानें ओढीत दिवाणखान्यांत आणलें. पंडितांची हीच पत्नी असावी असा कयास करून मींच आपण होऊन माझें नांव, गांव व केशवन् जमीनदारांना व वकिलांना आगाऊ पत्रें पाठविल्याचें सांगितलें. तेव्हां त्या किंचित् आनंदाश्चर्यानें म्हणाल्या " स्वारी अरविंद बाबूंना भेटण्याकरितां पाँडेचरीस गेल्यापासून त्यांचीं खाजगीं पत्रें पोस्ट परभारें त्यांचे तेथल्या पत्त्यावर पाठवितें. म्हणून तुमचें पत्र येथें आम्हांला मिळालें नाहीं. पण, आपलें नांव माझ्या परिचयाचें आहे. आपलीं प्रवासपर पुस्तकें व विशेषतः ‘ प्रेम कीं लौकिक ’ हें आपलें कादंबरीवजा आत्मचरित्र मीं वाचलें आहे. तसेंच, प्रख्यात प्रोफेसर व विलिंगडन कॉलेजचे पहिले प्रिंसिपाल म्हणून आपली कीर्ति विद्यार्थ्यांच्या तोंडून मीं ऐकली आहे. स्वारी बाहेर गांवीं असल्यामुळें आपल्यास आमच्या येथें राहण्याचा आग्रह करतां येत नाहीं.

पण, केशवन् साहेबांचा बंगला गांवाबाहेर असून बराच दूर आहे. तेव्हां, तिकडे जाण्यास थोडा वेळ लागेल. तरी आपण येथें आरामखुर्चीवर जरा बसा. मी चहाफराळ आणत्यें व गडयास हमालाला आणण्यास धाडतें." अगदीं अनोळखी माणसाला आग्रहपूर्वक चहाफराळ देणाऱ्या गृहिणीच्या थोर मनाचें व पाहुणचारी स्वभावाचें मी मनांत सानंद कौतुक करीत आहें तोंच उपमा, आनरसे, चकल्या इत्यादि सुग्रास उपाहार पदार्थांनीं भरलेलें चहाचें ताट (Tray) माझ्यापुढें आलें सुद्धां. वकिलीणबाईनीं आग्रहपूर्वक व आदरपूर्वक मला फराळ करण्यास विनविलें. त्यांच्याशीं बोलत व त्यांना तिकडील माहिती विचारीत मीं फराळ केला व चहा घेतला. माझें खाणें पिणें संपतें तोंच मूठभर सुपाऱ्या व वेलदोडे मला देत त्या आनंदानें म्हणाल्या " येथून पुढें जाण्यापूर्वी आमचे घरीं आलें पाहिजे. स्वारींच्या पत्राप्रमाणें ते पाँडेचरीहून तुमच्या प्रयाणापूर्वी येतील. आपल्या भेटीनें त्यांना फार आनंद वाटेल." इतक्यांत गडी हमालाला घेऊन आला. " पुढें जाण्यापूर्वी आपल्या घरीं अवश्य येईन. " (तदनुरूप मी शिरशीहून निघण्यापूर्वी वकिलीणबाईस भेटलों) असें म्हणून वकिलीणबाईचा आभारपूर्वक निरोप घेऊन मी निघालों तो थेट केशवन् साहेबांच्या बंगल्यावर आलों. ते माझी वाटच पहात होते. सुंदरराव पंडितांकडे प्रथम गेल्यामुळें चहा फराळ करून आलों आहें असें मीं म्हणतांच " तर मग जेवण तयार आहे. स्नान करून लगेच पाटावर यावें " असें ते म्हणाले. आमचें जेवण होईतों दोन वाजले. मग, आम्हीं दोन तास विश्रांति घेतली. चार साडेचार वाजतां चहा केळ्यांचा फराळ करून आम्ही गांव पहाण्यास निघालों. दोनअडीच फर्लांग, तांबडसर धुळीनें भरलेल्या रस्त्यानें चालल्यावर गांवास सुरवात झाली. प्रथम मारुतीचें देऊळ लागलें. केशवन् म्हणाले, " पूर्वी हीच गांवची शीव होती व येथें दाट जंगल होतें. पण इकडे नुकतेच चारदोन बंगले झाले. कलमी आंब्यांची व इतर फळझाडांची लागवड झाली. त्यामुळें जंगल पुष्कळ कमी झालें. या जंगली माळरानी भागांत रानफुलें पुष्कळ आहेत. तेव्हां मधमाशा पाळून त्यांचेकडून मध

तयार करण्याचा नवा उद्योगधंदा येथें निघण्यासारखा आहे. म्हणून इकडल्या शेतकऱ्यांना व बेकार लोकांना हा धंदा शिकविण्याकरितां एक तज्ज्ञ येथें आणविण्यांत आला. त्याच्या ऑफिसाकरितां आमच्या बंगल्यांतील एक खोली त्याला दिली आहे. त्यानें बंगल्याच्या विस्तीर्ण आवारांत मधमाशांचीं कृत्रिम लांकडी घरें जागोजाग ठेविलीं आहेत. येथें तो तज्ज्ञ शेतकऱ्यांना या नव्या धंद्याचें शिक्षण देत असतो." शिरशीच्या शेतकऱ्यांमध्यें या नव्या धंद्याबद्दल आवड उत्पन्न झाल्यास त्यांची स्थिति सुधारेल असें मला वाटलें. आम्हीं गांवांत शिरतो तोंच डाव्या हातास मल्लिकांमा देवीचें जांभ्या दगडाच्या भिंतीचें व जाड सागवानी खांबाच्या सभामंडपाचें देऊळ लागलें. त्याचें ओझरतें दर्शन घेऊन आम्ही पुढें चाललों. दोन्ही बाजूंस घरें व दुकानें लागत होतीं. हा भाग सखलसा वाटला. पण पुढें टेकडीसारखा उंचवटयाचा भाग लागला. गांवांत जातांना जे जे लोक भेटत ते ते बाबासाहेबांना आदबीनें मुजरा किंवा नमस्कार करतांना पाहून मला किंचित् आश्चर्य वाटलें. ती गोष्ट बाबासाहेबांचे ध्यानांत आल्यामुळें ते मला म्हणाले "माझी या ठिकाणीं बरीच शेती आहे. शिवाय, मी येथल्या नगरपालिकेचा प्रेसिडेंट होतों व अर्बन बँकेचा व्यवस्थापक आहें. खेरीज, येथल्या हायस्कूलशीं व येथल्या मठाशीं माझा निकट संबंध आहे. यामुळें येथले सर्व लोक मला ओळखतात. मीही माझ्या हातून होईल तें त्यांचें काम करतों." इतकें बोलणें होत आहे तों आम्हीं मोटारबसच्या व बैलगाडीच्या तळाशीं आलों. डाव्या हातास एका ख्रिस्ती माणसाचें सोडा वॉटरचें दुकान लागलें. त्यानें आम्हाला आग्रहपूर्वक आपल्या दुकानांत नेऊन बाकावर बसविलें. त्यानें दिलेलें लेमनस्क्वाश पीत बाबासाहेब म्हणाले "हें कुटुंब आमच्या गांवीं फार वर्षांपासून स्थाईक झालेलें आहे. यांचा पिढीजाद धंदा दारू करण्याचा व विकण्याचा. पण कॉंग्रेस सरकारनें दारू गाळणें व विकणें बंद केल्यामुळें तो धंदा बुडाला. पण, सध्यांचे सल्लागार संमतीनें चालणारें सरकार वरकरणी कॉंग्रेसचें धोरण चालवीत असलें, तरी त्यानें वस्तुतः दारूप्रतिबंध टाकून दिला

आहे. यामुळें तुम्हां दुकानदारांना आनंद झाला आहे. पण हल्लींचें सरकार दारू खपाच्या बाबतींत तुम्हांला भराभर परवाने व माफी पत्रकें देऊं लागल्यास आम्हीं कॉंग्रेस पक्षाचे प्रतिनिधी सरकारला सतावून सोडूं व तुम्हाला देऊं केलेल्या सवलती व परवानें रद्द करण्यास लावूं." बाबासाहेबांच्या या कांहींशा गमतीच्या व गंभीरतेच्या बोलण्यावर तो ख्रिस्ती दुकानदार नुसता हसला. त्याला सलाम करून आम्ही उजव्या बाजूच्या उंचवट्यावरील उठावांत दिसणाऱ्या मार्केट, हायस्कूल इत्यादि नगरपालिकेच्या इमारती पहात पुढें गेलों व शेवटीं अर्बन बँकेच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रशस्त दिवाणखान्यांत शिरलों. तेथें कठड्यामागें (Counter)कारकून मंडळी काम करीत होती. बाबासाहेबानीं मला आपल्या काम करावयाच्या खोलींत नेलें. त्यानीं कारकुनाला हाक मारून हायस्कूलच्या हेडमास्तरांना शाळेंत थांबण्याबद्दल निरोप पाठवा म्हणून त्याला सांगितलें. मग, बाबासाहेबानीं रोजकीर्दीवर व दुसऱ्या बुकांवर सह्या केल्या व महत्त्वाचीं कागदपत्रें बंगल्यावर धाडण्यास सांगितलें. नंतर आम्ही शाळेंत गेलों. तेथें तीन शिक्षक व हेडमास्तर प्रवेशद्वाराशीं आमची वाट पहात होते. बाबासाहेबांनीं माझी सर्वांशीं ओळख करून दिली. मग आम्ही उजव्या बाजूच्या हेडमास्तरांच्या खोलींत जाऊन बसलों. माझा शिरशीस किती दिवस राहण्याचा व काय पहाण्याचा विचार आहे म्हणून मला विचारण्यांत आलें. मी उत्तरलों "चार एक दिवस येथें राहीन म्हणतों. म्हणजे शिरशी, बनवासी व गिरसप्पा हीं तीन्हीं स्थळें पहातां येतील. मग, परत जातांना गदग धारवाड, बेळगांव व सांगली येथील मित्रमंडळीस भेटून मला पुण्यास ता. ७ डिसेंबर सन १९४१ रोजीं पोंहचलें पाहिजे," तेव्हां शाळेंतील कामत मास्तर म्हणाले "तुम्हाला दोन तीन दिवसांत तीन्हीं प्रेक्षणीय स्थळें पहातां येतील, मात्र गिरसाप्पाच्या कडाक्याच्या थंडींत एक रात्र राहावें लागेल व शिरशीच्यापेक्षां जास्त गारव्याच्या बनवासी गांवांत तशीच दुसरी रात्र काढावी लागेल. शिरशी गांव एक दीड दिवसांत सहज पाहून होईल. जरा जलदीच्या व किंचित् दगदगीच्या दृश्यदर्शनाची ही सूचना

करण्यांत माझा एक हेतु आहे. आमच्या शाळेंत डॉक्टर रवींद्रनाथ टागोर यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ करावयाचा आहे. त्याकरितां कोणातरी विख्यात वाङ्मयभक्तास निमंत्रण देऊन येथें आणविण्याच्या विचारांत आम्ही होतों, तोंच अचानकपणें आपल्यासारखा वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, प्राध्यापक आमच्या गांवीं चालून आल्यानें आमचें केवढें तरी काम झालें. तेव्हां, आमची आपणांला सविनय प्रार्थना आहे कीं, आपण ता. २६ नवंबर रोजीं तिसऱ्या प्रहरीं आमच्या शाळेस भेट देऊन तैलचित्राचें अनावरण करावें आणि रवींद्रनाथांबद्दल चार शब्द सांगून आपल्या दीर्घकालीन देशाटनांतील अपूर्व अनुभव येथील विद्यार्थ्यांस, शिक्षकांस व गांवकऱ्यांस निवेदन करावा." हें कामतांचें कांहींसें अतिप्रसंगीं भाषण ऐकून हेडमास्तर किंचित् त्रासिकपणें म्हणाले, "अहो कामत मास्तर, आज आलेल्या व आतांच परिचय झालेल्या प्रोफेसरसाहेबांचा विचार न घेतां कविवर्य रवीन्द्रनाथ टागोर यांचेविषयीं व स्वतःचे प्रवासाविषयीं अशीं दोन भाषणें करण्यास सांगितल्यास त्यांना किती श्रम व त्रास पडेल याची तुम्हांला कांहींतरी कल्पना आहे का? शिवाय, तेरवां तिसऱ्या प्रहरास आपली तरी तयारी होईल कां याचा तुम्हीं पुरा विचार केला आहे काय?" कामत मास्तर हजरजबाबी व प्रसंगावधानी दिसले. हेडमास्तरांस त्यांनीं चटकन् उत्तर दिलें, "समारंभाच्या तयारीविषयीं तुम्ही मुळींच काळजी करूं नका. ती करण्याचें काम तुम्हीं माझ्याकडे आधींच दिलें आहे. तेरवां सर्व तयारी पुरी करण्याची हमी मी तुम्हांस देतों. शिवाय, प्रोफेसरसाहेबांनीं खुर्चीवर बसूनच बोलावें म्हणजे त्यांना फारसे श्रम व त्रास होणार नाहीं." या शिक्षकद्वयांचीं वाढतीं प्रश्नोत्तरें थांबविण्याकरितां मीं त्यांस म्हटलें, "मीं शिकविण्याचें काम चाळीस वर्षें केलें आहे व प्रवासाचा अनुभव तीस वर्षें घेतला आहे. तेव्हां भाषण करण्यानें व अनुभव सांगण्यानें मला श्रम व त्रास होणार नाहीं. म्हणून मी कामतांच्या सूचनेप्रमाणें तेरवां तिसरे प्रहरीं आपल्या शाळेंत येऊन समारंभ साजरा करीन." माझ्या कबुलीनें तेथल्या सर्व मंडळींला आनंद

वाटला. हेडमास्तरांना आश्वासन देत बाबासाहेब म्हणाले, " तुम्ही बिनदिक्कत परवांचा बेत नक्की करा. आमच्या बँकेकडून व नगरपालिकेकडून मी तुम्हांला लागेल ती मदत देववितों. प्रिन्सिपॉलसाहेबांच्या उद्यांपरवांच्या प्रवासाचीहि सर्व व्यवस्था मी करतों. "

झालें; याप्रमाणें शिरशीच्या व शिरशीबाहेरच्या दृश्यदर्शनाचा व भाषणाचा बेत ठरवून आम्ही प्रमुदित मनानें बंगल्यावर आलों. ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं दोन प्रहरीं मी गिरसाप्पा गांवाकडे जाण्यास निघालों.

माधव, होनावर व गिरसाप्पा या दोन दृश्यदर्शनाविषयींचें पत्र महायुद्धाच्या कामगिरीवर आफ्रिकेस गेलेल्या डॉ. साने यांना धाडलें आहे. तें तुला दोनचार महिन्यांनीं वाचावयास मिळेल. तेव्हां या पत्रांत शिरशी व बनवासी येथील दृश्यदर्शनाची तेवढीच हकीकत देतों.

ता. २६ नवंबर सन १९४१ बुधवार रोजीं सायंकाळचे पांच वाजतां पंधरा मैलांवर असलेल्या बनवासी गांवीं जाण्यास मी निघालों. तेथल्या मधुकैटकेश्वर देवस्थानच्या व्यवस्थापकास माझी रात्रभर राहण्याजेवणाची व देवालय दाखविण्याची व्यवस्था करण्याबद्दल कानडी परिचयपत्र घेतलें होतें. हा भूमिभाग उंचसखल, दगडाळ, गवती व माळरानीं असून तो हिरडोशीपासून भोरच्या भागासारखा आहे. पण, इकडे पंधरा मैलांत मुळींच वस्ती नसल्यानें या रस्त्यानें जातांना भयाण वाटतें. आम्ही बनवाशीच्या टपालघराशीं येतों तों अंधार पडला. सकाळीं साडेसात वाजतां टपालघराशीं येऊन उभे रहा असें सांगून मोटार हाकणारा आपल्या घरीं गेला. क्लिनराजवळ (cleaner) बिच्छाना देऊन देवस्थानच्या व्यवस्थापकाकडे चल म्हणून मीं म्हटलें. पण, त्याला माझी मराठी बोली समजेना. तरी त्यानें मला देवळाजवळच्या किराणामालाच्या दुकानदाराकडे नेलें. त्यालाहि मराठी येत नव्हतें; पण इतक्यांत एक वृद्ध गृहस्थ दुकानांत आले. त्यांनीं कानडी हेलानें पण मराठींत माझी विचारपूस केली व मला कोठें जावयाचें आहे हें कळतांच त्यांनीं मला देवळामागच्या बोळांतील

मॅनेजरच्या घरीं नेलें. मी कानडीपत्र त्यांना दिलें. त्यांनाही मराठी येत नव्हतें. पण, त्यांचे बैठकीवर हिंदी पुस्तक पाहून त्यांना हिंदी भाषा येत असावी असें समजून मी माझ्या मराठी–हिंदी अशा धेडगुजरी भाषेंत माझ्या प्रवासाचा व त्या रात्रीं त्यांचेकडे उतरण्याचा बेत कळविला. त्यांनीं आपल्या वृद्ध मातोश्रीस उठविलें. तिनें झटपट भात–झुणका करून मला वाढलें. पहांटेस उठून देवदर्शन करून मला सकाळच्या मोटारीनें जावयाचें आहे असें सांगून मी झोपीं गेलों. थंडीमुळें नीटशी निद्रा आली नाहीं. तरी मी सहा वाजतां उठलों. म्यानेजर व त्याची मातोश्री आधींच उठली होती. तिनें तोंड धुण्यास गरम पाणी दिलें व लगेच चहाही दिला. मग, आम्ही मधुकैटकेश्वराचे देवालयांत गेलों. देवालयासभोंवतीं जांभ्या दगडाचा उंच प्राकार असून आंत विस्तीर्ण खुली जागा आहे. प्राकाराच्या आंतल्या अंगास ओवऱ्या केलेल्या आहेत. मुख्य देऊळ हेमाडपंती बांधपद्धतीचें आहे. देवळाबाहेरील व आंतील नक्षीकाम व खोदकाम प्रेक्षणीय आहे. गाभाऱ्यावर हेमाडपंती चौकोनी चिंचोळें शिखर आहे. त्यावरील मूर्तिकाम वाखाणण्यालायक आहे. गाभाऱ्याचे आंत काळ्या दगडी चौथाऱ्यावर उभटें शिवलिंग आहे. मधू व कैटक या दोन राक्षसांना शिवानें मारलें. यामुळें शिवाला मधुकैटकेश्वर नांव पडलें व तेंच नांव या देवालयाला देण्यांत आलें. या प्राकाराच्या आंत गणपति व नृसिंह या देवांचीं दोन छोटीं देवळें आहेत.

शिवलिंगासमोरील दगडी नंदी व त्याचे वरील चार नक्षीच्या खांबांवरील वाटोळें शिखर विशेष वाखाणण्यालायक आहे. या देवळांत सन दोनशें पासून सतराशें पर्यंतच्या काळचे बारा शिलालेख आहेत. अर्थात् हे लेख मागाहून शिलालेखसंग्रहांतूनच वाचणें शक्य आहे.

पण देवालयांतील अद्वितीय दृश्य म्हणजे काळ्या संगमरवरी दगडाचा पलंग होय. कादंब राजघराण्याची बनवासी ही राजधानी असतांना एकाद्या राजाच्या संकटकाळीं हा त्या राजाचा मौल्यवान् व शिल्पकलेचा

दुर्मिळ मासला सुरक्षिततेकरितां देवळांत आणून ठेवलेला असावा असा तर्क करण्यांत आला आहे. हा पलंग साडेसहा फूट लांब, साडेचार फूट रुंद व सवादीड फूट जाड दगडाचा बनविलेला आहे. त्याच्या चारी कंगोऱ्याचें काम फार बारकाईचें व नवलाचें आहे. .पलंगावर दगडी नक्षी-दार छत आहे. या पलंगाला सुरूचे चार कमरभर उंच दगडी खांब आहेत व तेही फार सुंदर आहेत.

नंतर आम्ही नजीकच्या वर्दा नदीच्या किनाऱ्याच्या मोडक्यातोडक्या पायऱ्या उतरून वाळवंटाकडे जाऊं लागलों तोंच तेथल्या दुर्गंधीची शिसारी येऊन मी तत्काळ पाय मागें घेतला. समोर नदीचें वाळवंट व पाण्याच्या प्रवाहाची बारीक धार दिसत होती. नदीच्या पलीकडे पांढरें शुभ्र वाळलेलें गवत दिसत होतें. तें वासाच्या वाळ्याचें वन आहे व येथल्या टिकाऊ सुगंधी वाळ्याचीं पोतींच्या पोतीं बाहेर पाठविलीं जातात असें कळलें. नदीपलीकडील हा निसर्गकृत सुगंध व नदीच्या अलीकडील मनुष्यकृत दुर्गंध घेऊन देवकरणी व मानवकरणी यामधला विरोध माझ्या मनापुढें उभा राहून मला वाईट वाटलें. गांवांतहि जिकडे तिकडे पडकीं जोतीं, पडक्या भिंती, नामशेष झालेल्या इमारती पाहून या जुन्या राज-धानीची दुर्दशा अवलोकन करून मला काळाच्या नाशक पराक्रमाविषयीं-च्या सुभाषितांचें स्मरण होऊन ‘ कालाय तस्मै नमः ’ असें मी पुटपुटलों. मग आम्ही परत आलों. व्यवस्थापकाचे व त्यांच्या मातोश्रीचे आभार मानून मी मोटारींत बसलों व आल्या वाटेनें बाबासाहेबांच्या बंगल्या-वर आलों.

पुढील हकीकत लिहिण्यापूर्वी बनवासीची वाचलेली पूर्वपीठिका तुला येथें लिहितों.

बनवासी हें पुरातन नगर वर्दा नदीच्या उत्तरतीरावरील राजधानीचें शहर होतें. पौराणिक दंतकथेप्रमाणें द्रौपदी व तिचे पति पांडव यांनीं अज्ञात-वासाचें वर्ष या एकीकडच्या व कोनाकोपऱ्यांतल्या नगरींत राहून संप-

विलें. या नगराचा पहिला ऐतिहासिक उल्लेख क्रिस्तपूर्व दोनशे चाळीस वर्षांच्या सुमाराचा आहे; तो हा कीं अशोकानें रक्षित बुद्धभिक्षूस धर्म-प्रसारार्थ बनवासी येथें पाठविलें. ख्रिस्ती सन दोनशेंपासून बाराशें शतकां-पर्यंतच्या काळांत कादंब राजघराण्यांतील राजे वनवासी व सभोंवारचा मोठा मुलूख यांवर राज्य करीत होते. बरेच शिलालेख त्या काळांतील आहेत. हा या भागाचा भरभराटीचा काळ असावा असें दिसतें. पण पुढील काळांत परचक्रानें राजघराणें व राजधानी नष्ट झाली असावी.

पूर्वी लिहिल्याप्रमाणें मी ता. २६ रोजीं साडेदहा वाजतां शिरशीस आलों. ठरल्याप्रमाणें तिसरे प्रहरीं मी हायस्कुलांत हजर राहून डॉक्टर रवींद्रनाथ टागोरांच्या तैलचित्राचें अनावरण केलें. त्यांच्याविषयीं व माझ्या प्रवासाविषयीं मीं तास सवातास भाषण केलें. सभा संपल्यावर फरग्युसन–विलिंगडन कॉलेजांचे माजी विद्यार्थी भेटले त्यामुळें उभयतांना आनंद झाला. तेथूनच बाबासाहेबांच्या बँककारकुनाबरोबर शिरशीची बाजारपेठ व बागा पहाण्यास निघालों. बाजारपेठ मोठी व मोठ्या देवघेवीची दिसली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस मोठमोठालीं दुकानें व वखारी होत्या. रस्त्याच्या कडेला पोत्यांच्या राशींच्या राशी पाहून मला आश्चर्य वाटलें. कारकून म्हणाले "हीं सर्व पोतीं मिरीं, सुपारी, वेलदोडे व इतर घाटीमाल यांनीं भरलेलीं आहेत. हा माल बैलगाड्यांनीं व मोटारलॉऱ्यानीं हुबळीस पाठविला जातो व तेथून रेलवेमार्गानें निर-निराळ्या शहरीं जातो व त्याच साधनांनीं कांहीं माल कुमठ्यास पाठविला जातो व तेथून जलमार्गानें निरनिराळ्या बंदरीं जातो." नंतर आम्ही एका मोठ्या वखारींत शिरलों. डाव्या हातच्या लांबचलांब सोप्यांत बायका सुपाऱ्यांची व वेलदोड्यांची वर्गवारी लावून पोत्यांत भरीत होत्या. पुरुष पोतीं शिवीत होते. वखारीच्या डाव्या हातास मालकाची खोली होती. आंत शिरल्यावर कारकुनानें त्यांना माझा परिचय करून दिला. शिरशीचा मासलेदार माल म्हणून शेरभर सुपाऱ्या व पावशेर वेलदोडे मला

पाहिजेत म्हणून मी म्हटलें. त्याप्रमाणें मालकानें कागदाच्या पिशव्यांत त्या वस्तू भरून पिशव्या कारकुनाच्या हातीं दिल्या. मालकाला मालाची किंमत देऊन व त्यांचे आभार मानून आम्हीं बागांकडे निघालों.

बाजारपेठ उंचवट्यावर आहे. पुढचा रस्ता जरा खालपट वाटला. बाजारपेठ संपते तोंच सरकारी इमारती लागल्या. नंतर बऱ्याच खोलांत लहानसें तळें लागलें. त्याच्या उजव्या बाजूनें आम्हीं खोल उतरत गेलों, तोंच केळी-नारळी, पोफळीच्या बागाच बागा लागूं लागल्या. शेवटीं आम्हीं एका सखल व गर्दछाय बागेंत शिरलों. तेथें मला वेलदोड्याचीं झाडें, केळी-नारळी पोफळीच्या वृक्षांच्या सावलींत लावलेलीं दाखविण्यांत आलीं. ती बंगल्यापुढील कुंड्यांतील शोभेच्या नारळीच्या (Palm) रोप्यासारखी थेट दिसत होतीं. वेलदोड्यांच्या झाडास मुळाजवळ आडवे ताण फुटतात व त्यांच्या पेरापेराला वेलदोडे लागतात असें दिसलें. दोनचार वेलदोड्यांनीं भरलेले ताण मी घरच्या मंडळीस दाखविण्याकरितां रुमालांत बांधून घेतले. वेलदोड्याच्या झाडांच्या सारखीं मिऱ्याच्या व विड्याच्या पानाच्या वेलींना वेगळीं आळीं लागत नाहींत. त्या वेलींचीं कडीं नारळी-पोफळीच्या आळयांतच पुरतात. वेलीं काढूं लागल्या कीं त्या आळयांतील झाडावर चढवितात. मिरवेलीचीं व पानवेलीचीं पानें अगदीं एकसारखीं दिसतात. मात्र मिरवेलींना मिऱ्याचे घोसच्या घोस येतात; तर पानवेलींना पानांची माळची माळ लागते. मिऱ्याचे घोंस व वाळलेलीं पानें मी पूर्वीच्याप्रमाणें रुमालांत बांधून घेतलीं. नंतर तडक परत फिरलों. कारकून बंगल्यापर्यंत मला पोंचविण्यास आले. बाबासाहेब अंधार झाला म्हणून गड्याला कंदील देऊन गांवाकडे पाठविणार होते. इतक्यांत आम्ही बंगल्यांत गेलों. बाबासाहेब मला पाहून किंचित् विषण्ण मनानें म्हणाले, " निकडीच्या कामामुळें मला समारंभास येतां आलें नाहीं. मग मी तडक बंगल्यावर आलों. " नंतर कारकुनाकडे वळून ते म्हणाले, " पाहुण्याकरितां उद्यांच्या पहिल्या बसमध्यें जागा राखून ठेवण्याची व

सकाळीं गड्याबरोबर आधीं धाडूं तें त्यांचें सामान नीट ठेवून घेण्याची व्यवस्था करा. आम्ही आमच्या कारमधून बरोबर वेळेवर येतों." जातांनाच सीट सांगून बिऱ्हाडीं जाईन व सकाळीं अड्ड्यावर येऊन आपली वाट पाहीन असें म्हणून कारकून गेला.

नंतर आमचें जेवणखाण झालें. बाबासाहेब नमस्ते करून झोपण्यास खोलींत गेले. सामानाची बांधाबांध करून मीहि झोपीं गेलों. सकाळीं सहाला उठतों तोंच बाबासाहेब खोलीबाहेर आले. चहा पीत पीत त्यांनीं माझ्या मुलामाणसांबद्दल आपुलकीनें चवकशी केली. ती मीं सांगितल्यावर ते म्हणाले "माझा थोरला मुलगा ज्युपिटर विमा कंपनीच्या हुबळी शाखेचा म्यानेजर आहे; दुसरा लाँगमन्स प्रकाशकांचा फिरता विक्रेता आहे; तिसरा मुंबईत मेकॅनिकल एंजिनियरिंग शिकत आहे. माझी एक मुलगी शिकते आहे व धाकटा प्रभाकर अझून लहान पण चलाख आहे. मी पुण्यास गेलों तर काँग्रेस हाऊसमध्यें उतरतों. आतां झालेला परिचय दृढ व कायमचा होईल अशी मी आशा करतों."

बाबासाहेब मितभाषी व एकांतप्रिय असावे असें मला प्रथम वाटलें होतें. पण, दोन चार दिवसांच्या सहवासानें ते बहुभाषी व संगतिप्रिय आहेत, असें मला कळून त्यांच्याबद्दल माझें अनुकूल मत बनलें.

बाबासाहेबांचा छोटा प्रभाकर चौकस व चलाख मुलगा आहे खरा. बंगल्यांत पाऊल टाकल्यापासून त्यानें माझ्यावर जो प्रश्नांचा भडिमार सुरू केला तो बंगल्यांतून बाहेर पडेपर्यंत चालू ठेवला. मी त्याच्या प्रश्नांचीं आनंदानें उत्तरें देत असल्यामुळें त्याची माझी गट्टी जमली. पण, प्रभाकर प्रश्न विचारून व त्यांचीं उत्तरें घेऊन थांबला नाहीं. त्यानें माझी ट्रंक उघडून पाहावी; माझीं पुस्तकें चाळावीं; माझ्या जवळचे फोटो पहावे; दंतमंजन, सुगंधी सुपारी व सुकामेवा यांचे डबे हुडकावे व शेवटीं आदबीनें व आर्जवानें सुगंधी सुपारी व सुकामेवा मागावा असें दररोज चाले. खजूराची एक बी किंवा बोटुक व सुगंधी सुपारीची चिमुट मी

आवडीनें देई. संध्याकाळीं आल्यावर मी त्याची चवकशी करीत असें. प्रभाकर खरोखरीं गोड स्वभावी बालक होता यांत संशय नाहीं. माझ्या प्रयाणाच्या दिवशीं प्रभाकर वडिलांबरोबर उठला. मी निघतांना सर्वांचा निरोप घेतला. बापलेक मला पोचविण्याकरितां मोटार अड्ड्याशीं आले. पहिल्या मोटारींत जागा न मिळाल्यामुळें मला दुसऱ्या दीड तासानें निघणाऱ्या मोटारनें जावें लागलें. मला निघण्यास वेळ लागणार असें पाहून बाबासाहेब मला नमस्ते करून व पाहुण्यांना प्रश्न विचारून त्रास देऊं नको असें प्रभाकरास बजावून बँकेकडे गेले. मी प्रभाकराशीं बोलत बसलों व त्याला चांगला अभ्यास करण्याचा व वडिलांचा कित्ता डोळ्यापुढें ठेवण्याचा उपदेश केला. इतक्यांत मोटारबसनें निघण्याच्या इशाऱ्याचा कर्णा फुंकला. मी प्रभाकरास नमस्ते करून बसमध्यें बसलों व मार्गस्थ झालों. कळावें हे आशीर्वाद

तुझा
दादा

७

महाड, जिल्हा कुलाबा.
ता. १५ जानेवारी सन १९४२

चि. मनोहर व सौ. यमुताई,
७६१/३ भांबुर्डा, पुणें ४.

अनेक आशीर्वाद वि. ७ नवंबर सन १९४१ रोजीं रात्रीच्या टपाल आगगाडीनें मी हुबळीचें एक महिना मुदतीचें परतीचें तिकीट काढून तुमचा निरोप घेऊन **कारवारच्या** दृश्यदर्शनास निघालों तो एक महिन्यांत प्रवास पुरा करून प्रकृति सुधारून ६ दिजंबर १९४१ रोजीं परत आलों. माझ्या प्रवासपर पत्रांतलें सातवें पत्र मी तुम्हाला लागलीच लिहिणार होतों. पण, कांहींना कांहीं कारणांनीं तें आजतागाईत लिहूं शकलों नाहीं.

हें पत्र समारोपादाखल लिहीत असल्यानें मागच्या पत्रांतील मजकुराची पुनरावृत्ति होण्याचा संभव आहे. पण, मी होतां होईल तों तुम्हा दोघांना आवडणाऱ्या कारवारच्या भौगोलिक व सामाजिक गोष्टींबद्दल आणि आपल्या सर्वांना चिरपरिचित असलेल्या मित्रमंडळीच्या भेटी–गांठीं-विषयीं लिहिणार आहे.

कारवार जिल्हाची आकृति म्हणजे हिंदुस्थानची छोटी आवृत्ति आहे असें जिल्ह्याचा नकाशा पहातांच चटादिशीं मनांत येऊन मला नवल वाटलें. ज्या-प्रमाणें हिंदुस्थानच्या वायव्य टोंकाला अफगाणिस्थान देश आहे त्याप्रमाणें कारवारच्या वायव्य टोकाला फिरंगी प्रांत (पोर्तुगालाचा मुलूख) आहे. जसें हिंदुस्थानचें कन्याकुमारी दक्षिण टोंक आहे तसें कारवारचें भटकळ बंदर आहे. हिंदुस्थानच्या लांबच लांब पश्चिम किनाऱ्याच्या मधला काठेवाडचा भूमिभाग जसा समुद्रांत अर्धवर्तुळाकार घुसला आहे तसा सदाशिवगडाचा भूमिभाग कारवारच्या समुद्रांत घुसला आहे. हिंदुस्थानच्या पश्चिमेस असलेला आरबी समुद्रच कारवारच्या पश्चिमेस आहे; शेवटीं ज्याप्रमाणें

हिंदुस्थानच्या पूर्वेस आसाम व ब्रह्मदेश आहेत त्याप्रमाणें कारवारचे पूर्वेस कर्नाटक व म्हैसूर आहेत.

कारवार जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारें एकशेंवीस मैल आहे तर पूर्व-पश्चिम रुंदी त्याचे मध्याचे सुमारास पन्नास मैल आहे.

जिल्ह्याचें क्षेत्रफळ सुमारें चार हजार चौरस मैल आहे. जिल्ह्याचें दहा बारा मैलांचें उत्तर टोक व तितक्यांच मैलाचें दक्षिण टोंक फार अरुंद आहे व म्हणून त्याचे विभाग पडत नाहींत. पण, मधल्या पन्नास पाऊणशें मैलांच्या भूमिभागाचे सह्याद्रि पर्वताच्या दक्षिणोत्तर जाणाऱ्या रांगेनें तीन विभाग होतात. पश्चिमेकडच्या समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागांत रुंदट खारट सरोवरें, विविधपिकी माळ–मैदानें व समुद्राला भिडणाऱ्या गर्दछाय टेकड्या असून सर्व भूमि हिरवीगार नयनमनोहर दिसते. मधल्या भागांत भव्य व वनदाट रानानें व्याप्त सह्याद्रि पर्वताची रांग असून घाटाच्या वर व खालीं उंची इमारती वृक्षांची लागवड केलेली आहे. यामुळें हा भूमिभाग चित्ताकर्षक आहे, इतकें नव्हे तर, तेथल्या रहिवाशांना किफायतीचा कामधंदा देणारा आहे. पूर्वेकडचा भूमिभाग मधून मधून भुरट्या जंगलानें आच्छादित आहे खरा; पण बाकीचा भाग रुक्ष व उजाड आहे; पण त्यांत लोकवस्ती दाट आहे. परंतु एकंदरींत कारवार जिल्हा डोंगराळ गर्दछाय वृक्षांनीं व नदीनाल्यांनीं युक्त व म्हणून तापाचें आगर बनला आहे.

या जिल्ह्यांत काळी, गंगावली, अघनाशिनी किंवा ताद्री व शरावती या चार मोठ्या नद्या आहेत. त्या सर्व कमीजास्त प्रमाणांत नौकानयनक्षम असून त्यांचे मुखाशीं जुनीं नवीं बंदरें आहेत. या सर्व नद्या सह्याद्रि पर्वताच्या माथ्यावरील उतरत्या व खोलगट ठिकाणांहून उगम पावून सह्याद्रीच्या पश्चिमेकडील भिंतीसारख्या उंच खडकांवरून उड्या घेऊन खालचा सपाट प्रदेश सुपीक बनवून अरबी समुद्राला मिळतात. या नद्यांच्या अशा प्रकारच्या प्रवाहगतीमुळें या प्रत्येक नदीनें एक एक

निसर्गरमणीय धबधबा निर्माण केला आहे. यांपैकीं शरावती नदीचा गिरसाप्पा धबधबा नऊशें फूट उंचीच्या खडकावरून चार मुखानें खोल दरींत पडतो. हा निसर्गनिर्मित देखावा पाहण्याकरितां सर्व जगांतले प्रवासी कारवारची यात्रा करतात. दुसरा कमी प्रख्यात पण तितकाच नयन-मनोहर लुशींगटन नांवाचा धबधबा अघनाशिनी नदीनें निर्माण केला आहे. तिसरा लहानसा धबधबा गंगावली नदीनें मागोड गांवानजीक केला आहे. चवथा व शेवटचा छोटासा धबधबा लालगुली गांवाजवळ असून तो कालीनदीनिर्मित आहे.

हिंदु पंचांगाप्रमाणें जरी वर्षाचे सहा ऋतू मानतात, तरी वास्तविकपणें वर्षाचे चार चार महिन्यांचे तीनच खरे व निश्चित ऋतू पडतात. आक्टोबर, मार्च, एप्रिल व मे हे चार महिने ग्रीष्म किंवा उन्हाळा ऋतू असतो; जून-जुलै-आगष्ट-सपटंबर हे महिने वर्षा किंवा पावसाळा ऋतु असतो व नवंबर-दिजंबर—जानेवारी—फेब्रुवारी हे चार महिने वसंत ऋतु असतो. म्हणजे या जिल्ह्यांत थंडी किंवा हिवाळा नसतोच म्हणाना. सर्व वर्षभर समशीतोष्ण हवा असते. पण या जिल्ह्यांतील वसंत ऋतूचे चार महिने बेताच्या थंडीचे व खुब आनंददाई असतात. मीं वसंत ऋतूचे प्रारंभींच प्रवास केल्यामुळें मला तो फार सुखदाई व आरोग्यवर्धक झाला. हा जिल्हा डोंगराळ असल्यामुळें येथें एकंदर वर्षात पुष्कळच पाऊस पडतो. सह्याद्रि पर्वत व आरबी समुद्र या दरम्यानच्या भूमिभागांत सरासरीनें सुमारें सवाशेंपासून दीडशें इंच पाऊस पडतो. पूर्वेकडील घाटमाथ्याच्या उघड्या पठारावर पन्नास साठ इंच इतकाच पाऊस पडतो.

भूगर्भदृष्ट्या कारवार जिल्हा महत्त्वाचा नाहीं. भूगर्भाच्या ज्वालामुखींतून निघणाऱ्या रसानें बनलेले काळेभोर खडक व त्याचीच बनलेली काळी कुळकुळीत जमीन या जिल्ह्यांत नाहींच म्हणाना. येथली जमीन खड-बडित, सछिद्र जांब्या दगडाची व त्याच्याच बनलेल्या मुरमाड तांबड्या मातीची आहे. यामुळें या भागांत भूमिगत पाणी पुष्कळ असतें व म्हणून

या जिल्ह्यांत सर्वत्र जंगलें व झाडझाडोरा चांगला वाढतो व तीच या जिल्ह्याची उत्पन्नाची मोठी बाब आहे. जांब्या दगडांत लोखंडाचा अंश असतो; पण तें किफाईतशीर प्रमाणांत नसल्यामुळें येथें लोखंड काढण्याचे कारखाने निघणें शक्य नाहीं. समुद्रालगतच्या भागांत नारळी, पोफळी, केळी मुबलक होतात व लाकडाच्या खालोखाल जिल्ह्यांतील उत्पन्नाचीं पिकें नारळ, सुपारी व केळी हीच होत.

आतां या जिल्ह्यांतील लोकवस्ती, लोकरीती व लोकस्थिति यांकडे लक्ष देऊं या.

खानेसुमारीच्या आंकड्यांवरून पहातां कारवार जिल्हा निवळ हिंदू लोकवस्तीचा आहे. शेकडा नव्वद लोक हिंदुधर्मी आहेत; शेकडा सहा मुसलमानधर्मी आहेत, शेकडा तीन क्रिस्तधर्मी आहेत व बाकीचे इतरधर्मी लोक केवळ शेकडा एक आहेत. मोठ्या नद्या, उंच पर्वत व अफाट समुद्र या दुर्लंघ्य सीमांनीं सुसंरक्षित असल्यामुळें कारवार जिल्ह्यांत धर्माधर्मांतील द्वेष व कलह उत्पन्न करणाऱ्या चळवळी पसरल्या नाहींत. यामुळें या जिल्ह्यांत विविध धर्मपंथीय लोकांमध्यें गुण्यागोविंदानें राहण्याची प्रवृत्ति दिसून येते. अतएव हिंदुमुसलमानी तंटेबखेडे येथें क्वचित्च उद्भवतात. हिंदूंमध्यें सुद्धां पांढरपेशा जातीची लोकवस्ती महाराष्ट्रांतील इतर भागांपेक्षां जास्त आहे. त्यांतल्या त्यांत ब्राह्मणांची वस्ती शेकडा चवदा या बऱ्याच मोठ्या प्रमाणांत आहे. कारवार जिल्ह्यांत द्रविड ब्राह्मणांच्या दहा व गौड ब्राह्मणांच्या सात जाती आहेत. पण, त्यामध्यें हवीक ब्राह्मणवस्ती गौड ब्राह्मणवस्तीच्या दुप्पटीनें आहे. ही नवलाची गोष्ट वाटतें कीं, हवीक ब्राह्मण जातीनें शेती–बागायती करण्याचा मुख्य किंवा दुय्यम धंदा करतात; तर गौड ब्राह्मण उदीम व्यापार, हा मुख्य किंवा दुय्यम धंदा करतात. या दोन्ही जातींच्या लोकांनीं शेतीबागायती असा आपला धंदा खानेसुमारी करणारांना सांगितला नसावा; म्हणून कारवार जिल्ह्याच्या खानेसुमारीच्या आंकड्यांत हिंदुस्थानांत दुसऱ्या

कोठेंही न दिसणारी शेतकरीवर्गाची शेंकडा छत्तीस येवढीच संख्या दिसते. बाकी हें खरें कीं जिल्ह्यांत लागवडीलायक जमीन फार कमी असल्यामुळें शेतीबागायतीवर फार लोकांची उपजीविका होऊं शकत नाहीं. अर्थात् पुष्कळ लोकांना बाहेरप्रांतीं जाऊन शेतकीतर धंदे करणें भाग पडत असावें. वरील माहितीवरून कारवार जिल्ह्यांतील लोकवस्तीची व धर्मपंथाची तुम्हांला स्पष्ट कल्पना येईल. बहुसंख्य हिंदु लोकांमध्यें शंकराचार्य मतानुयायांचा फार मोठा भरणा आहे.

पण स्वामींचे मठ मात्र पुष्कळ आहेत व ते संपन्न आहेत. मी जीं गांवें पाहिलीं त्या प्रत्येक गांवीं लहानमोठे मठ मला पहावयास सांपडले. तसेंच देवांच्या प्रचंड रथांच्या मिरवणुकी काढण्याची पद्धतीही फार प्रचारांत आहे. इतर ठिकाणांच्या मानानें **कारवारच्या** लोकसंख्येंत पांढरपेशा जातीचें त्यांतल्या त्यांत ब्राम्हण जातीचें प्रमाण कांहींसें जास्त असल्यामुळें म्हणा किंवा निसर्गदेवीनें कारवार प्रांतावर आपला वरदहस्त ठेवल्यामुळें म्हणा येथल्या सर्व वर्गांत सदभिरुचि दिसून येते. म्हणूनच खेडेगांवांतील लहानशीं झोपडीवजा मातीचीं घरें सुद्धां तांबड्या-पिवळ्या रंगानें रंगवितात, निदान चुन्याची सफेती देतात. सभोंवतीं लहानमोठीं फुलझाडें व फळझाडें लावतात. घरासमोर छोटासा झापांचा मांडप घालतात. तो झापांनीं कुडून टाकतात, आंतली जमीन सारवून व दगडांनीं घोटून गुळगुळीत करतात. आंगणाभोंवतीं ऐपत असल्यास जांब्या दगडाची खुजी भिंत बांधतात. तसें करणें शक्य नसल्यास झापांनीं आच्छादलेली कुडण तरी घालतात. सारांश, तिकडील गरीब श्रीमंत लोकांच्या अंगणांत पाऊल टाकलें कीं माणसाचें मन प्रमुदित झाल्याखेरीज रहात नाहीं. घरांप्रमाणें तिकडील लोकांचा पोशाख साधा पण स्वच्छ असतो. महात्मा गांधींची साध्या रीतीरहाणीची शिकवण मनाला पटल्यामुळें म्हणा किंवा ती कमी खर्चाची दिसून आल्यामुळें म्हणा तिकडील लहानथोरांच्या व स्त्रीपुरुषांच्या पोशाखांत देशी वस्त्र-

प्रावरणाचा प्रसार पुष्कळ दिसला. पांढरी गांधी टोपी, संघाचा पिवळसर किंवा नीळसर सदरा व तसलीच छोटी विजार हा साधा व स्वस्त पोशाख सर्वत्र घालण्याचा प्रघात पडला आहे.

शेतांत किंवा बागांत काम करतांना मळखाऊ रंगाची विजार किंवा तसल्याच रंगाचें गुडघाभरीचें धोतर माणसें नेसतात. तेव्हां टोपीची अडगळ नको असते. बिनपांढरपेशा कामकरी बाया सकच्छ किंवा विकच्छ पण काम करण्यास सुटसुटीत अशी आखूड लुगडी किंवा पातळें नेसतात. पांढरपेशा बायकांमध्यें—त्यांतल्या त्यांत सुशिक्षित स्त्रियांमध्यें व शिकणाऱ्या प्रौढ मुलींमध्यें—पातळें गोल नेसण्याची रीत वाढत्या प्रमाणांत आहे. कारवारला लागून असलेल्या हुबळी—धारवाड या कर्नाटक भागांत तर सर्व बायका—शिक्षित—आशिक्षित, वृद्ध—तरुण व विवाहित—अविवाहित—विधवा—लुगडीं किंवा पातळें गोल तऱ्हेनें नेसतांना पाहून मला प्रथम नवल वाटलें. कारण, कॉलेजांत जाणाऱ्या मुलींत पारशी—गुजराती यांसारख्या परप्रांतीय मुलींच्या सहवासानें व अनुकरणानें ही नवी पद्धति फैलावली असावी अशी माझी समजूत होती. पण, हुबळींतील माझ्या आठवड्याच्या निवासानें मला समजून आलें कीं ही गोल किंवा विकच्छ नेसण्याची पद्धत कर्नाटकी बायकांत पुरातन काळापासून चालू आहे. मोटारीच्या जलद दळणवळणानें व कर्नाटकी बायकांच्या परिचयानें गोल नेसण्याची पद्धत कारवारी बायकांत शिरावी हें क्रमप्राप्तच आहे.

पोटशाखांप्रमाणें कारवारी लोकांचें खाणेंपिणें साधें, स्वस्त पण रुचकर आहे. आधीं सर्व कोकणाप्रमाणें व मद्रास इलाख्याप्रमाणें येथील लोकांचें मुख्य अन्न भात हें होय. येथें गव्हाच्या पोळया, लाडू, शिरापुरी, जिलब्या, मोतीचूर इत्यादि पक्कानें सणावारीं व त्यांतही संपन्न कुटुंबामध्यें करतात. रोज सकाळसंध्याकाळ भात खाण्याची सररहा रीत आहे. घावन अंबोळया सांदणें मोदक खापरपोळया इत्यादि पक्कानें तांदुळाच्या पिठाचीं करतात. सारस्वत ब्राह्मण मत्स्याहारी आहेत तर, हविक ब्राह्मण मासे-

सुद्धां खात नाहींत; ते शुद्ध व केवळ शाकाहारी आहेत. पण सर्व वर्गांमध्यें शाकाहाराचीच पद्धति पूर्वापारपासून चालत आलेली आहे. या प्रांतांत हिंदु व जैन राजांचा अंमल बरींच शतकें असल्यानें व हिंसाप्रिय मुसलमान व मांसाहारी परद्वीपस्थ यांचा या भागांत फारसा शिरकाव झाला नसल्यानें हिंदूंच्या व जैनांच्या दयामय धर्माचा पगडा जनमनावर आजतागायत कायम आहे. म्हणून, येथें बहुतेक लोक शाकाहारी आहेत.

कारवारी लोकांच्या सामाजिक चालीरीती इतर ठिकाणच्या हिंदूंपेक्षां निराळ्या नसल्यानें त्या चिरपरिचित गोष्टींचें वर्णन करण्याचें कारण नाहीं. पण, कारवारी लोक अतिथिसत्कारशील, संगतिप्रिय, वाङ्मयप्रेमी व स्त्रीपुरुष–शिक्षणाभिलाषी आहेत असें माझ्या महिन्याच्या प्रवासांत मला आढळून आलें. मी ज्या ज्या ठिकाणीं गेलों व राहिलों तेथल्या तेथल्या लोकांनीं मला आदरानें वागविलें. या लोकांत कांहीं माझे जुने विद्यार्थी होते खरें; पण पुष्कळशी मंडळी मला अपरिचित होती; तरी सुद्धां मला केव्हांही बेपर्वाईनें किंवा परकीपणानें वागविण्यांत आलें नाहीं.

कारवारी लोकांच्या शिक्षण व वाङ्मय या द्वयीच्या प्रेमाबद्दल मला पदोपदीं अनुभव आला. या जिल्ह्यांत शिक्षणाचा व वाचनालयाचा प्रसार जास्त असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं मला शाळा व वाचनालयें दिसून आलीं. प्रत्येक स्थळीं मला भाषणें करावीं लागलीं व व्याख्यानें द्यावीं लागलीं. मला माझ्या शिक्षकाच्या पेशाची जणू कांहीं पुनर्भूमिका घ्यावी लागली. व्याख्यान–विषय माझ्याच पसंतीचे व आवडीचे होते ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती. दळणवळणाच्या साधनांतील क्रांती, प्रवासाचे फायदे व त्यांतील अनुभव, पाश्चात्य शिक्षणाचा इतिहास व त्याचें खरें ध्येय इत्यादि विषयांवर मी लहानमोठ्या समाजांपुढें इंग्रजींत व मराठींत व्याख्यानें दिलीं. ज्या ठिकाणीं कानडीचा जास्त प्रसार आहे, तेथें मला नाइलाजानें इंग्रजींत व्याख्यान द्यावें लागे. खुद्द कारवार शहरांत मला दोनदां इंग्रजींत बोलावें लागलें. कारण, येथें

कानडीचा तर प्रचार आहे, पण येथें कोकणी–कारवार–मंगळूर प्रांतांतील पोटभाषा–ही स्वतंत्र व मराठीपासून अगदीं वेगळी अशी भाषा आहे; म्हणून कारवारांतील शाळांत तरी मराठीच्या ऐवजीं कोकणी भाषा विद्यार्थ्यांची मातृभाषा म्हणून अभ्यासक्रमांत अंतर्भूत करण्यांत यावी अशी चळवळ झाल्यानें कारवारच्या सुशिक्षितांना मराठीपेक्षां इंग्रजी भाषा चांगली वाटते.

झालें. माझें कारवाचें वर्णन संपलेंच. पण, पत्र मात्र संपलें नाहीं. स्वगृहीं परत येतांना तुमच्या पत्रानुरूप मी आपल्या जुन्या मित्रांना व चिरपरिचित स्थळांना भेट देत प्रवास संपविला. तरी त्यांचें अतिसंक्षेपानें वर्णन करतों.

या परत प्रवासांत पाहिलेलें पहिलें शहर गदग होय व तेथें भेटलेले गृहस्थ डॉ. चाफेकर हे होत. मी तेथें १ दिसेंबर १९४१ रोजीं दिवसां दहा साडेदहाच्या सुमारास पोंचलों. जेवणखाण आटोपल्यावर व दीडदोन तास विश्रांति घेतल्यावर डॉ. चाफेकरांच्या मोटार गाडींतून आम्ही घराबाहेर पडलों. आधीं त्यानीं आपल्या प्रशस्त बंगल्यांत काढलेलें व स्वतः चालविलेलें सूतिकागृह दाखविलें. तें पाहून मला डॉ. चाफेकरांच्या कर्तृत्वाबद्दल कौतुक वाटलें. नंतर, आम्हीं गांवची नवी वस्ती व कापूस–बाजार, पेठ पाहिली. हुबळीच्या प्रमाणें गदग हें कर्नाटकांतील कापसाचें केन्द्र बनलें आहे व यामुळें गेल्या तीसपसतीस वर्षांत शहराची वाढ व विस्तार विलक्षण वाढला आहे असें मला दिसलें. नंतर गदगच्या महाराष्ट्रीय मंडळीच्या मदतीनें व एका श्रीमान गृहस्थाचे औदार्यानें नुकतेंच सुरू झालेलें गांवाबाहेरचें तुकारामराव चव्हाण नांवाचें हायस्कूल पाहिलें. त्याच्या नव्या जुन्या इमारती व शाळेचे वर्ग मला दाखविण्यांत आले. त्या अर्धवट बांधलेल्या बिनागिलाव्याच्या इमारती व सपाट हवाशीर उंचवट्याचें व तांबडेंलाल मैदान पाहून मला सांगलीच्या सन १९२२।२३ सालच्या इमारतीची व खुल्या जागेची आठवण झाली. मग आम्ही परत

गांवांत आलों व तेथली जैनबस्ती व हिंदू देवालय पाहिलें. या दोन्ही देवालयांच्या सुंदर व नक्षीच्या कामाची व बांधकला पद्धतीची कल्पना निराळ्या छापलेल्या छाया चित्रावरून येईल. नंतर पुन्हा नव्या वस्तींतील महिलाश्रम, वाचनालय व महाराष्ट्र मंडळ या संस्था व त्यांच्या छोट्या पण सुबक इमारती पाहिल्या. शेवटीं, महाराष्ट्र मंडळाच्या खुल्या सभामंडपांत महाराष्ट्र मंडळ व महिलाश्रम या दोन्ही संस्थांच्या सभासदांपुढें माझें ‘ माझ्या दीर्घकालीन व दूरदूरच्या प्रवासांतील अनुभव ’ या विषयावर व्याख्यान झालें. डॉ. चाफेकर बंधुभगिनी व प्रौढ मुले-मुली यांना माझी ओळख करून देतांना म्हणाले “ प्रोफेसरसाहेबांना माझी ओळख राहणें शक्य नाहीं. पण त्यांना व त्यांच्या तिन्ही मुलांना त्यांच्या व माझ्या विद्यार्थीदशेपासून मी ओळखतों. कारण, हे पितापुत्र न्यु इंग्लिश स्कूलच्या गद्रेवाड्यांतील वसतिगृहांत स्वतंत्र बिऱ्हाड न करतां विद्यार्थ्यांच्या खोल्यांच्या मधोमध असलेल्या तीन खोल्यांत राहात असत व विद्यार्थ्यांच्या पंक्तींत बसून विद्यार्थ्यांशीं सलगीनें बोलत व हसतखेळत जेवीत असत. गुरुवर्यांच्या अशा साध्या सलगीच्या व सहानुभूतीच्या वागणुकीनें सर्व विद्यार्थ्यांचा विश्वास व आदर त्यांनीं संपादन केला होता. त्याप्रमाणें माझ्या मनांत त्यांच्याबद्दल आदर वसत असे.

शाळा कॉलेज सोडल्यापासून आज तीस वर्षांनीं गुरुवर्यांचे पाय माझ्या निवासस्थानाला व धंद्याच्या ठिकाणाला लागले हें मी आपलें सद्भाग्य समजतों. इतक्या दीर्घ कालानंतरसुद्धां त्यांचा पूर्वींचाच साधा, सरळ व सहानुभूतिपर स्वभाव व जुन्यानव्या विद्यार्थ्यांशीं सलगीची वागणूक हीं जशींच्या तशींत आहेत हें पाहून त्यांच्याबद्दल माझा आदर व पूज्यभाव दशगुणित झाला आहे. अशा थोर विभूतीचा माझ्या येथल्या बंधु–भगिनींना परिचय करून देतांना मला फार आनंद होत आहे. ”

डॉ. चाफेकरांनीं केलेल्या प्रशंसातिशयानें मला किंचित् लाजल्यासारखें झालें व म्हणून भाषणाच्या प्रारंभीं डॉक्टरांच्या विधानास विरोध दाख-

वून मीं आपलें भाषण केलें. रात्रीच्या नवाच्या गाडीनें मी हुबळीस आलों. डॉ. चाफेकरांनीं फोटोबरोबर धाडलेल्या अहवालावरून तेथल्या वाङ्मय-प्रेमी मंडळीची व तिच्या विविध शाखांच्या कार्याची प्रशंसनीय प्रगति चाललेली कळून मला आनंद झाला.

ता. २ दिजंबर १९४१ मंगळवार रोजीं मी सकाळच्या आगगाडीनें बारा मैलांवरील **धारवाडास** आलों. आडके एंजिनियरच्या मोटारकारमधून त्यांचे बंगल्यावर आलों. ते डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाच्या अध्यक्षाबरोबर काम पहाण्यास गेले होते. पण त्यांच्या वृद्ध मातोश्रीनें माझें प्रेमपूर्वक स्वागत करून मला आग्रहानें चहा फराळ दिला. मग मी सावकाश स्नान करून वर्तमानपत्र वाचीत बसलों. बारासाडेबाराच्या सुमारास आडके इंजिनीयर काम करून बंगल्यावर आले व आनंदानें म्हणाले "मनोहरच्या पत्राप्रमाणें तुम्हीं आलांत तर आतां माझे येथें दोनतीन दिवस विश्रांति घेऊन मग परत जा. मला कामें पहाण्यास सर्व जिल्हाभर फिरावयाचें असतें. मला पेट्रोल मिळण्याची अडचण नाहीं. तेव्हां या जिल्ह्यांतील प्रेक्षणीय स्थळें आपण पाहूं. वर्गबंधू मनोहराचे वडील या नात्यानें तुम्हीं मला वडिलांसमान आहांत" मनोहराच्या जीवलग मित्राचा व मातोश्रीचा प्रेमळ स्वभाव पाहून मला घरीं आल्यासारखा आनंद झाला. पण 'साहेब' (आई, मुलेंमाणसें व नोकरचाकर आडक्यांस 'साहेब' नांवानें संबोधतात हें तात्काळ समजलें) मीं म्हटलें "मी आनंदानें राहिलों असतों. पण, मला बेळगांवास जुन्या मित्राला भेटावयास गेलेंच पाहिजे. या भागांत आल्यावर विलिंग्डन कॉलेजाचें दर्शन घेतल्याखेरीज पुण्यास परत जातां येणार नाहीं व हें सर्व ६ दिजंबरच्या आंत पुरें केलें पाहिजे. तेव्हां, आजचा दिवस व उद्यांची सकाळ येवढ्या वेळांत धारवाड शहरांतली तुझी कामगिरी दाखव म्हणजे झालें."

जेवणखाण आटोपून व दीड दोन तास विश्रांति घेऊन आम्ही धारवाडच्या दृश्य दर्शनास निघालों. प्रथमतः कर्नाटक कॉलेजच्या प्रोफेसर

मंडळीस भेटलों. नंतर 'साहेबांनीं' बांधलेले खासगी बंगले, सार्वजनिक इमारती पाहिल्या. मला त्यांच्या बांधकलानैपुण्याबद्दल फार कौतुक वाटलें. सायंकाळीं आम्ही पायीं फिरावयास निघालों तों धारवाडचे दोन न्यायाधीश भेटले. मग त्यांचेबरोबर बरीच लांब सहल करून आम्हीं सर्वजण साहेबांच्या बंगल्यावर आलों. तेथल्या रेडिओवर युद्धवार्ता व सवाद्य गायन ऐकलें. बड्या अंमलदारावर आपली छाप व वजन बसविलेलें पाहून मला मनोहराच्या मित्राचें सानंद कौतुक वाटलें. रात्रीं एंजिनीयर आडके म्हणाले "मनोहरास मी पुण्यांत एका बंगल्याची जागा विकत अगर लांब मुदतीच्या भाड्यानें घेण्यास सांगितलें आहे. त्या जागेला साजेसा, सुबक, सोयीचा व हवा-प्रकाशानें युक्त असा बंगला मी बांधवून देईन. येथें माझे पुष्कळ कंत्राटदार व इमारती लांकूड कारखानदार ओळखीचे झाले आहेत. तेव्हां हें महायुद्ध संपल्याबरोबर मी पुण्यास राहून मनोहरास सुंदर बंगला बांधून देईन" आडक्यांचें हें असामान्य मित्रप्रेम पाहून मला फार आनंद झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही धारवाडच्या पाणीपुरवठ्याच्या बांधल्या जाणाऱ्या नव्या तलावाचें काम पाहिलें व मग बाजारपेठेंतून व नव्या वस्तींतून फेरफटका करून बंगल्यास आलों व मग जेवण करून स्टेशनवर येऊन 'साहेबांस' सलाम करून डब्यांत बसलों. थोड्या वेळानें गाडी चालू झाली.

बेळगांवास मला तीन मित्रांना भेटावयाचें होतें. धारवाड व बेळगांव हीं शहरें मीं पूर्वी अनेकदां पाहिलीं होतीं. तेव्हां तेथें नवीन कांहीं पहावयाचें नव्हतें. बेळगांवास मी साडेतीन वाजतां पोहोंचलों व ओरिएंटल विमा कंपनीचे एजंट तमण्णाचार्य यांचेकडे गेलों. मी आल्यानें त्यांना फार बरें वाटलें. चहापाणी झाल्याबरोबर आम्हीं दीड मैलावरील श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर यांचें माधवपुर या टुमदार नव्या नांवाच्या गांवीं गेलों. पण, राजेसाहेब सर्व मंडळीसह सांगलीस गेले आहेत असें

कळलें. परत येतांना गजेंद्रगडकर या माझ्या जुन्या सामाजिक सुधारणाभिमानी मित्राला भेटलों. त्यांनीं त्यांच्या मिशन स्कुलमध्यें व्याख्यान देण्याबद्दल आग्रहाचें निमंत्रण दिलें. प्रियमित्राच्या शब्दाला मान देणें मला भाग पडलें. पण, त्या रात्रभर व दुसऱ्या दिवसभर झिमझिम व राहून राहून पाऊस पडत होता. तरी पण, ठरल्याप्रमाणें मी मिशनस्कुलांत विद्यार्थ्यांना उपदेशपर भाषण केलें. तेथें जाण्याचे आधीं श्रीमती अहो बाईनीं चिकाटीनें चालविलेल्या कन्याशाळेची नवी सुंदर इमारत पाहिली. त्या बाईच्या कर्तबगारीचें मला कौतुक वाटलें.

दुसरे दिवशीं दहा वाजतां आम्ही दोन अडीच मैलांवर असलेल्या अच्युतराव देसायांच्या शेतवाडीमधील बंगल्यावर त्यांच्या चिरंजीवाकडे जेवणास गेलों. त्या बंगल्यावर जातांना महायुद्धाची तयारी आम्हांला पहावयास सांपडली. जिकडे तिकडे नव्या रिक्रुटांची कवाईत सारखी सुरू होती. शेंकडों पांढऱ्या शुभ्र तंबूंच्या रांगाच रांगा सर्वत्र दृग्गोचर होत होत्या; तसेंच दूरवर नव्या बराकी व बंगले बांधण्यांत येत होते. एजंट म्हणाले, " बेळगांवचें हवापाणी चांगलें व येथली राहणी साधी व स्वस्ताईची आहे. म्हणून सर्व रंगरूटांचें (रिक्रुटांचें अपभ्रंशरूप) पहिलें शिक्षण येथें करून मग पुढील शिक्षणाकरितां त्यांना निरनिराळ्या ठिकाणीं पाठवितात. " देसायांचे येथें जुन्या काळच्या आठवणी काढीत व हल्लींच्या शिक्षणाच्या अवगुणाबद्दल बोलत आम्हीं जेवण आटोपलें व मग देसायांच्या मोटारींत बसून स्टेशनवर आलों. मी गाडींत बसलों व एजंट आपल्या बंगल्यावर गेले.

ता. ५ दिजंबर रोजीं सायंकाळीं अंधार पडल्यावर मी विलिंग्डन कॉलेजच्या विश्रामबाग स्टेशनवर आलों तों अंतर्कॉलेज खेळाकरितां आलेल्या विद्यार्थ्यांची गर्दी व गडबड दृष्टीस पडली. मी प्रो. पटवर्धनांकडे उतरलों. तेथें गेलों तों एक हृदयद्रावक हकीकत कानावर आली. नव्या विद्यार्थ्यांपैकीं एकानें विश्रामबाग स्टेशनवर न थांबणाऱ्या गाडींतून प्लॅटफॉर्मवर

उतरण्याचा प्रयत्न केला. पण प्लॅटफॉर्मला पाय न पोहोंचतां तो रुळावर पडला व त्याच्या डोक्याचा चुराडा झाला. अर्थात् तो तत्काळ मेला! ही हृदयद्रावक हकीकत ऐकून मला अत्यंत वाईट वाटलें. म्हणून मी बाहेर कोठें न जातां जेवणानंतर लगेच झोपीं गेलों.

दुसरे दिवशीं सकाळीं गेस्ट हाऊसमध्यें राहण्यास आलेल्या सांगलीच्या राजेसाहेबांकडे भोजनास गेलों. तेथें रामदुर्गचे राजेसाहेब भेटले. फारां दिवसांनीं भेटल्याबद्दल त्यांनीं आनंद व्यक्त केला.

दोन प्रहरीं व सायंकाळीं विलिंग्डन कॉलेजांत प्रिन्सिपाल कर्वे व प्रिन्सिपाल गोकाक यांचे कारकीर्दींतील कॉलेजच्या वाढीच्या निदर्शक नव्या इमारती व नव्या योजना पाहून मला फार आनंद वाटला.

झालें. रात्रीच्या मेलनें मी एका महिन्याचा प्रवास संपवून सुखरूप पुण्यास आलों. नंतर लगेच महाडास गेलों. म्हणून हें पत्र तुम्हांला मी महाडहून लिहिलें आहे.

झालें! माझें हें प्रवास–समारोपक–पत्र संपल्यासारखें आहे. पण सबंध महिनाभर मधून मधून आप्पासाहेब परांजपे यांचे शब्द माझ्या मनश्चक्षूं-पुढें उभे रहात होते. ते म्हणत, "शिक्षकाचा धंदा किफायतीचा किंवा किताबाचा नसेल. पण दूरदूरच्या व अपारिचित प्रांतांत जेव्हां आम्ही प्रवास करतों व जेव्हां आमचे जुने विद्यार्थी प्रेमानें व गुरुभक्तीनें आमचा पाहुणचार करतात, तेव्हां आमच्या पेशाबद्दल आम्हांला अभिमान वाटतो" आप्पासाहेबांप्रमाणेंच मलाही माझ्या पूर्वीच्या व या प्रवासांत तसाच अनुभव आला. व तेच उद्गार माझ्या तोंडून निघाले. इतकें लिहून लेखणी खालीं ठेवतों. कळावें, हे आशीर्वाद.

तुमचा

दादा.

८

महाड, जि. कुलाबा,

ता. २८ माहे फेब्रुवारी सन १९४२

डॉ. कॅप्टन एस्. जे. साने आय्. एम्. एस.

१९ इंडियन टप्पा विभाग, मिडल ईस्ट पोस्ट

कृ. सा. न. वि. वि. मीं रोह्याहून तुम्हांला लांबलचक पत्र लिहिलें, तेव्हां दुसरें तसेंच पत्र लिहिण्याची संधि साधेल अशी मला कल्पना नव्हती. कारण, महिन्याच्या दूरच्या प्रवासानंतर नातवंडांच्या सुखकर सहवासांत, सकाळ संध्याकाळच्या सहलींत व सन्मित्रांच्या संगतींत व संभाषणांत दीड दोन महिने येथेंच राहावें असा मीं मनांत बेत केला होता. पण, मी महाडास पोहोंचून एक आठवडा पुरा झाला नाहीं तोंच मला माझ्या अहमदनगरच्या जुन्या विद्यार्थी मित्राचें (रा. ब. बाबासाहेब हिवरगांवकर) न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या शतसांवत्सरिक स्मृतिदिनानिमित्त भाषण करण्याबद्दल आग्रहाचें आमंत्रण आलें. या आकस्मिक व अनपेक्षित निमंत्रणानें मला आनंद झाला. एकतर एका महाराष्ट्रीय महनीय थोर विभूतीचा संदेश हल्लींच्या तरुण पिढीला सादर करण्याची संधि मला मिळणार होती. व माझ्या दृश्यदर्शनाची हावरी हौस पुरणार होती. म्हणून मी पुण्याहून ता. १७ जानेवारी १९४२ रोजीं निघून त्या दिवशीं तिसरे प्रहरीं नगरास येतों असें बाबासाहेबांना उत्तर लिहिलें.

तदनुरूप ता. १७ रोजीं मी सकाळच्या पावणे दहा वाजतां स्टेशनवर आलों; पण एक वाजेपर्यंत सोल्जरांनीं भरलेली सोलापुराकडून यावयाची गाडी आली नाहीं. हिंदुस्थानांत आम्हांला तुमच्या तेथल्या निवासांत अनुभवास येत आहे अशी प्रत्यक्ष महायुद्धाची आच लागत नाहीं खरी. पण, सर्ववस्तूंची महागाई, दळणवळणाच्या साधनांची महर्गता व अनिश्चितता यांचा खूब अनुभव येत आहे.

पुण्यापासून दौंड जोडस्टेशन ४९ मैल आहे. हा सर्व भूमिभाग सपाट, निर्जल, निर्वृक्ष, उथळ व कोरड्या ठणठणीत नदीनाल्यांनीं व्याप्त आहे. मधून मधून लहान लहान टेंकड्या दृग्गोचर होतात; पण त्या सुद्धां रुक्ष व उजाड जळक्या दिसतात. नाहीं म्हणावयास या ओसाड माळरानांत जागोजागीं घाणेरीचीं झुडपें दृष्टीस पडतात. यंदा तर अवर्षणामुळें जोंधळ्याचें पीकही पिकुटलेलें व खुरटलेलें दिसत होतें. दौंडाहून नगर एकावन्न मल आहे. याही भूमिभागाची तीच दैन्यावस्था दिसली. पण, नगरच्या अगोदरच्या अकोळनेर स्टेशनपासून हिरव्यागार झाडींत लांबच लांब पसरलेलें नयनमनोहर नगर शहर दृष्टीस पडून मनाला आनंद वाटला, तोंच स्टेशन आलें. स्टेशनवर बाबासाहेब किंवा त्यांचा मनुष्य आला नाहीं. पण मी टांगा करून त्यांचे बंगल्यावर आलों. ते किंचित् चिंताक्रांत दिसले. ते म्हणाले " माझ्या वृद्ध मातोश्रीनें माझ्या धाकट्या भावाच्या आकस्मिक व अकालीं मरणानें हाय घेतली आहे. तिला वारंवार झीट आल्यासारखी होते. पण, तुमच्याकरितां निराळी खोली निजाबसावयास केली आहे. " या हकीकतीनें मला बाबासाहेबांच्या धीरोदात्त स्वभावाचें कौतुक वाटलें. कारण, त्यांचीं कामें यथापूर्व चाललेलीं दिसलीं. चहा बिस्किटें खाऊन होतात तोंच तेथल्या आयुर्वेद विद्यालयाचा एक विद्यार्थी संमेलनाचें आमंत्रण देण्याकरितां आला. मीं तें आनंदानें स्वीकारलें.

ता. १८।१।१९४२ रोजीं सकाळीं साडेनऊ वाजतां आयुर्वेद-विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालेल्या अत्रेकृत "साष्टांग नमस्कार" नाटकाचा प्रयोग पहाण्यास गेलों. प्रत्येक विद्यार्थ्यानें आपआपल्या भूमिकेचा सार्थ अभिनय केल्यामुळें प्रयोग फार प्रेक्षणीय झाला. आम्हीं दोन वाजतां परत येऊन स्नान जेवण करून साडेपांचपर्यंत विश्रांति घेतली. मग रानड्यांच्या शतसांवत्सरिक समारंभस्थानीं गेलों. सर्व पटांगण मुलांमुलींनीं व स्त्रीपुरुषांनीं भरून गेलेलें दिसलें. रा. गोरे वकील (नगराध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखालीं सभेस सुरवात झाली. शुभचिंतनपर

संदेश वाचनानंतर बाब्रासाहेबांनीं माझी श्रोत्यांना ओळख करून दिली. मी 'रानड्यांची सामाजिक कामगिरी' या विषयावर पाऊण तास बोललों. नंतर तेथले गृहस्थ निरनिराळया संस्थांचे वतीनें रानडयांच्या विविध समाजोन्नतीच्या कार्याबद्दल बोलले. शेवटीं अध्यक्षांचा समारोप होऊन आठवडाभर चाललेला उत्सव-समारंभ टाळयांच्या गजरांत समाप्त झाला. खुल्या पटागणांत लहान मोठ्यांचा जमाव जमला असतांना गडबड किंवा गोंधळ न माजतां सर्व समारंभ शांतपणें पार पडला हें पाहून मी नगरच्या पुढाऱ्यांचें अभिनंदन केलें.

ता. १९-१-४२ रोजीं स्टेशननजीक असलेलें वैद्यपंचानन गंगाधर शास्त्री गुणे यांनीं काढलेलें आयुर्वेदीय औषधालय पाहिलें. त्याचें आवार खूप मोठें आहे. त्यामध्यें एक मजली चाळीसारख्या समोरासमोर नव्याच इमारती बांधल्या आहेत. उजव्या हाताच्या चाळीच्या मधल्या भागावर मात्र दुसरा मजला चढविला आहे. कच्च्या औषधाच्या निवडीपासून तों पक्या औषधींचे मोहरबंद खोके तयार होईपर्यंतचीं नानाविध कामें वेगवेगळया दालनांत स्त्री-पुरुष मजूर करीत असलेले पाहून सानंद आश्चर्य वाटलें. जिकडेतिकडे टापटीप व स्वच्छता पाहून संस्थापक गुणे गुरुजींच्या कर्तबगारीचें कौतुक वाटलें. गुणे म्हणाले, "हा कारखाना हल्लीं समाईक भांडवलाचा करण्यांत आला आहे खरा; पण तो केवळ व्यापारी धोरणावर चालविला जात नाहीं; नफ्याचा अर्धा अधिक भाग आयुर्वेद विद्यालय चालविण्यास दिला जातो. जर्मनींतून औषधीं तयार करण्याचें शास्त्र शिकून आलेला माझा मुलगा या सर्व कामावर देखरेख ठेवतो, यामुळें आमच्या कारखान्यांत औषधें फार काळजीपूर्वक व शास्त्रोक्त पद्धतीनें तयार करण्यांत येत असतात. म्हणून आमच्या कारखान्यांतील औषधांना मागणी सारखी वाढत आहे." हें ऐकून मी पिता-पुत्राचें अभिनंदन केलें व त्यांचा निरोप घेऊन आम्ही परतलों.

नंतर गांवात नवीन निघालेली विणकऱ्यांची संस्था पाहिली. पिढीजाद विणण्याचा धंदा करणाऱ्या दोघां विणकर बंधूंच्या कल्पकतेनें या नव्या कारखान्याची उभारणी झाली आहे. महायुद्धामुळें हल्लीं सरकारी लष्करी खात्याला हजारों लोकरी पांघरुणें (Rugs) पाहिजे आहेत. कानपुर, लाहोर इत्यादि ठिकाणीं पुरेशीं पांघरुणें तयार होत नाहींत. म्हणून, येथल्या विणकरबंधूंनीं देशी साध्या घोंगड्या एकावर एक दाबून बसवून त्यांचीं एकजीव जाड ठराविक लांबीरुंदीचीं पांघरुणें बनविणारे साधे व सोपे माग तयार करून हा कारखाना काढला. तो कारखाना व पांघरुणें करण्याची पद्धति दाखवीत ते म्हणाले 'येथले सर्व माग व यंत्रें पूर्ण स्वदेशी आहेत. घोंगड्या आम्हीं धनगरांकडून घेतों व कोंड्याचा मांडा करतात त्याप्रमाणें आम्हीं घोंगड्याच्या लोकरी शाली बनवितों. आतांपर्यंत पंचवीस हजार पांघरुणांची मागणी आम्हीं पुरी केली आहे. आणखी पाऊण लाखाची मागणी लष्करी खात्यानें केली आहे. पण, लढाई संपल्यानंतर सुद्धां या कारखान्याला सतत काम मिळत गेलें पाहिजे; याकरितां आम्हीं मध्यम वर्गाकरितां स्वस्त लोंकरी पांघरुणें व स्त्री-पुरुषांच्या नेहमींच्या वापराचीं सुती कापडें तयार करण्याचें काम चालू केलें आहे. सदरे, अंगरखे, पोलकीं, पातळें इत्यादि वस्त्रें आम्ही तयार करतों. व तीं आम्ही गिरणीच्या मालाइतकींच स्वस्त विकतों." असें म्हणून त्यांनीं लहान मुलींचीं निळीं पातळें व एक 'मेजाच्छादन' (table-cloth) दाखविलें. तीं सुबक व स्वस्त वाटून मी तीं विकत घेतलीं. नंतर त्या बंधूंचे आभार मानून प्रमुदित मनानें आम्ही बंगल्यावर आलों.

नगरास येण्याचा मुख्य उद्देश वर वर्णन केल्याप्रमाणें यशस्वी रीतीनें पार पडल्यावर नगराबाहेरील दृशदर्शन बाबासाहेब हिवरगांवकरांबरोबर करावयाचें असा आमचा पहिला बेत होता. पण तो तडीस जाऊं शकला नाहीं. कारण आदल्या रात्रींपासून बाबासाहे.

बांच्या मातोश्रींची प्रकृति अधिकच बिघडली. म्हणून त्यांच्या विनंतीवरून दादासाहेब धनेश्वर हे वयातीत गृहस्थ माझ्याबरोबर येण्यास तयार झाले. वाटेनें शेवगांवांत न शिरतां शालिवाहन शककर्त्या राजाची राजधानी पैठण पाहून मग शेवगांव पहावें. परभारें नेवासें, प्रवरासंगम व टोकें ही त्रिस्थळी यात्रा करून नगरास परत यावें असा बेत केला.

तदनुरूप ता. २०-१-१९४२ रोजीं सकाळीं आम्ही नऊ वाजतां मोटारबसनें निघालों. नगरपासून शेवगांव सुमारें बेचाळीस मैल आहे. नगरच्या आसपासचा दहा बारा मैलांचा भूमिभाग उंचवट्याचा व डोंगराळ आहे. हा भाग लहानसा डोंगरपठार आहे म्हणाना. तेथून नेवासें व शेवगांव या तालुक्याच्या गांवाकडे रस्ता जातो; दोन दिशांना रस्ते फुटण्यापूर्वी इमाम गांव व इमाम घाट लागतो. हा घाट सुमारें एक मैलाचा आहे. पठार भाग रुक्ष व निर्वृक्ष आहे. पण घाट उतरल्यापासून बागा, मळे व शेतें लागूं लागतात. यामुळें हा भूमिभाग कांहींसा हिरवागार व म्हणून नयनमनोहर वाटतो. साडेअकराच्या सुमारास आम्हीं शेवगांवच्या मोटार अड्यावर पोहोंचलों. तेथून भारदे जहागिरदारांकडे पायीं चालत गेलों. अड्यापासून भारद्यांचा वाडा बराच दूर होता. पण, त्या गांवची बाजारपेठ सहज पाहून झाली. गांवची पेठ बरीच मोठी वाटली. पण, दुकानें व खासगी घरें जुन्या तऱ्हेचीं व जुन्या बांधणीचीं दिसलीं. रा. भारदे यांनीं आमचें स्वागत केलें. पैठणबद्दल चवकशी करतां भारदे म्हणाले " मोटार गोदावरीनदी किनाऱ्यापर्यंतच जाते व रुंद नदी पाण्यांतून पायीं उतरावी लागते. शिवाय, मोटार दीडतासानें परत येण्यास निघते. इतक्या थोड्या वेळांत पैठणांतील प्रेक्षणीय व पवित्र स्थळें पाहून होणार नाहींत. तरी दुसरे दिवशीं सकाळीं टांग्यानें थेट पैठणास नदीपार जाऊन तेथें चार वाजेपर्यंत सर्व दृश्यदर्शन आटोपून सध्यांकाळीं काळोख होण्यापूर्वी परत शेवगांवाला येतां येईल व हें सर्व बिनत्रासानें व बिनश्रमानें होईल. आज रात्रीं प्रो. भाटे यांचें येथल्या वाचनालयांत व्याख्यान करतां

येईल. गांव लहान असल्यामुळें गांवांत व्याख्यानाची ग्वाही तेव्हांच देतां येईल." या योजनेनें आमचा शेवगांवाचा मुक्काम एका दिवसानें वाढणार होता. पण, सोयीच्या दृष्टीनें आम्ही भारद्यांच्या योजनेला रुकार दिला.

मग, आम्हीं सावकाश स्नानभोजनादि उरकून दोन तास विश्रांति घेतली. तिसऱ्या प्रहरीं चहापान करून आम्ही शेवगांव पहाण्यास निघालों.

प्रथमतः आम्ही भारदे जहागिरदारांच्या चार घराण्यांचे वाडे व विशेषतः या घराण्यांतील ज्ञानेश्वरी प्रवचनकार व संतवाङ्मयविशारद म्हणून विख्यात असलेल्या रावसाहेब रानड्यांच्या पिढींतील भारद्यांच्या जुना वाडा पाहण्यास गेलों. हा वाडा गांवाचे शेवटीं आहे. या वाड्याला सभोंवार तट व बुरुज आहेत. पण, ते मोडकळीस आले आहेत. वाडा शाबूत असून चारचौकी आहे. या वाड्याचा दर्शनीभाग डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नानावाड्यांतील जुन्या संरक्षित दिवाणखान्यासारखा दिसला. हा वाडा श्रीमंत भारायणराव पेशव्यांचा खून करणाऱ्या सुमेरसिंगाचा होता. त्याचेकडून तो भारद्यांकडे आला. नंतर आम्हीं भारद्यांचा उंसाचा मळा व पेरूचा बाग पाहिला. पुढें गांवाला वळसा घालून वाचनालयाच्या इमारतीशीं आलों. तेथें बरेच लोक वर्तमानपत्रें वाचीत होते. त्या वाचनालयाच्या सुबक दिवाणखान्यांत माझ्या व्याख्यानाचा रात्रीचा बेत ठरविला होता. मग गांवचा दवाखाना, न्यायकचेरी, शाळा वगैरे सार्वजनिक इमारती पाहून परत वाड्यांत आलों व भोजनानंतर व्याख्यानाची वेळ झाल्यावर वाचनमंदिराकडे निघालों तों बरेच ब्राह्मणेतर लोक तिकडेच जातांना दिसले. माझा आश्चर्यचकित चेहरा पाहून दादासाहेब धनेश्वर म्हणाले, "या गांवांत बाळासाहेब भारदे हे तरुण, हुशार, स्वार्थत्यागी व वक्ते वकील आहेत. ते येथल्या कॉंग्रेस पक्षाचे धुरीण आहेत. आपल्या उदार व दिलदार वागणुकीनें व लोककल्याणकारी कामगिरीनें त्यांनीं या गांवच्या सुशिक्षित, अर्ध शिक्षित व विशेषतः ब्राह्मणेतर

लोकांवर इतकी छाप ठेविली आहे कीं, त्यांच्या मार्फत बोलावलेल्या सभेला असेच सर्व लोक जमतात. आम्ही 'कारोनेशन हॉल' मध्यें (वाचनालयाला दिलेल्या सुंदर इमारतीचें नांव) शिरतों तोंच सर्व दिवाणखाना नानाविध पेशाच्या व पोषाखांच्या माणसांनीं व गांधी टोपीवाल्या तरुणांनीं चिक्कार फुलून गेलेला पाहून भारदे वकिलांच्या जनमनावरील वजनाबद्दल मीं मनांतल्या मनांत त्यांचें कौतुक केलें. आम्ही टाळ्यांच्या गजरांत स्थानापन्न झालों. तेथले सर्वांत वयोवृद्ध वकील बहेरे, सभेचे अध्यक्ष, माझा मंडळींना परिचय करून देतांना म्हणाले, "प्रोफेसर भाटे हे फर्ग्युसन कॉलेजांत मी असतांना माझे गुरुजी होते. आज सत्तेचाळीस वर्षांनीं त्यांची भेट झाल्यानें मला फार आनंद होत आहे. त्यांच्या वचनामृताची चव घेण्यास तुम्ही उत्सुक झालां असाल तरी त्यांना मी भाषण करण्यास सादर विनवितों." नंतर माझें 'अर्वाचीन शिक्षणाचें खरें ध्येय' या विषयावर सुमोरें तास सवा तास व्याख्यान झालें. रात्रीं भारद्यांचे घरीं रा. बेहेरे वकील व बाळासाहेब भारदे यांचे सल्ल्यानें पैठणला सकाळीं टांग्यानें जाऊन काळोख पडण्यापूर्वीं शेवगांवास परत येण्याचें ठरून आम्ही बरीच रात्र झाल्यावर झोपीं गेलों.

ता.२१ जानेवारी सन १९४२ रोजीं टांग्यांतून पैठणास जाण्यास निघालों. शेवगांवपासून पैठण १४ मैल आहे. भूमिभाग अगदीं सपाट असून रस्ता चांगला खडीचा असल्यामुळें आम्ही दोन तासांत गोदावरी नदीच्या तीराशीं आलों. येथला देखावा नाशिकच्या घाटापलीकडील उंच दरडीच्या भागासारखा वाटला. नदीच्या प्रवाहाचें पाणी स्वच्छ व निर्मळ होतें. बुडाशीं तांबडे, पांढरे, काळे अशा रंगांचे बारीक गोटे होते. टांग्याचे घोडे लीलेनें नदीपार होऊन उंच दरडीच्या पायथ्याशीं आल्यानंतर आम्ही देशपांडे वकिलांच्या वाड्याची चौकशी करूं लागलों तोंच त्या पायऱ्यांवरून बैलाची माकण हांकीत असलेला माणूस म्हणाला, "या पायऱ्यांच्या वरच वकिलांच्या वाड्याचा मागला दरवाजा दिसत आहे. त्यांतून गेल्यास

वकिलांच्या बैठकीच्या खोलींतच जाल. रस्त्यानें पुढील दार बरेंच दूर आहे. तरी आपण चालत वाड्यांत जा. गाडीवाला सावकाश गाडी पुढील दारीं घेऊन येईल." त्या माणसाच्या सांगीप्रमाणें आम्ही गाडींतून उतरून वाड्यांत शिरून अचानक वकिलांच्या बैठकखान्यांत गेलों.मागच्या दाराकडून एकदम आंत आलेल्या आम्हांला पाहून वकीलसाहेब आश्चर्यानें उद्गारले, "आपण कोठून आलां." आमच्यांपैकीं पूर्वपरिचित दादासाहेबांना पाहून ते साश्चर्यानंदानें म्हणाले, "या, या आपलें अचानक येणें झालें; पण त्यांनीं माझ्यावर दृष्टिक्षेप करून 'हे जनाब कोण?' म्हणून दादासाहेबां-जवळ पृच्छा केली. दादासाहेबांनीं लगेच माझा परिचय करून दिला. तेव्हां वकीलसाहेब म्हणाले, "मी परिचित व प्रसिद्ध पाहुण्यांचें हार्दिक स्वागत करतों' आजच मी वरशोधनाकरितां नगरास आपल्याकडे जाणार होतों. पण अनायासें आपली गांठ पडली तरी वधू पसंती येथेंच व आतांच होऊं द्या" असें म्हणून त्यानीं मोठ्या मुलीस मोठ्यानें चहा फराळाचें आंतल्या खोलींत लवकर आण व तूं तेथून निघून जाऊं नकोस म्हणून म्हटलें. लगेच आम्हीं त्या खोलींत जाऊन पाटावर बसलों. वृद्ध बाईनें मुलीस न भितां वाढण्यास सांगितलें. आम्हीं चहा फराळ पीत व खात तिची औपचारिक परीक्षा घेतली व मुलगी परीक्षेंत पास झाली आहे म्हणून वकीलसाहेबांस म्हटलें. त्यानीं तिला आंत जाण्यास सांगितलें. मग दादासाहेब म्हणाले "हल्लींच्या काळीं आम्हां वडील मंडळींच्या औपचारिक परीक्षेला मुळींच महत्व नाहीं. माझा उपवधु मुलगा सुटींत घरीं आला म्हणजे मी त्याला तुमच्या येथें पाठवून देतों. त्याच्या परीक्षेंत तुमची मुलगी पास झाली तर आमची संमती मिळालेली आहे असें समजा." इतकें बोलणें होत आहे तों आमचा उपाहार संपला. लगेंच आम्हीं तेथल्या दृश्यदर्शनास बाहेर पडलों. जिकडे तिकडे मुसलमानी बांधणीच्या कमानींनीं, मनोऱ्यांनीं, लांब रुंद उंच पायऱ्यांच्या दिल्ली दरवाज्यांनीं अलंकृत पांढऱ्या शुभ्र सार्वजनिक इमारती व राहाते वाडे दिसूं लागले. हिंदूंचीं घरें सुद्धां उंच बिनखिडक्यांचीं दिसलीं. हा देखावा पाहून मला रामाच्या अयोध्येची

आठवण झाली. पण तेथील नगरी नदीकिनाऱ्याच्या सपाटीला सरळ सुतांत वसलेली आहे. पैठणची वस्ती टेकाडावर असून बोळांडीवजा रस्ते खोलांत आहेत. या भेदामुळें अयोध्या नगरीइतकी पैठण नगरी चित्ताकर्षक वाटली नाहीं. 'शालिवाहनाचा राजवाडा' नांवाचा विस्तार्ण आवाराचा व सभोंवार तटवजा उंच भिंत व बुरुज असलेला वाडा आम्हीं पाहिला. आंत पडक्या जोत्यादगडाखेरीज कांहीं एक दृश्य दिसलें नाहीं. फक्त एक वाटोळी खोल विहीर मात्र शाबूद स्थितींत दिसली. नंतर आम्हीं महेंदोजारोच्याप्रमाणें जमिनीखालीं गडदून गेलेल्या व नुकत्याच खोदून काढलेल्या पुरातन शहराचा अवशेष पाहण्यास गेलों. हा भूमिभाग बराच उंच असून नदींत घुसल्यासारखा दिसत होता. खोदलेल्या आवारांत रस्ते, गटारें, घरांच्या भिंती व विटांचे ढीग दिसले. या खननांत नानाविध पुराणवस्तू–खेळणीं, विटा, मातीचीं भांडीं, बांगड्या, दागिने व नाणीं–सांपडलीं आहेत व त्यावरून पैठणच्या व दक्षिण हिंदुस्थानच्या बऱ्याच शतकांच्या इतिहासावर नवा प्रकाश पडणार आहे हें कळून या खोदाईचें ऐतिहासिक महत्त्व आमच्या ध्यानांत आलें. आतां बाराचा सुमार झाला होता म्हणून आम्ही परतलों; पण वाटेवर असलेल्या सरकारी विणकर खात्याचें काम जलदीनें पाहून घेतलें. पूर्वकाळीं पैठण हें विणकर कारागिरीकरितां प्रसिद्ध होतें हें ' बायकांची रेशमी पैठणी ' व ' पुरुषांचें पैठणी पागोटें ' या दोन नांवावरून दिसून येतें. हा जुना धंदा नष्टप्राय होत आहे व त्यामुळें हजारों मुसलमान विणकरी बेकार होऊन देशोधडीस लागत आहेत हें दिसून आल्यावरून निजाम सरकारनें या जुन्या धंद्याचें पुनरुज्जीवन करण्याचें ठरवून त्याकरितां स्वतंत्र विणकरखातें काढून विणकरकलेचे तज्ज्ञ नेमून पैठणास विणण्याचा कारखाना काढला. हल्लीं त्या गांवांत १८०० हातमाग चालू झाले असून सुमारें तीन हजार लोकांची बेकारी नष्ट झाली आहे. ही हकीकत ऐकून आम्हीं निजामसाहेबांचे आभार मानले. येथलें फार किंमतीचें व उंची तऱ्हेचें जरतारी काम पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. मध्यम स्थितींतील लोकांच्या उपयोगाचीं कापडें व सरकारी


खात्यांच्या नोकरांच्या युनिफार्मकरितां लागणारें कापड हीं सर्व येथें विणण्याची सोय केली असल्यानें निजाम सरकारनें स्वदेशीव्रत अंगिकारलें आहे हें कळून तर आम्हांला जास्त आश्चर्य व आनंद वाटला. परत आल्यावर आमचें स्नानजेवण आटोपलें व दीड दोन तासांची विश्रांतीही झाली.

चाराच्या सुमारास आम्हीं पैठणचीं पुरातन पवित्र स्थानें पहाण्यास निघालों. वकीलसाहेब म्हणाले 'आतां फक्त दोन मठ व एकनाथाची समाधी हीं स्थळें पहावयाचीं राहिलीं आहेत. तीं सर्व नदीकांठीं असून एकनाथाच्या समाधीपासूनच नदीपारची सडक जाते. तेव्हां परत इकडे येण्याचें कारण नाहीं. तेथूनच गाडींत बसून नदीपार होतां येईल.' तेव्हां आम्हीं आपलीं धोतरें–पातरें व कपडा–लत्ता पिशव्यांत भरला तोंच चहा–बिस्किटें बैठकखान्यांत आलीं. त्यांचा स्वीकार करून गाडी-वानास रस्त्यानें गाडी समाधीनजीकच्या पाराशीं उभी करण्यास सांगून व वकिलांच्या मंडळीचे आभार मानून आम्ही पायीं नदीकांठच्या सडकेनें निघालों. हा रस्ता उंच करून गटार बांधण्याचें काम जोरांत चालू होतें. प्रथम आम्ही 'शिवदिन केसरी' या साधूच्या मठांत गेलों. या वाड्याचें सर्व काम लाकडी जुन्या तऱ्हेच्या अनेक चौकी वाड्यासारखें होतें. तळ-मजल्याला नृसिंहाचें देवालय होतें. दुसऱ्या मजल्यावर मठाची कचेरी होती. तेथें असलेल्या मठाच्या व्यवस्थापकानें आमचें स्वागत केलें. पण जुनें कागदपत्र किंवा स्वामींच्या काळच्या वस्तु किंवा 'शिवदिन केसरी' स्वामींच्या पदांचा व भोंपाळ्यांचा हस्तलिखित संग्रह यांपैकीं कांहींही त्या मठांत नसल्याचें ऐकून आम्हांला सखेदाश्चर्य वाटलें.

तेथून आम्हीं एकनाथाच्या मठाकडे व समाधीकडे गेलों. हा मठ व येथली समाधी हीं एकनाथकालीन आहेत व तेथें एकनाथांच्या सर्व ग्रंथांच्या हस्तलिखित व छापील प्रती आहेत हें ऐकून आम्हांला आनंद झाला. येथें यात्रेकरूंकरितां प्रशस्त धर्मशाळा बांधली असून यात्राप्रसंगीं येणाऱ्या दुकानदारांकरितां ओटे बांधलेले पाहून या मठाच्या व्यवस्थेबद्दल

आमचें अनुकूल मत झालें. लगेच आम्ही वकीलसाहेबांचे आभार मानून गाडींत बसलों व नदीपार होऊन सडकेला लागलों. बैलांना सहासात तासांचा विसांवा मिळाला असल्यामुळें व रस्ताही सपाटीचा व बिन खांच-खळग्याचा असल्यामुळें गाडी चांगल्या वेगानें जात होती. दादासाहेब धनेश्वरांची या जिल्ह्यांत सुमारें चाळीस वर्षांची नोकरी झाल्यानें त्यांच्या परिचयाचे लोक वाटोवाट भेटत होते. एका गांवीं कलेक्टरचा कॅंप अगदीं रस्त्यावर असल्यामुळें त्या साहेबांना भेटण्यांत आमचा थोडा वेळ गेला. दुसऱ्या एका गांवीं तर जास्तच वेळ मोडला. कारण दादासाहेबांच्या अति परिचयाचे एक मारवाडी व्यापारी रस्त्यावरच उभे होते. त्यांनीं आम्हांला आपल्या गांवांतील घरीं नेऊन आग्रहानें चहा दिला. शेवटीं काळोख पडला म्हणून आम्ही परत येऊन गाडींत बसलों. मग मात्र तडक भारद्यांच्या वाड्याशीं आल्यावर गाडींतून खालीं उतरलों. मंडळी आमची वाटच पहात होती. प्रवासासंबंधीं बोलत बोलत आमचें भोजन झालें. बरीच रात्र झाल्यावर आम्ही झोंपीं गेलों.

ता. २२ जानेवारी सन १९४२ रोजीं सकाळच्या मोटारीनें नेवासें-प्रवरा टोंकें ही त्रिस्थळीं पहाण्यास जाण्याचा आमचा मानस होता. पण त्या दिवशींच्या मोटारींत मुळींच जागा नव्हती. ती आधींच मर्यादेबाहेर भरली (overload) होती. आणखी एक दिवस मोडणार हें पाहून आम्ही नेवाश्यास जाण्याचा बेत बदलून नगरास जाण्याचें ठरविलें. पण नगरास जाण्यासही शेवटच्या मोटारींत मोठ्या मिनतवारीनें आम्हाला जागा मिळाली. सकाळपासून सायंकाळपर्यंत पोशाख करून तिष्ठत बसावें लागलें. पण 'शेवगांवकरांचा निरोप घेऊन आम्हीं एकदांचे किर्लोस्क-रांच्या नव्या बंबानें सज्जित व अतएव सावकाश चालणाऱ्या मोटारींत बसलों व साडेआठ वाजतां धनेश्वरांचे घरीं आलों. तोंच बाबासाहेब हिवर-गांवकरांच्या मातोश्री रात्रीं बारानंतर रथसप्तमी तिथि सुरू झाल्यावर स्वर्ग-वासी झाल्याची दुःखद वार्ता कळली. तेव्हां दादासाहेब मला म्हणाले "अशी



सहकारी पतपेढीची घुमटी इमारत, अहमदनगर.



मराठी वाङ्मयप्रेमी मंडळ, गदग.

धास्ती मला वाटतच होती. पण म्हातारीचे हाल पहावत नव्हते. अशा हालांतून त्या सुटल्या. ही देवदयाच म्हणावयाची. आतां तुम्हीं आमच्याकडेच राहा. पण बाबासाहेबांकडे जाऊन तसें त्यांना सांगून व त्यांचा समाचार घेऊन येऊं'? आम्हीं शोकार्त मनानें त्यांचेकडे गेलों तों त्यांच्याकडे समाचाराकरितां गोरे, बागडे व आणखी एक दोन मंडळी आली होती. अशा प्रसंगीं कोण काय कसें समाधान करणार? परमेश्वराची इच्छा असें म्हणून स्वस्थ रहाणें येवढेंच माणसांस शक्य आहे.

बरीच रात्र झाली म्हणून समाचारास आलेल्या गृहस्थानें आम्हांला आपला टांगा घरीं जाण्यास दिला. त्यांचे आभार मानून व बाबासाहेबांस मातोश्रींची सारखी आठवण करून मनाला जास्त त्रास करून न घेतां म्युनिसिपालिटीचे कामावर फेब्रुवारीपासून रुजू व्हावें म्हणजे कामांत मन गुंतल्यामुळें तुम्हाला दुःखाचा विसर पडेल असें सांगून आम्हीं धनेश्वरांचे घरीं आलों. तेव्हांपासून ता.२७ जानेवारी १९४२ रोज पर्यंत मी दादासाहेबांचे समवेत नगरचें व आसपाचें दृश्य दर्शन पुरें केलें व ता. २७ रोजीं साडे अकराचे गाडीनें परत पुण्यास आलों.

ता. २३ जानेवारी सन १९४२ रोजीं सकाळीं सहा वाजतां उठल्याबरोबर दादासाहेब म्हणाले "आज घरीं चहा प्यावयाचा नाहीं. आमचा एक सतत सदतीस वर्षें चाललेला क्लब आहे. तेथें जाऊन चहा घेऊं." लगेच आम्ही घराबाहेर पडलों. थोड्याच वेळांत रावबहादूर चितळे यांचे विस्तीर्ण वाड्यांतील दिवाणखान्यांत आलों. त्यांनीं माझें हार्दिक स्वागत केलें. आम्हीं बसतों तोंच माधवराव ऋषी आले. दिवाणखान्यांतील चारी खुर्च्या भरून गेल्या. चितळे माझ्याकडे वळून म्हणाले " आमचा आतां फुल क्लब जमला. तुम्हांला दादासाहेबानीं सांगितलेंच असेल कीं पसतीस सदतीस वर्षें बिनबोभाट बिनखर्च व बिनत्रास हा क्लब चालला आहे. प्रारंभीं याचे सात सभासद होते. पण सध्या तुमच्या समोर आहोंत ते आम्हीं तीनच सभासद राहिलों आहोंत. आम्हीं तिघेही वयातीत झालों

आहों व आम्ही बहुतेक बरोबरच आपआपला इहलोकचा गाशा गुंडाळूं. असें झालें म्हणजे आमचा क्लब नष्ट होईल. पण आम्हीं आणखी बारा तेरा वर्षं जगून या क्लबाचा पन्नासावा वाढदिवस किंवा नव्या रूढ शब्दांत सुवर्ण महोत्सव नव्या जुन्या मित्रमंडळींस क्लबांत बोलावून मोठ्या थाटानें साजरा करूं. देवदयेनें इतकें आयुष्य आम्हांला लाभो.

या विनोदमिश्र गंभीर भाषणानें माझें कुतूहल वाढलें. मीं उत्सुकतेन रावबहादुरांस विचारलें "पण तुमच्या या क्लबाचें उद्देश काय, तो केव्हां जमतो, व क्लबाचे अधिक सभासद कां केले नाहींत" रावबहादूर हसत हसत उत्तरले " नवीन भरती न करण्यांचें कारण 'व्यक्ति तितक्या प्रकृति हें होय.' क्लब दररोज जमतो. वेळ सकाळची सहा वाजतांची असते; काम चालतें अर्धा तास " मीं म्हटलें " पण आपण अजून क्लब काय करतो हें सांगितलें नाहीं " ते म्हणाले " क्षणभरानें न सांगतांच कळेल. " इतकें संभाषण होत आहे तोंच एका नोकरानें उत्तर हिंदुस्थानी कचोऱ्यासारखे फुगीर पण बिनपुरणाचे चार चार गाखर यांनीं भरलेल्या चार बशा व चार कपबशांचा संच यांनीं सज्ज असें चहाताट (Tea-Tray) आमच्या मेजावर आणून ठेविलें. रावबहादूर म्हणाले " लागा आतां क्लबाच्या कामाला. हा कार्यक्रम अर्ध्या तासांत संपला पाहिजे. मग शहराबाहेर तासभर सहल करून सभासदांनीं आपआपल्या घरीं जावयाचें. नियमितपणा हा या क्लबाचा विशेष आहे. रोज ठरलेल्या वेळीं एकाच्या घरीं जमावयाचें. तो कामाकरितां बाहेर गांवीं गेला असला तरी घरची मंडळी नेहमींप्रमाणें व्यवस्था ठेवते. ठरल्यावेळीं आपआपल्या उद्योगाला लागावयाचें. एक आठवडा एका सभासदाकडे जमावयाचें. दुसऱ्या आठवडयाला दुसऱ्याकडे जमावयाचें. कांहीं सभासदांच्या अकाली निधनानें सध्यां तीन आठवडयांनीं एक एकाची पाळी येते."

याप्रमाणें विनोदी व गंभीर संभाषण चालूं असतां दादासाहेब रावबहादुरांस म्हणाले " हें झालें रोजचें काम पण आमच्या पाहुण्यांतर्फे आप-

णाला एक विनंति करण्याचें काम आतां करतों. त्यांना नेवासें–टोकें–प्रवरासंगम ही त्रिस्थळी यात्रा करावयाची आहे. आम्हांला बागड्यांची मोटार मिळाली आहे. पण मालकाचे पेट्रोल परवाने खलास झाले आहेत. तरी आपले शिल्लक असल्यास पांच पेट्रोल परवाने पाहुण्याकरितां द्यावे. ” रावबहादुरानीं लगेच कारकुनाकरवीं पांच पास आम्हांस दिले. त्यांचे आभार मानून आम्ही बाजारपेठेंत असलेली नवीन कॉंक्रीटच्या घुमटानें व संगमरवरी भुयारानें मंडित अशी सुंदर इमारत पहिली. ही प्रेक्षणीय इमारत नगर सेंट्रल सहकारी संस्थेनें बांधली आहे हें ऐकून या शहरवासीयांच्या कर्तबगारीचें कौतुक वाटलें. त्या इमारतीची कल्पना छायाचित्रावरून येईल. नंतर कै. बाळासाहेब देशपांडे यांच्या देणगीमुळें स्थापन झालेलें सूतिकागृह ओझरतें पाहिलें व मग आम्ही घरीं आलों.

जेवणखाण, वामकुक्षी व दुपारचें चहापाणी झाल्यावर साडेपांच वाजतां आम्ही फिरावयास निघालों. नगरच्या किल्ल्याच्या तटाच्या बाजूच्या रस्त्यानें नव्या भल्या थोरल्या प्रवेशद्वाराशीं आलों. दोन बुरजांमध्यें पूर्वकाळीं प्रचंड लोखंडी भाल्यांनीं भीषण भासणारा लाकडी दरवाजा होता. त्याचे ऐवजीं हल्लीं लष्करी मोटार लॉऱ्यांच्या जा–ये–करितां दोन बुरजांमधील भिंत पाडून बुरुजावर कॉंक्रीटचीं बहालें टाकून खालीं प्रशस्त रस्ता केला आहे. किल्ल्यांत जाण्याची सध्यां परवानगी नसल्यासारखी आहे. म्हणून आम्ही रस्त्यावर उभे राहून मोटारींची जा–ये पाहून सहलसडकेनें बरेच दूरवर गेलों. वारा गार सुटल्यामुळें चालण्याचे श्रम वाटले नाहींत. एका उंचवट्याच्या जागीं आम्ही बसतों तों तीन चार लोक तेथें आले. मीं दादासाहेबांना थट्टेनें म्हटलें “ हा तुमच्या सकाळक्लबासारखा सायंकाळक्लब दिसतो. ” तेव्हां बसलेले एक गृहस्थ म्हणाले “ तसेंच कांहीं नाहीं. पण, आम्हीं रोज येथें येऊन थोडा वेळ गप्पागोष्टी करून हवा खाऊन घरोघर जातों खरें. ”

ता. २४ जानेवारी सन १९४२-आज नगरास झेंडावंदनाकरितां वाडिया पार्कमध्यें मोठा समारंभ होता. पण, त्याच दिवशीं व त्याच वेळीं शाळेच्या शिक्षकसंघापुढें माझें True aim of education या विषयावर व्याख्यान होतें. पण, संघाच्या बोलावणारानें चुकीनें आम्हांला त्या मैदानावर नेलें. आम्ही आश्चर्य करीत व संघांतील व्याख्यानास उशीर होईल अशा भीतिग्रस्त मनानें तो समारंभ पहात बसलों. नंतर, चिटणीस घाईघाईनें मला बोलावण्यास आले. उशीरानें गेल्याबद्दल दिलगिरीपूर्वक मी आपलें व्याख्यान अंधारांत पुरें केलें व विमनस्क मनानें परत घरीं आलों.

ता. २५ जानेवारी सन १९४२.-रावबहादूर चितळे यांचे येथें ठरल्याप्रमाणें सर्व व्यवस्था वेळेवर होऊन दादासाहेबांच्या तीन नातवंडांसह आम्ही जेवून साडे दहाच्या सुमारास गांव मागें टाकून प्रवरा-संगम रस्त्यानें भराभर मैलांवर मैल आक्रमूं लागलों. दादासाहेबांचीं नातवंडें त्यांना प्रश्न विचारून भंडावून सोडीत होतीं व त्यांच्या विचित्र व विलक्षण प्रश्नांना दादासाहेब शांतपणें उत्तरें देत होते; त्याचें मला कौतुक वाटलें.

इमामपूर घाटाचा तेरा चवदा मैलांचा भूमिभाग मीं शेवगांवास जातां येतां पाहिला होता. तेव्हां तो मला नवा नव्हता. घाट उतरल्यावर शेवगांवचा रस्ता डावे बाजूस टाकून आम्ही उजव्या बाजूचे रस्त्यानें पुढें गेलों. हा भूमिभाग सखल असून सुपीक व सजल वाटला. कारण या सर्व वाटभर मधून मधून फळबागा, पानमळे व धान्यशेतें लागत होतीं. रस्ता चांगला असल्यामुळें व मोटार हांकणाराही हुशार असल्यामुळें आम्ही बेचाळीस मैल पल्ला दोन तासांचे आंत गांठून गोदावरी नदीचे कांठाशीं आलों. येथें लोखंडी तारेच्या साहाय्यानें गाड्या व मोटारी तराफ्यांतून नदीपार नेण्याची व्यवस्था केलेली दिसली. नदीचें पात्र बरेंच रुंद व बारीक वाळू गोट्यांनीं भरलेलें दिसलें. प्रवाह पलीकडच्या दरेला होता. अलीकडच्या वाळवंटांत वाळकें, टरबुजें यांच्या वेलांचा हिरवागार मळा होता. येथला गोदावरीचा देखावा प्रेक्षणीय वाटला. गोदावरी हीच नदी

मोंगलाई व ब्रिटिश मुलुख यांची मर्यादा आहे. आम्ही उभें होतों त्याचे समोरच मोंगलाईतील पांढऱ्या शुभ्र मुसलमानी धर्तीच्या इमारतींनीं फुललेलें कायगांव दिसत होतें. तेथल्या महादेवाच्या देवळाचें पांढरें शिखर व नदीवरचा घाट आम्हांस स्पष्टपणें दिसला.

प्रवरा व गोदावरी या नद्यांच्या संगमाकडे जाणारी सडक प्रवरासंगम गांवांतून जाते असें कळल्यावरून आम्ही मोटारींत बसून त्या रस्त्यानें थोडेसे जातों, तोंच त्या गांवची छोटीशी बाजारपेठ लागली. ती टाकून पुढें गेल्यावर प्रवरेची खोल दरड आली. तेथल्या काळ्या दगडी बांधणीच्या महादेवाच्या देवळानजीकच्या सावलींत कार थांबविली; तेथें दोन तीन गडी उभे होते. त्यांना मुलामुलींना घेण्यास सांगून आम्हीं पायीं दरड उतरूं लागलों; दरडीवर गाळाची माती सांचली होती तींत पाऊल पाऊल पाय बुडले. दरड फार घसरडी वाटली. नंतर पात्रांतील तांबडसर जांभळट पांढरट बारीक वाळूचें ओलसर वाळवंट लागलें. प्रवरा नदीच्या पाण्याला पुष्कळ ओढ होती. पण पाणी गुडघाभरच असल्यानें आम्हीं सहज नदीपार झालों. प्रवरा गोदावरीशीं काटकोन करून मिळते. प्रवरेचें पाणी स्वच्छ व निर्मळ असल्यामुळें पांढरें शुभ्र दिसत होतें तर गोदावरीचें पाणी खोल व गाळांमधून वहात आल्यानें काळसर दिसत होतें, प्रवाहांतून बाहेर पडलों तोंच कलिंगडें, वाळकें व मका इत्यादि पिकांचे मळे लागले. लगेच पहिला घाट लागला. याला 'सोंडघाट' असें म्हणतात. याच्या पायऱ्या तीन चार इंची उंचीच्या आहेत. या घाटानें हत्ती नदीवर पाणी पिण्यास आणीत असें कळलें. पायऱ्यांवर कमानदार अशा ओवऱ्या बांधल्या आहेत. पुढें सारखे घाट लागतात. पण, ते ओबड धोबड दगडांचे व पडके आहेत. शेवटचा नाना फडणीसांचा घाट फारच उत्तम बांधलेला आहे. त्याच्या वाटोळ्या बुरुजावरून गोदावरीचा व समोरच्या मोंगलाई मुलुखाचा मनोहर देखावा दिसला. घाटाच्या माथ्यावरच नाना फडणीसांचा वाडा आहे. तो हल्लीं पडला आहे. पण एका चौकाची दुरुस्ती

करून तो मराठी शाळेला देण्यांत आलेला आहे असें कळलें. हमालांनीं आम्हांला रा. गोविंदराव जोशी टोक्याचे जहागिरदार यांचे वाड्यांत नेलें. त्यांनीं आमचें स्वागत केलें व 'गंगास्नान व प्रवरापान' या म्हणी-प्रमाणें प्रवरेचें पाणी फार पाचक आहे असें सांगून त्यांनीं गार व स्फटिकवत् पाण्यानें भरलेली कळशी व पितळी प्याले आमचे पुढें आणून ठेवले. आम्हीं सर्वजण पोटभर पाणी प्यालों. लगेच दृश्यदर्शनास निघालों. प्रथमतः जहागीरदारांचा चौसोपी वाडा पाहिला. त्याच्या गच्चीवरून फार दूरवरचा सुंदर देखावा दिसला. त्याला लागून बारामतीकर सरदार काळे यांच्या वाड्याचा मोठा दरवाजा पाहिला. नंतर आम्ही त्या गांवांतलें प्रख्यात महादेवाचें देऊळ पहाण्यास गेलो. बोळवजा अरुंद फरसबंदी वाटेनें आम्ही थोडेसें गांवांत जातांच देवळाचा दगडी दरवाजा लागला. आंत शिरल्याबरोबर फरसबंदी आवार व ओवऱ्या लागल्या. हें काळ्या दगडाचें, हेमाडपंती शिखराचें व अष्टदल आकृतीचें देवालय आहे. देवालयाचें कलाकुसरीचें काम अप्रतिम आहे. प्रदक्षिणा मार्गांत आणखी दोन देवळ्या आहेत. या देवळ्यांचा त्यांच्या प्रमाणशीर व साध्या नक्षीच्या कामामुळें पहाणाराच्या मनावर फार अनुकूल ग्रह होतो यांत शंका नाहीं.

बाकी मोडकळीस आलेल्या गांवांत आणखी पहाण्यासारखें कांहीं नाहीं असें कळल्यामुळें आम्ही जोशी जहागीरदाराच्या वाड्यांत परत आलों. व मग लगेच परत जाण्यास निघालों. दादासाहेबांच्या नातनाती ही बालमंडळी मोटारींत जाण्यास उतावीळ झाली होती. तरी जहागीर-दारांना 'नमस्ते' करून आम्ही तडक परत घाटाशीं आलों, तोंच त्यांची होडी घाटाच्या पायऱ्यांशीं उभी! मुलांना तर काय आनंदाचें भरतें आलें व त्यांनीं होडीमध्यें भराभर उड्या टाकल्या. मला सुद्धां काशीच्या होडी-सहलीची स्मृति होऊन आनंद झाला. गोदावरीच्या शांत व शीतल प्रवाहां-तून जातांना फार मौज वाटली. थोड्याच वेळांत आम्हीं पहिल्या सोंड-घाटाशीं आलों. मग जहागीरदारांचे आभार मानून आम्ही आल्या वाटेनें प्रवरापार होऊन आमच्या मोटार कारशीं आलों व आल्या रस्त्यानें

पांच सहा मैल येतों तों उजवीकडे नेवासे रस्ता फुटला. मैल दीड मैल जातों तोंच बैलगाड्याच गाड्या लागल्या. तो बाजाराचा दिवस होता. शिवरात्रीची दहाबारा दिवसांची ही जत्रा आहे असें कळलें. प्रथम आम्ही बाजूच्या रस्त्यानें ज्ञानेश्वराच्या दगडी खांबाचें ठिकाण पहाण्यास गेलों. हा खांब जमिनींत खोल पुरलेला असून त्यावर छोटासा सभामंडप बांधलेला आहे. हा खांब जमिनीवर साडेचार फूट उभा आहे. मध्यें चौकोनी असून वर खालीं वाटोळा आहे. या खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली अशी आख्यायिका आहे. ती सन १२९० मध्यें पुरी झाली हें ग्रंथाच्या शेवटच्या उल्लेखावरून कळतें. या खांबाच्या पुढच्या अंगास ७ मराठी ओळी व २ संस्कृत ओळी असा एक शिलालेख आहे. कोणी भक्तानें नंदादीपाकरितां दरमहा सहा रुपयांची देणगी दिल्याबद्दलचा तो लेख आहे.

या मंडपाचे मागें तीन मुसलमानी धर्तीच्या कमानदार ओवऱ्या आहेत; हें दृश्य पाहून झाल्यावर आम्ही बाजारांतील गर्दींतून कशीबशी वाट काढीत तेथल्या दगडी देवळापाशीं आलों. देवळाला घाटासारख्या सात आठ दगडी पायऱ्या आहेत. देवळांत पुराण चालू असून बायकापुरुषांची गर्दी होती. या महादेवाचे देवालयाचें कामही टोक्याच्या देवळासारखेंच आहे. पण येथें गाभाऱ्यांत चांगला उजेड असून पिंडी उंच आहे. तीवर मुखोटा व जरीचा पोशाख घातला होता. आम्ही कसेंबसें देवदर्शन घेऊन बाहेर पडलों. मग बेहेरे वकीलांचे मुलांना भेटून लगेच कारमध्यें बसून सात साडेसातचे सुमारांस नगरास परत आलों.

ता. २६ जानेवारी सन १९४२.—सर्व दिवस श्रमपरिहारांत व स्नेह्यांच्या भेटी घेण्यांत घालविला. माधवराव जोशी यांचे घरीं टोक्याच्या देवाचे दागिने पाहिले. ते प्रेक्षणीय वाटले. ता. २७ जानेवारी सन १९४२ रोजीं १० च्या गाडीनें पुण्यास परत आलों. कळावें, हे विनंति.

आपला

दादा

प्रि. गो. चि. भाटे यांचीं

प्रवासपर पुस्तकें

	कि. रु.
१ उत्तर हिंदुस्थान	१॥
२ अटकेपार प्रवास	१।
३ काश्मीरवर्णन	१
४ सिंधवर्णन	१।
५ पायगाडीचीं चक्रें	१।
६ काशी-रामेश्वर यात्रा	१॥
७ विलायत यात्रा	१॥
८ युरोप यात्रा	१॥
९ लंकावर्णन	१॥
१० केरलवर्णन	१
११ म्हैसूरवर्णन	.॥।

विविधविषयक पुस्त

१ कार्लाईल

२ History of Marathi Literature

३ Essays

४ विभूतींस प्रणामांजलि

५ स्कॉट चरित्र

६ कँट व शंकर

७ ललितकलामीमांसा

८ तीन तत्त्वज्ञानी

९ व १० ऐतिहासिक लघुकथा-चतुष्टय (स्कॉटच कादंबऱ्यांच्या आधारें), भाग १ व २

माधव गोविंद भाटे, ८३० सदाशिव, पुणें शहर.

प्रि. भाटे यांची मार्गदर्शक पुस्तकमाला

पुष्प १ लें— प्रवास-पत्रें

(A guide to interesting places in Karwar, Dharwad and Nagar Districts.)

पुष्प २ रें— गोकर्ण-धोम-महाबळेश्वर यात्रा

(A guide to Gokarn old and new Mahabaleshwar.)

पुष्प ३ रें— अबू शीतलनिवासस्थान-वर्णन

(A guide to Mount Abu, Dilwara Temples, Achaleshwar Temples, Guru Shikhar and Vasisthashram.)

पुष्प ४ थें— पांचगणी पंचक्रोशी वर्णन

(A guide to Panchagani, Dhom, Wai, Dhandeghar, Bavadhan and Ambad Khind.)

पुष्प ५ वें— माझा कारोमँडल किनाऱ्याचा प्रवास

(A guide to Mahabalipur, Tirupati, Shiva Kanchi, Vishnu Kanchi temples, Annamalai University, Tanjore and Trichonapalli)

पुष्प ६ वें— राजपुतान्याचें वर्णन व वृत्तांत

(A guide to Rajaputana.)